१९२७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३९५

REFBK-0001891

ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
अ. नं. ३८५

[ ...ार्योत्तेजक सभा ...]

[ ... रामदासी मासिकांत प्रसिद्ध झालेला विषय ]

REFBK-0001891

# श्रीमत् दासबोधाचे कर्ते

## दुसरे कोण असणार ?

तुम्ही श्रोते परम दक्ष । अलक्षास लावितां लक्ष ।
हें तों सामान्य प्रत्यक्ष । जाणतसा ॥

हें पुस्तक विश्वनाथ गणेश जावडेकर यांनीं धुळें येथें आत्माराम प्रिं. आणि प. कंपनीच्या श्रीआत्माराम छा० छापून शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें प्रसिद्ध केलें.

१८४३ ज्येष्ठ शु. १

किंमत आठ आणे

१८८७ १७/७ ३८४ १६/८८

॥ श्रीराम ॥

# श्रीमत् दासबोधाचे कर्ते दुसरे कोण असणार ?

पूर्ण ग्रन्थ पाहिल्याविण । उगा च ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ॥ १ ॥
अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ।
पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥ २ ॥

मराठी भाषेची घटना सांगतांना श्रीसमर्थांवर तुटून पडणारे सुधारक रा. रामभाऊ जोशी व कांहीं एका मतलबानें श्रीशिवसमर्थभेटीचा काळ पुढें लोटून पाहणारे चातुर्वर्ण्यविरोधी प्रो. गोविंदराव भाटे आपल्या निस्पृहपणाचा केवढा हि तोरा मिरवोत, पण त्यांनां हि 'न्यायसस्पृहतेंत' मागें टाकणारे एक शास्त्री 'विविधज्ञानविस्तारांत' नुकते च जन्मास आले आहेत. या राजश्रीनें तर श्रीरामदासांच्या कर्तृत्वावर च हल्ला चढविला आहे. कोणी 'विद्यामयूर भैय्याशास्त्री देव जामखेडकर' यांनीं भवभूतीच्या निस्पृहपणाचा आविर्भाव आणून विविधज्ञानविस्ताराच्या चालू वर्षाच्या पहिल्या व दुसऱ्या अंकांत 'दासबोधाचा कर्ता कोण' अशी शंका उभी करून 'दासबोधाचा कर्ता रामदास नसून रामदासशिष्य च असला पाहिजे' असा सिद्धान्त काढला आहे. या सिद्धान्ताच्या प्रस्थापनेसाठीं या विद्यामयूरानें जीं प्रमाणें दिलीं आहेत, तीं एकूण एक अज्ञानानें, मत्सरानें, अप्रामाणिकपणानें दूषित आहेत. आजपर्यंत कोणाला हि न सुचलेली असली अजब कल्पना पुढें करून एकाद्या संप्रदायाच्या मर्मस्थानीं आघात करण्याला प्रवृत्त होण्यापूर्वी एतद्विषयक सर्व श्री रामदासी वाङ्मय वाचणें हें या गृहस्थाचें कर्तव्यकर्म होतें. तसें च ज्या ग्रन्थांच्या आधारावर त्यांनीं आपल्या मताची उभारणी केली आहे, असें ते म्हणतात, त्या च ग्रन्थांत त्यांच्या कल्पनेच्या विरुद्ध जीं प्रमाणें असतील तीं खोडून काढणें हें त्यांचें काम होतें. हे दोन्ही अपराध भैय्याशास्त्र्यांच्या हातून घडलेले आहेत. श्रीसांप्रदायिक विविध विषय, श्रीसमर्थांचें तंजावरमठपति भीमस्वामीकृत चरित्र, निवृत्तिराम, दिनकरांची स्फुट कविता, रामसोहळा, इत्यादि ग्रन्थ प्रकाशित असून हि शास्त्रीबावांना त्यांची वार्ता नाहीं व दासबोध. सम-

यांची स्फुट कविता, स्वानुभवदिनकर, समर्थप्रताप हे ग्रन्थ वाचले असून हि त्यांत जीं विरुद्ध प्रमाणें आहेत तिकडे त्यांनीं कानाडोळा केला आहे. शेंकडों वर्षें चालत आलेला लोकांचा समज उडवूं पहाणाऱ्या ठिकाणीं हे दोन्ही अपराध निंद्य व अक्षम्य होत. आपलें विवेचन 'भाविक पण अज्ञानी, रामदाससांप्रदायी, पूर्वग्रहदूषित पंडितमन्य व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दासबोधाचा व्यवसाय चालवून महती मिळविणाऱ्या लोकांना उद्वेगजनक होईल' हें ठाऊक असून हि शास्त्रीबुवांनीं इतक्या बेफिकीरपणें महाराष्ट्राच्या हृदयावर घाव घालण्यास प्रवृत्त व्हावें, हें पाप होय. शास्त्रीबुवांनीं हुडकून काढलेलीं प्रमाणें दोषाई आहेत. तीं कशीं हें आपण इतक्यांत च पाहूं, तथापि आह्मी हें प्रतिपादन शास्त्रीबावांसाठीं मुळीं च करीत नाहीं, कारण त्यांना आतां आपला हेका सोडणें प्राणान्तीं हि शक्य नाहीं! तें हि कसें तें शेवटीं पाहूं. पण, आमच्या सारखे जे 'भाविक पण अज्ञानी' लोक आहेत त्यांची उद्विग्नता नाहींशी करण्यासाठीं आमचा हा प्रयत्न आहे. तथापि, शास्त्रीबावांचे 'न्यायसस्पृह व सारासारतत्त्वविवेचनपटु' असे जे 'सुज्ञ' वाचक असतील त्यांना हि आमचें प्रतिपादन पटलें, तर त्यांत हि आम्हांस आनंद आहे. बाकी असा 'सुज्ञ' वाचक स्वतः शास्त्रीबावां खेरीज दुसरा कोणी त्यांना लाभला असेल, याची आम्हांस शंका च आहे.

असो, आतां आपण शास्त्रीबावांच्या प्रमाणांचा क्रमशः विचार करूं. हीं प्रमाणें प्रथम होतां होई तों त्यांच्या च शब्दांत उद्धृत करून घेऊन त्यांवर आमचें म्हणणें वाचकांस सादर करूं.

## प्रमाण—पहिलें

> "दासबोध ग्रंथ परमपूज्य साधुमुकुटमणि श्री समर्थ रामदासस्वामी यांनीं केल्याविषयीं किंवदंती आहे. **पण या किंवदंतीला दासबोधांत अणुमात्र आधार नाहीं.** रामदाससमकालीन मराठी ग्रंथकार पाहिले असतां, त्यांनीं स्वकृत ग्रन्थांत आपले गुरु, इष्ट दैवत, मातापितर व स्वनाम इत्यादिकांचा उल्लेख केल्याचें आढळतें. निदान स्वगुरु व स्वनाम तर आढळतें च आढळतें. **दासबोधांत यांतून कोणाचा च उल्लेख नाहीं.**"

एकूण, दासबोधग्रन्थाचे कर्ते रामदास होत, अशी नुसती किंवदंती शास्त्रीबावांच्या कानावरून गेलेली आहे, तसा महाराष्ट्रजनतेचा साधार दृढ समज असल्याचें त्यांना ठाऊक नाहीं ! शास्त्रीबावा म्हणतात, "या किंवदंतीला दासबोधांत अणुमात्र आधार नाहीं ! खरें काय ? शास्त्रीबावांनीं दासबोध ग्रन्थ एकदां तरी साद्यन्त वाचला आहे ना ? निदान असलें विधान बेलाशक करण्यापूर्वी दासबोधावरून एकदां दृष्टि फिरविणें त्यांचें कर्तव्य नव्हतें काय ? वाचकांस आमची अशी विनंति आहे कीं, शास्त्रीबावांच्या वल्गनांचें आम्ही हें खंडण करीत असतां वाचकांनीं हातीं दासबोध घ्यावा व आम्ही जें कांहीं म्हणतों तें त्यावरून पडताळून पहावें. दासबोध हा ग्रन्थ रामदासांचा होय, याला दासबोधांत अणुमात्र आधार नाहीं अं ! दासबोधांत श्रीसमर्थांनीं आपल्या नुसत्या नामाचा हि उल्लेख केल्याचें शास्त्रीबावांना आढळत नाहीं ! हें विधान करितांना हातीं ज्ञानेश्वरी घेऊन ज्ञानेश्वरीला च दासबोध समजून तींत शास्त्रीबावा रामदासांचा शोध करीत होते कीं काय, अशी आम्हांस शंका येते. कां जगाच्या बाहेरील दासबोधाची एकादी प्रत त्यांनीं मिळविलेली आहे ? पण दासबोधाची कोणती हि प्रत असली म्हणून काय झालें ? पण मग, हा एवढा पंडित इतकें अज्ञान कसें प्रगट करिता ? आम्हांस असें वाटतें कीं, दासबोध ग्रंथ वरवर चाळून या विद्यामयूराला त्यांत '**रामदास**' कोठें दिसले नाहींत व त्या आनंदाच्या भरांत दासबोधांत कोठें **रामदास** नाहींत, या एका कल्पनेवर त्यांनीं आपल्या मताचा सारा पिसारा उभारून नृत्य करण्यास सुरवात केली आहे. त्याला दासबोधांत कोठें **रामदास** दिसते तर त्याचा आनंद मावळून तो जागच्या जागीं च थिजता ! व आतां हि त्याचें हें नर्तन बंद पाडण्याचा पहिला उपाय म्हणजे त्याला दासबोधांत **रामदास** दाखविणें, हा होय. 'समर्थांचा नामनिर्देश ज्या पद्यांत आहे तीं पद्यें खात्रीपूर्वक त्यांचीं मानण्यास शास्त्रीबावांची हरकत नाहीं' आणि म्हणून 'रामदास' किंवा 'दास' असा निर्देश असलेलीं कांहीं पद्यें श्रीसमर्थांचीं म्हणून त्यांनीं मान्य केलेलीं आहेत. अरेरे, किती थोडक्यांत चुकलें ! दासबोधांत जेथें जेथें **रामदास** आणि **दास** हीं नांवें आलीं आहेत, तीं जर शास्त्रीबावांच्या उडत वाचण्यांत नेमकीं त्यांच्या दृष्टीसमोर येतीं, तर आज हा सारा अनर्थ टळता ! पण त्याचें आतां काय, ती वेळ निघून गेली. आतां आपणांस शास्त्रीबावांना दासबोधांत रामदास दाखविणें भाग आहे. अशीं कांहीं स्थळें सादर करून बाकीचीं सारीं हुडकून काढण्याची तसदी शास्त्री-

बावांना द्यावी, असा माझा विचार आहे. ती तसदी घेण्यांत च त्यांचें कल्याण आहे.

( १ ) शास्त्रीबावा, आठव्या दशकाच्या नवव्या समासांतील शेवटच्या दोन ओव्या काढा. वाचा,

**सकळ सृष्टीचा ठाईं । अनुभव येक चि नाहीं ।**
**तो बोलिजेल सर्व हि । पुढिले समासीं ॥ ५९ ॥**
**कोणे स्थितीनें राहाती । कैसा अनुभव पाहाती ।**
**रामदास म्हणे श्रोतीं । अवधान देणें ॥ ६० ॥**

शास्त्रीबावा, आहे ना येथें श्रीसमर्थांचें नांव ? सांपडला ना अणुमात्र आधार ! आठव्या दशकाचा नववा समास रामदासांचा ना ! आणि त्याच्या पुढचा समास हि त्यांचा च ना ? आणि मागचा समास तरी कोणाचा ? शास्त्रीबावा, आतां हयगय करूं नका, प्रत्यक्ष समास काढून पहा. ८×९ त रामदास आहेत आणि ८×८ त ते ८×९ चा उल्लेख करितात. स्वतः पहा, मजवर विश्वास टाकूं नका. शास्त्रीबावा, अशा रीतीनें विषयानुसंधानानें मागें पहात पहात जा, म्हणजे तुम्हांस दिसेल कीं, आठवा दशक हा सारा समर्थांचा. या आठव्या दशकाला **ज्ञानदशक** म्हणतात. त्यांत **रामदास** आढळले आणि धाग्यानें धागा लागून सबंद दशक त्यांचा ठरला. शास्त्रीबावा, हा **ज्ञानदशक** श्रीसमर्थकृत आहे, हें **करता** कां कबूल ? मी तुम्हांला सांगतों कीं, कबूल करूं नका, पहा फसाल, कारण एकदां ज्ञानदशक समर्थांचा म्हणून कबूल केला, म्हणजे सारा दासबोध तुमच्या गळ्यांत पडेल ! आणि तसें होणें तर तुम्हांस नको आहे. तेव्हां तुमच्या इतर ' सारासारतत्त्वविवेचनपटु सुज्ञ ' वाचकांनीं कबूल केलें तरी तुम्हीं आपला हट्ट चालवावा हें च तुम्हांस श्रेयस्कर होय ! एकदां आठवा ज्ञानदशक श्रीसमर्थांचा मानला, म्हणजे पांचवा दशक त्यांचा च, चवथा हि त्यांचा च, तिसरा हि त्यांचा च आणि नववा हि त्यांचा च, अशी एकामागें एक व एकापुढें एक कबुली द्यावी लागते.

चवथ्या दशकाच्या दहाव्या समासाची पहिली ओवी अशी :

**मुळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार ।**
**तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदशकीं बोलिला ॥**

ज्ञानदशक जर समर्थांचा तर चवथ्या दशकाचा दहावा समास हि त्यांचा च.

आणि तेथून मागील एक एक समास पहात जा, म्हणजे धाग्याला धागा लागून तुम्हांस थेट ग्रन्थारंभ गांठावा लागेल ! कोण ही आमच्या विद्यामयूरावर अनर्थपरंपरा ओढवली म्हणावयाची !

पांचवा दशक काढा. त्याच्या दहाव्या समासाची शेवटची ओवी अशी:—

**तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणौनि वक्तृत्व आटोपिलें ।**
**न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥**

आणि पूर्ववत् जा मागें पहात पहात म्हणजे आढळेल कीं, सारा पांचवा दशक समर्थांचा. तो च गत नवव्या दशकाची. म्हणून विद्यामयूर भैय्याशास्त्री यांना माझा असा आग्रह आहे कीं, आठव्या दशकाच्या नवव्या समासांत जेथें **रामदास** आले आहेत त्यांच्या कडे त्यांनीं पाहूं सुद्धां नये. त्यांच्या कडे पाहण्याची भैय्यारावांना भीति च वाटली पाहिजे. पण ते आतां **रामदासांना** कोठवर टाळणार ?

( २ ) अकरावा **भीमदशक** होय. तथापि, शास्त्रीबावा, न भितां, त्याच्या सहाव्या समासाची शेवटची ओवी वाचा.

**ऐसा पुरुष धारणेचा । तो चि आधार बहुतांचा ।**
**दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥**

पण, शास्त्रीबावा, तुम्हांला कांहीं त्यांचा आधार घ्यावा, असें वाटत नाहीं ना ! तुम्ही अजून असें च म्हणणार ना, कीं दासबोध ग्रन्थ हा समर्थांचा होय याला दासबोधांत अणुमात्र आधार नाहीं. शास्त्रीबावा, काय तुमचें सुकृत असेल तें तुमचें तुम्हांस माहीत, कीं कोठें हि **रामदास** दिसतां च त्यांना आतां कसें टाळावें, ही विवंचना तुम्हांस पडावी ! तेव्हां आतां कांहीं तरी लंगडी पांगळी शास्त्रीय कोटी लढवून हा हि समास तुम्हीं उडविला पाहिजे, नाहीं पेक्षां तुमचें पुढचें एक सबंध प्रमाण ढांसळेल पहा. महाराष्ट्रवाचकांपैकीं तुम्हांला एकट्याला च ही सवलत ठेवलेली आहे.

( ३ ) पुढच्या च समासाची शेवटची ओवी पहा.

**वृत्तिशून्य योगेश्वर । याचा पाहावा विचार ।**
**दास म्हणे वारंवार । किती सांगों ॥ ११ ॥**

आतां काय करणार, शास्त्रीबोवा ? श्रीसमर्थांनीं तुम्हांला आणखी किती वेळां सांगितलें म्हणजे दासबोध हा ग्रन्थ त्यांचा हें तुम्ही कबूल कराल ? करता कां

हा समास समर्थांचा म्हणून कबूल ? हा एक च समास जरी तुम्हीं कबूल केलात, तरी तुम्हांस तुमच्या मताला मूठमाती द्यावी लागेल ! या समासाची पहिली ओवी वाचलीत कां, शास्त्री ?

चंचळ नदी गुप्त गंगा।
स्मरणें पावन करी जगा।
प्रचित रोकडी पाहा गा।
अन्यथा नव्हे ॥ ११-७-१

ही ओवी वाचून आपल्या 'सारासारतत्त्वविवेचनपटुत्वाला' कांहीं धक्का बसतो कां ? कशाला बसेल, कारण आपली 'न्यायसस्पृहता' च तशी अजब आहे ! पण, शास्त्रीबुवा, तुमचे जे 'भाविक पण अज्ञानी' वाचक आहेत, ते या एका ओवीच्या आधारानें तुमच्या मताची बिनपायाची सारी इमारत कोसळून पाडण्यास समर्थ झाले आहेत. शास्त्रीबावा, तुम्ही '**रामदासांची स्फुट कविता**' हा ग्रन्थ पुष्कळदां आधाराला घेतला आहे, पण तो तरी ग्रन्थ एकवार सबंध काळजीपूर्वक वाचावयाचा होता ना ? तसें तुम्हीं केलें असतें म्हणजे ज्या कल्पनामायेनें तुम्हांस नाचावयास लाविलें आहे, तिनें मान सुद्धां वर केली नसती. शास्त्रीबावा, त्या ग्रन्थांतील ४२१ पृष्ठावर जें **आनंदवनभुवन** म्हणून श्रीसमर्थांचें एक अप्रतिम प्रकरण आहे, तें काढा पाहूं. करता का तें प्रकरण श्रीसमर्थांचें आहे असें कबूल ? विचारा आपल्या आवडत्या कल्पनेला. कारण तुम्ही आतां तिच्या तावडींत पुरे सांपडला आहांत. तुमची लाडकी कल्पना, हें प्रकरण श्रीसमर्थांचें आहे, हें तुम्हांस कबूल करूं देणार नाहीं. कारण, त्या प्रकरणांत तुमच्या कल्पनेचें मरण आहे. ४२२ व्या पृष्ठावरील अगदीं खालची १४ वी ओवी वाचून पहा आणि डोळ्यापुढें अंधारी येते कां नाहीं, तें वाटल्यास आम्हांस नका सांगूं, पण आपल्या 'सुज्ञ' वाचकांना कळवा.

ग्रन्थीं जे वर्णिली मागें।
गुप्त गंगा माहां नदीं ॥

शास्त्रीबावा, तुम्ही म्हणून च टिकाव धराल, दुसरा एकादा लेचापेचा शास्त्री असता तर, '**चुकलों, मी समर्थांचा मोठा अपराध केला**' असें जगाला जाहीर करून या महानदींत जीव देता ! पण, तुम्ही असें करूं नका ! 'मागें च ग्रन्थांत या गुप्तगंगेचें आपण वर्णन केलें आहे' असें श्रीसमर्थ स्वतः सांगत आहेत. तो कोणता ग्रन्थ आणि कोणता समास ? कांहीं शंका उरली आहे कां,

शास्त्री ? अकराव्या दशकाच्या सातव्या समासांत जें गुप्तगंगेचें वर्णन आलें आहे तो समास कोणीं केला आणि तो समास ज्या दासबोधग्रन्थांत आहे त्या दासबोधाचा कर्ता कोण, हें आपल्या न्यायसस्पृह लेखणीनें आपल्या सुज्ञ वाचकांस आणखी एकवार समजावून सांगाल काय ?

( ४ ) अकरावा भीमदशक जर समर्थांचा तर दहावा जगज्जोती-दशक तरी दुसऱ्या कोणाचा ? अकराव्या दशकाच्या पहिल्या समासाची अकरावी ओवी अशी:—

**ऐसी जाली उभारणी । आतां ऐका संहारणी ।**
**मागील दशकीं विशद करूनि । बोलिलें असे ॥ ११-१-११**

तो मागील दहावा दशक कोणाचा ?

( ५ ) आणि **विवेकवैराग्यनाम** बारावा दशक तरी कोणाचा ? त्यांत कांहीं आधार आहे कां ? त्यांत श्रीसमर्थांचें स्वनाम कोठें आलें आहे काय ?

**म्हणौन विवेक आणि वैराग्य । हें चि जाणिजे महद्भाग्य ।**
**रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥ १२-४-२०**

( ६ ) सोळावा दशक स्तवनाचा च आहे. त्याचे आद्यन्त समास पहा. पहिल्या समासांत

**रघुनाथभक्त थोर थोर ।**
**महिमा जयांचा अपार ।**
**त्या समस्तांचा किंकर ।**
**रामदास म्हणे ॥ १६–१–२१**

आणि शेवटच्या समासांत

**भजन साधन अभ्यास ।**
**येणें पाविजे परलोकास ।**
**दास म्हणे हा विश्वास ।**
**धरिला पाहिजे ॥ १६–१०–२१**

तेव्हां हा सबंध दशक कोणाचा ?

( ७ ) त्या च प्रमाणें, शास्त्रीबावा, इतर हि सर्व दशकांत तुम्हांला, को[illegible] गुप्त तर कोठें प्रगट, श्री रामदास दिसतील. ' आहाच ' पाहूं नका. [illegible] झालेल्या डोळ्यांनीं पाहूं नका, जरा बारकाईनें पहा. शास्त्रीबावा माझे वैरी कां आहांत ? मीं तर पूर्वीं कधीं तुमचें नुसतें ना[illegible]

हा समास समर्थांचा म्हणून कबूल ? हा एक च समास जरी तुम्हीं कबूल केलात, तरी तुम्हांस तुमच्या मताला मूठमाती द्यावी लागेल ! या समासाची पहिली ओवी वाचलीत कां, शास्त्री ?

चंचळ नदी गुप्त गंगा ।
स्मरणें पावन करी जगा ।
प्रचित रोकडी पाहा गा ।
अन्यथा नव्हे ॥ ११-७-१

ही ओवी वाचून आपल्या ' सारासारतत्त्वविवेचनपटुत्वाला ' कांहीं धक्का बसतो कां ? कशाला बसेल, कारण आपली ' न्यायसस्पृहता ' च तशी अजब आहे ! पण, शास्त्रीबुवा, तुमचे जे ' भाविक पण अज्ञानी ' वाचक आहेत, ते या एका ओवीच्या आधारानें तुमच्या मताची बिनपायाची सारी इमारत कोसळून पाडण्यास समर्थ झाले आहेत. शास्त्रीबावा, तुम्ही ' रामदासांची स्फुट कविता ' हा ग्रन्थ पुष्कळदां आधाराला घेतला आहे, पण तो तरी ग्रन्थ एकवार सबंध काळजीपूर्वक वाचावयाचा होता ना ? तसें तुम्हीं केलें असतें म्हणजे ज्या कल्पनामायेनें तुम्हांस नाचावयास लाविलें आहे, तिनें मान सुद्धां वर केली नसती. शास्त्रीबावा, त्या ग्रन्थांतील ४२१ पृष्ठावर जें आनंदवनभुवन म्हणून श्रीसमर्थांचें एक अप्रतिम प्रकरण आहे, तें काढा पाहूं. करता का तें प्रकरण श्रीसमर्थांचें आहे असें कबूल ? विचारा आपल्या आवडत्या कल्पनेला. कारण तुम्ही आतां तिच्या तावडींत पुरे सांपडला आहांत. तुमची लाडकी कल्पना, हें प्रकरण श्रीसमर्थांचें आहे, हें तुह्मांस कबूल करूं देणार नाहीं. कारण, त्या प्रकरणांत तुमच्या कल्पनेचें मरण आहे. ४२२ व्या पृष्ठावरील अगदीं खालची १४ वी ओवी वाचून पहा आणि डोळ्यापुढें अंधारी येते कां नाहीं, तें वाटल्यास आम्हांस नका सांगूं, पण आपल्या ' सुज्ञ ' वाचकांना कळवा.

ग्रन्थीं जे वर्णिली मागें ।
गुप्त गंगा माहां नदी ॥

शास्त्रीबावा, तुम्ही म्हणून च टिकाव धराल, दुसरा एकादा लेचापेचा शास्त्री असता तर, ' चुकलों, मी समर्थांचा मोठा अपराध केला ' असें जगाला जाहीर करून या महानदींत जीव देता ! पण, तुम्ही असें करूं नका ! ' मागें च ग्रन्थांत या गुप्तगंगेचें आपण वर्णन केलें आहे ' असें श्रीसमर्थ स्वतः सांगत आहेत. तो कोणता ग्रन्थ आणि कोणता समास ? कांहीं शंका उरली आहे कां,

शास्त्री ! अकराव्या दशकाच्या सातव्या समासांत जें गुप्तगंगेचें वर्णन आलें आहे तो समास कोणीं केला आणि तो समास ज्या दासबोधग्रन्थांत आहे त्या दासबोधाचा कर्ता कोण, हें आपल्या न्यायसस्पृह लेखणीनें आपल्या सुज्ञ वाचकांस आणखी एकवार समजावून सांगाल काय ?

( ४ ) अकरावा भीमदशक जर समर्थांचा तर दहावा जगज्जोती-दशक तरी दुसऱ्या कोणाचा ? अकराव्या दशकाच्या पहिल्या समासाची अकरावी ओवी अशी:—

ऐसी जाली उभारणी । आतां ऐका संहारणी ।
मागील दशकीं विशद करूनि । बोलिलें असे ॥ ११-१-११

तो मागील दहावा दशक कोणाचा ?

( ५ ) आणि विवेकवैराग्यनाम बारावा दशक तरी कोणाचा ? त्यांत कांहीं आधार आहे कां ? त्यांत श्रीसमर्थांचें स्वनाम कोठें आलें आहे काय ?

म्हणौन विवेक आणि वैराग्य । हें चि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥ १२-४-२०

( ६ ) सोळावा दशक स्तवनाचा च आहे. त्याचे आद्यन्त समास पहा. पहिल्या समासांत

रघुनाथभक्त थोर थोर ।
महिमा जयांचा अपार ।
त्या समस्तांचा किंकर ।
रामदास म्हणे ॥ १६-१-२१

आणि शेवटच्या समासांत

भजन साधन अभ्यास ।
येणें पाविजे परलोकास ।
दास म्हणे हा विश्वास ।
धरिला पाहिजे ॥ १६-१०-३१

तेव्हां हा सबंध दशक कोणाचा ?

( ७ ) त्या च प्रमाणें, शास्त्रीबावा, इतर हि सर्व दशकांत तुम्हांला, कोठें गुप्त तर कोठें प्रगट, श्री रामदास दिसतील. ' आहाच ' पाहूं नका, कावीळ झालेल्या डोळ्यांनीं पाहूं नका, जरा बारकाईनें पहा. शास्त्रीबावा, तुम्ही कोणी माझे वैरी कां आहांत ? मी तर पूर्वी कधीं तुमचें तुमचें नांव हि ऐकलें नव्हतें,

त्या तुमचें मी वैर कोठून करणार ? बाकी, मला ठाऊक हि नसतां, मज गरिबाविषयीं आपण मात्र मनांत कोणता भाव वागवीत होतां-व वागवीत आहांत, तो आपण आपल्या लेखाचे शेवटीं बोलून गेलां आहांत. तेव्हां मला माफ करा, पण मी तुम्हांस विचारतों, सबंध दासबोधग्रन्थांत श्रीरामदास सर्वत्र नटलेले असतांना, तुम्हांला कसे हो ते एकदां सुद्धां दिसले नाहींत आणि तुम्ही बेधडक लिहून गेलांत कीं, दास-बोधग्रन्थ श्रीसमर्थांनीं केल्याविषयीं दासबोधांत अणुमात्र आधार नाहीं ! आणखी हि पुष्कळ ठिकाणीं त्यांनीं स्वनामाचा उल्लेख केलेला आहे. पण तीं सारीं स्थळें निवडून काढण्याचें काम मी मुद्दाम तुम्हांकरितां राखून ठेवीत आहे. त्यांत माझा एक हेतु असा आहे कीं, या निमित्तानें तरी तुम्हांस ग्रन्थराजाचें एकवार पारायण घडून तुमच्या बुद्धींत फरक पडावा. परंतु तसें न होतां, तुम्ही जास्त च खड्डयांत पडण्याचा आपला हेका चाल-विला, तर तेथून हि आपणांस वर येण्यास मार्ग दाखविण्याला मजजवळ कांहीं आधार रहावा, असा माझा दुसरा हेतु आहे. दासबोधांत श्रीसमर्थांनीं आपले गुरु व इष्ट दैवत यांचा उल्लेख केलेला नाहीं, हें आपलें विधान फोल आहे, हें हि आपल्या निदर्शनास अनायासें येईल. मातापितरांचा मात्र दासबोधांत त्यांनीं उल्लेख केलेला नाहीं, पण तो दासबोधांत च तेवढा नाहीं आणि त्यांच्या इतर ग्रन्थांत आहे, असें थोडें च आहे, तर दासबोधांत तसा उल्लेख नाहीं म्हणून तो ग्रन्थ त्यांचा नाहीं, असें म्हणतां येईल ? कां इतर हि कोणता च ग्रन्थ अथवा प्रकरण त्यांचें नाहीं, असें विधान करण्यापर्यंत आपल्या न्यायसहृदतेचा पल्ला पोंचवून आपल्या मताचा कोणी तरी समानधर्मा केव्हां तरी आणि कोठें तरी जन्म घेईल, अशी वाट पहात बसणार आहांत !

दासबोधांत श्रीसमर्थांचें नांव कोठें च आलेलें नाहीं, असें जें शास्त्री-बावांना वाटत होतें तें चुकीचें ठरलें. **रामदास म्हणे** किंवा **दास म्हणे** असले प्रयोग दासबोधांत असतील, असें त्यांना वाटलें नव्हतें. कोणा तरी शिष्यानें दासबोध ग्रन्थ केला असून त्यानें खुशाल **रामदास म्हणे** किंवा **दास म्हणे** असे प्रयोग योजिले असतील, असें शास्त्रीबावा म्हणत नाहींत व वेड लागल्यावांचून तसें कोणी म्हणणार हि नाहीं. कोणा हि शिष्याची अशी काय प्राज्ञा होती कीं, श्रीसमर्थांच्या हयातींत किंवा लागलीं च नंतर तो आपण

च ग्रन्थ करून तो श्रीसमर्थांच्या नांवावर विकील! शक १६०६, १६१५, १६१६, १६१९, १६२०, १६२२, १६२४, १६३६, १६४८ इत्यादि शकांतील दासबोधाच्या प्रती आज हि उपलब्ध आहेत. श्रीसमर्थ स्वतः आपल्या इतर प्रकरणांत दासबोधग्रन्थाचा स्वकृत म्हणून उल्लेख करीत आहेत. आनंदवनभुवनांत तसा उल्लेख आपण नुकता च वर पाहिला व इतर हि कांहीं प्रकरणांत तसा उल्लेख असल्याचें इतक्यांत च पाहूं. शास्त्रीबावा, शिष्यानें केलेला ग्रन्थ खुशाल आपला म्हणून श्रीसमर्थांसारखे महापुरुष मिरवितील असा आरोप करण्याइतकी आपल्या हि मनाची खचित खचित अधोगती झाली नसेल! तशी झाली असेल तर मग, आपणांस राम राम! तात्पर्य, शास्त्रीबावांच्या इतर आक्षेपांना कांहीं च किंमत उरली नाहीं. फार तर आणखी तिसरा व पांचवा असे दोन आक्षेप खोडून हें प्रतिपादन पुरें करावें, असा मला मोह होत आहे. पण काय करावें ? या निरर्थक वादांत स्वतःचें आयुष्य खर्च केलें पाहिजे व वाचकांचें खर्चिलें पाहिजे, असा प्रसंग शास्त्रीबावांनीं आणला आहे. त्यांचा कोप न व्हावा व इतर प्रमाणें निरुत्तर करणारीं आहेत, असा त्यांचा भलता च ग्रह न व्हावा, म्हणून सर्व आक्षेपांचें क्रमशः निमूटपणें खंडण करणें मला भाग झालें आहे.

## आक्षेप दुसरा–

> रामदास हें नांव श्रीसमर्थांना प्रिय होतें, असें असतां त्यांनीं 'स्वकृत ग्रन्थाचें नांव **रामदासबोध** असें न ठेवितां **दासबोध** असें कां ठेविलें' ?

ठेविलें खरें, त्यांची चूक झाली. घ्या एवढी चूक पदरांत. त्यांना काय ठाऊक कीं, ख्रिस्ताच्या विसाव्या शतकांत 'जांबेपासून २० मैलांचे अंतरावर जामखेड' गांवीं एक शास्त्री जन्मास येऊन ते या नांवाबद्दल आपणांस जबाब विचारतील! पण, शास्त्रीबावा, या आक्षेपांत आपणांस तरी कांहीं हंशील वाटतें काय ? दासबोध याचा सरळ अर्थ एक च. दासबोध म्हणजे रामदासांनीं शिष्यांना केलेला बोध. आपणांस हि हा च अर्थ अभिप्रेत वाटतो. पण त्यावर आपलें म्हणणें असें आहे कीं, 'ज्यांनीं प्रीतीनें आपलें नांव रामदास ठेवून घेतलें, त्यांनीं ग्रन्थारंभीं तें प्रिय नांव सोडणें संभवनीय नाहीं.' या आपल्या अनुमानास प्रत्यंतर पुरावा म्हणून आपण म्हणतां कीं, 'त्यांचे स्फुट अभंग व पदें पहावीं, म्हणजे आढळून येईल कीं, **प्रत्येक पद्यांत** 'राम-

दास म्हणे ' हें वाक्य असतें च , क्वचित् स्थळीं ' दास म्हणे ' असें हि आढळतें, पण तें नियमित छंदाच्या अडचणीमुळें च होय. ' शास्त्रीबावा, आपण हा जो पुरावा सादर केला आहे, तो सपशेल खोटा आहे. असलें विधान केवळ अनुमानधपक्यानें आपल्या सारख्यानें असल्या महत्त्वाचे बाबतींत करणें हें ठीक नव्हे. श्रीसमर्थांचीं अप्रकाशित पदपदातरें बाजूस राहोंत, तीं विचारांत घेतलीं तर आपलें विधान केवळ पाचोळ्याप्रमाणें हवेंत उडून जाईल. परंतु प्रकाशित असा नुसता तिसरा भाग विचारांत घेतला, तरी असें आढळून येतें कीं, **रामदास म्हणे** यापेक्षां त्यांत **दास म्हणे** च जास्त वेळां आलेलें आहे. पण शास्त्रीबावा, ज्या दासबोधाच्या नांवाबद्दल तुम्ही हा एवढा वाद घालता, खुद्द त्या दासबोधांत जितक्या वेळां **रामदास म्हणे** आलें आहे, त्याच्या निदान दुप्पट वेळां **दास म्हणे** आलें आहे. आतां काय तुमचें म्हणणें आहे ? दासबोधांत तर नियमित छंदाच्या अडचणीचा फारसा प्रश्न नाहीं ना ? पण, शास्त्रीबावा, हें असलें पोरकट प्रमाण आपण पुढें आणावें व मला त्याचें उत्तर द्यावें लागावें, हें च मी तुमचें आणि माझें दुर्दैव समजतों.

## आक्षेप तिसरा–

> " रामदास कवि नव्हते. त्यांनीं कोणत्या हि शास्त्राचें किंवा भाषेचें अध्ययन केलें नव्हतें. त्यांची भाषा व छंदोभंगात्मक त्यांचीं पद्यें हा च वरील विधानाचा समर्पक पुरावा होय. भाषाशास्त्रकोविद कवि, साधनसंपत्तिबाहुल्यामुळें, एकदां प्रतिपादिलेला विषय भाषाकौशल्य दाखविण्याकरितां दुसरे वेळीं अन्य प्रकारें प्रतिपादूं शकेल. साधूचें तसें नाहीं. दासबोधांतील विषयानुरूप त्याची स्फुट कविता जर पूर्वी झाली होती तर कोणता हि विशेष नसतां त्या च विषयाचें पुनः प्रतिपादन करण्याचें कारण काय ? "

या अवघ्या नऊ ओळींत शास्त्रीबावांनीं किती असत्य विधानें केलीं आहेत, पहा. ( १ ) रामदास कवि नव्हते. ( २ ) त्यांनीं कोणत्या हि शास्त्राचें किंवा भाषेचें अध्ययन केलें नव्हतें. ( ३ ) एकदां प्रतिपादिलेला विषय दुसरे वेळीं अन्य प्रकारें प्रतिपादण्याची सवलत फक्त कवीला आहे, साधूला नाहीं. ( ४ ) स्फुट कवितेपेक्षां दासबोधांत निराळें कांहीं नाहीं.

( ५ ) पूर्वी स्फुट कविता झाली आणि मग दासबोध झाला. ( ६ ) स्फुट कवितेंतील विषयाचें पुनः प्रतिपादन करण्याचें कारण नव्हतें.

शास्त्रीबावा म्हणतात, रामदास कवि नव्हते. श्रीसमर्थांची सारी कविता वाचून तरी शास्त्रीबावा हें असें म्हणत आहेत काय? कोणास ठाऊक वाचून म्हणतात, कां रामभाऊ जोशी म्हणतात म्हणून आपण हि म्हणत आहेत!

कवित्व शब्दसुमनमाळा। अर्थ परिमळ आगळा।
तेणें संतषट्पदकुळा। आनंद होये ॥ १४-३-१
ऐसी माळा अंतःकरणीं। गुंफून पुजा रामचरणीं।
वोंकारतंत अखंडपणीं। खंडूं च नये ॥ २ ॥
परोपकाराकारणें। कवित्व अगत्य करणें।

असा उपदेश करणारे समर्थ कवि नव्हते!

जेणें घडे भगवद्भक्ती। जेणें घडे विरक्ती।
ऐसिया कवित्वाची युक्ती। आधीं वाढवावी ॥ ४ ॥
क्रियेवीण शब्दज्ञान। तया न मनिती सज्जन।
म्हणौनी देव प्रसन्न। अनुतापें करावा ॥ ५ ॥
देवाचेन प्रसन्नपणें। जें जें घडे बोलणें।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें। या नांव प्रासादिक ॥ ६ ॥

आधीं केलें मग सांगतले, ही ज्यांची प्रतिज्ञा ते श्रीसमर्थ कवि नव्हते!

वैभव कांता कांचन। जयास वाटे हें वमन।
अंतरीं लागलें ध्यान। सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥
जयास घडीनें घडी। लागे भगवंतीं आवडी।
चढती वाढती गोडी। भगवद्भजनाची ॥ २३ ॥
जो भगवद्भजनेंवीण। जाऊं नेदी येक क्षण।
सर्वकाळ अंतःकरण। भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥
जया अंतरीं भगवंत। अचळ राहिला निवांत।
तो स्वभावें जें बोलत। तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥
अंतरीं बैसला गोविंद। तेणें लागला भक्तिछंद।
भक्तीविण अनुवाद। आणीक नाहीं ॥ २६ ॥
आवडी लागली अंतरीं। तैसी च वदे वैखरी।
भावें करुणाकीर्तन करी। प्रेमभरें नाचतु ॥ २७ ॥
भगवंतीं लागलें मन। तेणें नाठवे देहभान।
शंका लज्जा पळोन। दुरी ठेली ॥ २८ ॥

तो प्रेमरंगें रंगला। तो भक्तिमदें मातला।
तेणें अहंभाव घातला। पायांतळीं ॥ २९ ॥
गात नाचत निशंक। तयास कैचे दिसती लोक।
दृष्टीं त्रैलोक्यनायेक। वसोन ठेला ॥ ३० ॥
ऐसा भगवंतीं रंगला। आणीक कांहीं नलगे त्याला।
स्वइछा वर्णू लागला। ध्यान कीर्ती प्रताप ॥ ३१ ॥

शास्त्रीबावा, यांत कोठें तुम्हांला श्रीसमर्थ दिसतात कां आणि यांत कवित्व आहे असें वाटतें कां ? कां समर्थ कवि नव्हते ही रामभाऊ जोशांची शिकवण तुमच्या बरोबर गळीं उतरलेली आहे. बरें झालें, शास्त्रीबावा समर्थांच्या वेळीं जन्मास आले नव्हते. नाहीं तर माया म्हणजे काय असें शास्त्रीबावा समर्थांना विचारतां च त्यांच्याकडे पाहून श्रीसमर्थ सांगते

करंटा पडोनि उताणा। करी नानापरी कल्पना।
परी तें कांहीं च घडेना। तैसी माया ॥ १४ ॥

आणि शास्त्रीबावा म्हणते, पटलें, तरी शिष्याला पटलें न पटलें असें वाटून समर्थांच्या कवित्वाचा प्रवाह पुढें च चालता कीं,

द्रव्यदारेचें स्वप्नवैभव। नाना विळासें हावभाव।
क्षणीक वाटे परी माव। तैसी माया ॥ ३ ॥
गगनीं गंधर्वनगरें। दिसताती नाना प्रकारें।
नाना रूपें नाना विकारें। तैसी माया ॥ ४ ॥
लक्ष्मी रायेविनोदाची। बोलतां वाटे साची।
मिथ्या प्रचित तेथीची। तैसी माया ॥ ५ ॥
दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे। लोक म्हणती परी ते कांटे।
परी सर्वत्र राहाटे। तैसी माया ॥ ६ ॥
मेल्याचा मोहोछाव करणें। सतीचें वैभव वाढवणें।
मसणीं जाउनी रुदन करणें। तैसी माया ॥ ७ ॥
राखेसी म्हणती लक्ष्मी। दुसरी भारदोरी लक्ष्मी।
तिसरी नाममात्र लक्ष्मी। तैसी माया ॥ ८ ॥
मुळीं बाळविधवा नारी। तिचें नांव जन्मसावित्री।
कुबेर हिंडे घरोघरीं। तैसी माया ॥ ९ ॥
दश अवतारांतलि कृष्णा।

असा त्यांचा प्रवाह चालता आणि शास्त्रीबावा त्यांना मध्यें च थांबविते कीं, तुम्हीं हें काय चालविलें आहे, एक च गोष्ट पुन्हः पुन्हः निरनिराळ्या

प्रकारानें सांगण्यास तुम्हीं कांहीं 'भाषाशास्त्रकोविद कवि' नाहीं आहांत, तुमच्या जवळ 'साधनसंपत्तिबाहुल्य' नाहीं, तुम्हांला 'कोणत्या हि शास्त्राचें किंवा भाषेचें अध्ययन घडलें' नाहीं, तुम्हीं आहांत साधु, तेव्हां तुम्हीं हें काय 'तैसी माया' 'तैसी माया' लावलें आहे. पण, शास्त्रीबावा म्हणतील, दासबोधांतल्या गोष्टी आम्हांस नका सांगूं, बाहेरच्या सांगा. हरकत नाहीं, पण त्यासाठीं सारीं करुणाष्टकें, सारी स्फुट कविता येथें उतरून तरी घेतली पाहिजे किंवा ती सर्व कविता वाचण्याची शास्त्रीबावांनीं तसदी घेतली पाहिजे. ही हि तसदी घ्यावयाची नसेल तर मग शास्त्रीबावा, श्रीसमर्थांच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची तुमची तयारी तरी पाहिजे. आहे कां तुमची तयारी! विचार करा, कठीण काम आहे. दुसऱ्यास मूर्ख म्हणून स्वतःस प्रमाणशरण म्हणविणाऱ्या तुम्हांस श्रीसमर्थांवर विश्वास टाकणें जरा जड जाईल! करा विचार. श्रीसमर्थांनीं च स्वतःचा 'कवि' म्हणून कांहीं ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. त्यांचें 'लघु रामायण' म्हणून एक लहानसें प्रकरण आहे. तें रामदासी तिसऱ्या भागांत आलें आहे. त्यांत आरंभीं गणेश, सरस्वती, संत, श्रोते यांना नमन करून सर्वांची श्रीसमर्थ प्रार्थना करितात कीं,

**समस्त ही मनीं धरा। कथा करीनसें करा।**
**लहानसा कवी नवा। रघोत्तमासि वीनवा॥**

तसें च, त्या च ग्रन्थांत दिलेलें 'भागवत' म्हणून दुसरें एक त्यांचें प्रकरण आहे. त्याचे शेवटीं श्रीसमर्थ म्हणतात

**रसीक भाव भावना। महंत आणितो मना।**
**अनंत गुण लाघवी। रसाळ गातसे कवी॥**

श्रीसमर्थ स्वतःला कांहीं हि म्हणोत, आमचे शास्त्री म्हणणार, ते कवि नव्हते! शास्त्रीबावा, इतक्याउपर श्रीसमर्थ कवि नव्हते, असें म्हणण्याला तुम्ही रसिक आहांत झालें, दुसरें काय म्हणावें तुम्हांला! एक च गोष्ट पुन्हपुन्हां प्रतिपादन करण्याचा हेतु शास्त्रीबावांना एक च दिसतो. तो कोणता? तर भाषाकौशल्य दाखविणें! दुसरा हेतु च या बिचाऱ्या प्रमाणशरण शास्त्र्याच्या डोक्यांत येत नाहीं! शास्त्रीबावा, श्रीसमर्थ कवि होते, साधु होते, इतकें च नव्हे तर ते आणखी पुष्कळ होते. ते महाराष्ट्रगुरु होते, ते एका स्वतंत्र संप्रदायाचे प्रवर्तक होते, त्यांचा शिष्यसंप्रदाय फार मोठा होता, त्यांचा

व्याप साऱ्या भरतखंडभर पसरला होता, त्यांना बहुतांचें मनोगत ह्यातीं । ध्यावयाचें होतें, त्यांना मतें मतांतरें सगट । सपाट करावयाचीं होतीं, आणि तुम्हांला तर भाषाकौशल्य दाखविण्यापलिकडे दुसरा हेतु सुचत नाहीं, तेव्हां तुम्हांला काय म्हणावें ?

शास्त्रीबावा, स्फुट कवितेपेक्षां दासबोधांत निराळें कांहीं नाहीं असें तुम्ही म्हणता. त्या तुम्हांस मी उलट प्रश्न विचारतों कीं, स्फुट कवितेपुढें तुम्हांला दासबोधाची कांहीं मातबरी वाटत नाहीं काय ? स्फुट कवितेपेक्षां दासबोधांत कोणता हि विशेष नाहीं काय ? दासबोधांत जी राजकारणाची शिकवण आहे ती मला स्फुट कवितेंत दाखवा, दासबोधांत विवेकवैराग्याची जी सांगड घातलेली आहे ती स्फुट कवितेंत दाखवा, प्रपंचपरमार्थाची एकरूपता दाखवा, बद्धमुमुक्षुसाधकसिद्धलक्षणें दाखवा, चवदाव्या दशकाच्या पहिल्या समासांतील निस्पृहलक्षणें दाखवा, ब्राह्मणांना शिकविलेल्या शहाणपणाच्या गोष्टी दाखवा, अजपाजप दाखवा, चौदा ब्रह्में दाखवा, ईश्वराचें देणें दाखवा, अष्टदेहांचें इतकें सुलभ प्रतिपादन दाखवा ! या क्षणाला डोळ्यापुढें नुसता दासबोध येत असल्यामुळें व स्फुट कविता किंचित् मागें सरकल्यामुळें, न जाणों, मी जें जें दाखवा म्हणून म्हणत आहे, त्यांपैकीं खरोखर च तुम्ही कांहीं कदाचित् दाखवूं शकाल ! म्हणून विचारतों, दासबोधांतील निदान विवेचनपद्धति तरी स्फुट कवितेपेक्षां भिन्न आहे ना ? असें असतां कवितेपेक्षां दासबोधांत काय निराळें आहे, असें आपण म्हणावें, हें विचित्र होय.

तसें च, शास्त्रीबावा, तुम्हांस हें कोणी सांगितलें, अथवा तुम्ही हें कशावरून म्हणता कीं, दासबोधांतील विषयानुरूप त्यांची स्फुट कविता पूर्वी झाली होती ? हें विधान असत्य आहे हें, आपण ती कविता काळजीपूर्वक वाचली असती तर, आपल्या हि सहज लक्ष्यांत आलें असतें. मी आपणांस अशीं कांहीं स्थळें दाखवितों. त्यांवरून दोन गोष्टी सिद्ध होतील: एक, दासबोध आधीं झाला आणि मग तीं स्फुट प्रकरणें झालीं आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट त्यांवरून सिद्ध होणार आहे ती अशी कीं, दासबोधाचा कर्ता कोण या आपल्या प्रश्नाचें उत्तर आपण श्रीसमर्थांच्या च मुखानें ऐकाल. शास्त्रीबावा, केवढें तुमचें भाग्य कीं, तुम्ही ज्या संशयांत बुडूं पहात आहां तेथून तुम्हांस काढण्यासाठीं श्रीसमर्थ स्वतः धांवून येत आहेत ! पण ते आले म्हणजे त्यांच्या कडे तुमच्यानें बघवेल ना ? कां तुम्हांला तारण्यासाठीं

त्यांनीं हात पुढें केला असतां तुम्ही जास्त च आडरानांत शिराल ! काय तुमचें ओढवलें असेल तें खरें ! तूर्त तुम्ही मोठे भाग्यवान् आहांत, असें आम्हां तिऱ्हाइतांना दिसतें, कारण तुमची संशयनिवृत्ति व्हावी म्हणून श्रीसमर्थ स्वतः साक्षीस येत आहेत ! शास्त्रीबावा, इतर हि कांहीं दहा पांच साक्षीदार आपणांपुढें लवकर च आणून उभे करितों, तसें च ज्या दोन तीन साक्षीदारांना तुम्ही नुसतें घुडकावून दिलें आहे, तें हि आपलें करणें कसें चुकीचें आहे हें हि लवकर च आपणांस दाखवितों. तत्पूर्वी, या च आक्षेपाच्या खंडणप्रसंगीं श्रीसमर्थांची साक्ष सादर करण्यास आपली परवानगी मागतों. शास्त्रीबावा, असें करण्याला मला मोठी भीति वाटते, कारण बखरकार हनुमंतस्वामी, दासविश्रामधामकर्ते आत्मारामम्हाराज, प्रतापवर्णनकार गिरिधर यांची आपण कांहीं च पत ठेवली नाहीं, ते आपण, शास्त्रीबावा, श्रीसमर्थांना तरी मानाल ना ? काय सांगावें, मनुष्य एकदां क्रोधवश झाला म्हणजे काय करील याचा नेम नसतो. म्हणून भीत भीत च श्रीसमर्थांना हरेस घालण्याचा मी विचार करीत आहे ! शास्त्रीबावा, आनंदवनभुवन प्रकरणांत श्रीसमर्थांनीं ग्रन्थराजाचा उल्लेख केल्याचें तुम्ही नुकतें च पाहिलें, आतां आणखी दोन चार स्थळें सादर करितों. त्यांवरून, आपण सहाव्या आक्षेपाचे शेवटीं जो सिद्धान्त काढला आहे तो आपोआप खोटा ठरेल.

( १ ) शास्त्रीबावा, श्रीरामदासांच्या स्फुट कवितेचें २५६ वें पान काढा. पंचमानप्रकरणाच्या शेवटच्या दोन ओव्या वाचा.

> हें ज्ञान रामकृपेनें । धन्य रामउपासना ।
> रामदास्य घडे ज्याला । ते सर्वत्र रामदास हो ॥ २२ ॥
> येकसे बत्तिसां श्लोकीं । साधकें पाहाणें बरें ।
> आध्यात्म शोधणें सर्वै । दासबोधीं समाप्यते ॥ २३ ॥

सांगा हें प्रकरण आधीं, कां दासबोध आधीं, आणि सांगा दासबोधाचा कर्ता कोण ?

( २ ) त्या च ग्रन्थाचें ४१७ वें पान काढा. वाचा,

> विधी तो पुत्र विष्णूचा । शारदा ब्रह्मकुमरी ।
> बोलिलें हें दासबोधीं । मानपंचकीं बरें पाहा ॥

सांगा, शास्त्री, हें प्रकरण आधीं कां आधीं दासबोध आणि दासबोध कोणी केला ?

( ३ ) पुढचें च ४१९ वें पान पहा.

**पुण्याचें रूप तें कैसें । हें चि आधीं कळेचिना ।**
**सर्व हि निर्णय जेथें । तो चि ग्रन्थ बरा ॥ ३१ ॥**

शास्त्रीबावा, तो ग्रन्थ तुम्ही बरा पाहिला असतां तर कोठून ह्या फेऱ्यांत स्वतः पडता आणि दुसऱ्याला पाडता ! नशीब तुमचें आणि तुमच्या बरोबर तुमच्या वाचकांचें ! मागें आनंदवनभुवनांत दासबोधाचा उल्लेख करितांना श्रीसमर्थांनीं त्याला नुसतें **ग्रन्थ** म्हटलेलें आपण पाहिलें, तसें च येथें हि म्हटलें आहे. **कल्याण** हि दासबोधाला **ग्रन्थ** म्हणत. हा च आमचा **ग्रन्थसाहेब** !

( ४ ) शास्त्रीबावा, श्रीसमर्थांचें एक **आत्माराम** म्हणून लहानसें च, पण ब्रह्मांडाच्या मोलाचें प्रकरण आहे, तें तुम्हास ठाऊक आहे काय ? बहुधा नाहीं, असतें तर कशाला तुम्ही संशयांत पडता ! ' प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दासबोधाचा व्यवसाय ( दासबोधाचा व्यवसाय म्हणजे तुम्ही काय म्हणता, ईश्वर जाणे ! ) चालवून महती मिळविणाऱ्या ' व तुमच्या अवकृपेस पात्र झालेल्या सत्कार्योत्तेजक सभेनें तें प्रकरण अजून छापलें नाहीं. पण, श्रीसमर्थांचे समग्र ग्रन्थ म्हणून जो ग्रन्थ दोघां तिघां प्रकाशकांनीं छापलेल आहे, त्यांत तें प्रकरण आलेलें आहे. तें प्रकरण अत्यन्त महत्त्वाचें आहे व त्यावर आतां तुम्ही शस्त्र घेऊन केव्हां उठता, याची तें वाट पहात आहे. श्रीसमर्थांचे सारे उपग्रन्थ आतां चळचळ कांपत आहेत कीं, जेथें खुद्द ग्रन्थराजावर हा महात्मा उठला तेथें आतां आपली सुटका कोठून होणार ! धन्य आहे, शास्त्री, धन्य आहे तुमची ! श्रीसमर्थांच्या ग्रन्थांवर हत्यार चालविण्याच्या मिषानें तरी तुम्हांस त्या ग्रन्थांचा निदिध्यास लागला आहे, तेव्हां धन्य आहे तुमची ! आपल्या वज्राघातानें विव्हल झालेल्या श्रीसंप्रदायिकांचा **आत्माराम** जीव कीं प्राण आहे ! शिष्यांची चिंता करणाऱ्या श्रीसमर्थांनीं तो ग्रन्थ आपण होऊन सांगितला आहे. दासबोध ग्रन्थ सांगितला तरी अजून कोणी शिष्य कोरडाच्या कोरडा च राहिलेला पाहून श्रीसमर्थांनीं **आत्मारामरूपानें** त्या शिष्यावर कृपेचा वर्षाव केला आहे. श्रीसमर्थ म्हणतातः

**दासबोधींचे समासीं । निर्मूळ केलें मीपणासी ।**
**त्या निरूपणीं वृत्तीसी । पालट दिसेना ॥ १-२०**
**म्हणोनी न पुसतां सांगणें । घडलें शिष्या तुजकारणें ।**
**आतां तरी सोय धरणें । श्रवणमननीं ॥ १-२१**

शास्त्रीबावा, सांगा आत्माराम आधीं कां आधीं दासबोध आणि दासबोध-ग्रन्थ श्रीसमर्थांचा कां दुसऱ्या कोणाचा.

## आक्षेप चवथा–

> " दासबोध व स्फुट कविता यांत विषयाच्या तरतमभावानें फरक पाहूं गेल्यास स्फुट कवितेंत रामभक्ति विशेष प्राधान्यानें दृष्टोत्पत्तीस येते व ती रामदासशीलानुरूप च होय. परंतु दासबोधांत या रामदासजीवितसर्वस्वप्रधान विषयास अत्यंत संक्षेप मिळाला आहे. "

दासबोधग्रन्थ श्रीसमर्थांचा नाहीं, असें शास्त्रीबावांच्या मनानें एकदा घेतल्यामुळें त्यांचा नुसता ' दृष्टिकोण ' बदलला इतकें च नव्हे तर सारी दृष्टि च फिरली आहे, त्यामुळें इतरांच्या दृष्टीला जें दिसतें तें शास्त्रीबावांच्या दृष्टीला दिसेनासें झालें आहे व जें इतरांना दिसत नाहीं ते यांना दिसतें. इतरांच्या दृष्टीला स्फुट कवितेंत काय आणि दासबोधांत काय, श्रीरामभक्ति सारखी च ओतप्रोत भरलेली दिसते, पण शास्त्रीबावांच्या दृष्टीला तरतमभावानें स्फुट कवितेंत रामभक्ति जास्त दिसते आणि दासबोधांत तिचा ' अत्यन्त संक्षेप ' झालेला दिसतो. वाचकांनीं दोन्ही ग्रन्थ स्वतः वाचल्यावांचून या वादाचा निर्णय कसा व्हावा ? दासबोधांतील रामभक्तिपर असे शंभर हि उतारे सहज देतां येतील ! पण उतारे किती द्यावे आणि किती देऊन भागेल ? यासाठीं दोन्ही ग्रन्थ स्वतः वाचून वाचकांनीं निर्णय केला पाहिजे. दासबोधांत रामभक्तीचा ' अत्यन्त संक्षेप ' झाला आहे, असें शास्त्री म्हणतात ! दासबोधांत बोलून चालून बहुधा अध्यात्मनिरूपण आहे. तेव्हां मायाब्रह्माचें विवरण लागलें किंवा पंचीकरणाचा विषय निघाला किंवा श्रीसमर्थ आपल्या ' जीवींचें गुज ' म्हणजे अहंब्रह्मास्मि महावाक्य सांगूं लागले म्हणजे त्यांत रामभक्तीला कोठून अवसर मिळणार ? याला च शास्त्रीबावा रामभक्तीचा संक्षेप म्हणतात ? स्फुट कवितेंत हि कृष्णभक्ती आहे ( पृ. १८७ ते १९१,४९० ते ९१ ), गणेशभक्ति आहे ( पृ. २१७–१८ ), शारदाभक्ति आहे ( पृ. ४६८–७० ) तुळजाभवानीची भक्ति आहे ( पृ. ३९१–९६, ४१२–१५, ४२५–२६, ४३४–३८ ), सर्व देवांची भक्ति आहे ( पृ. २१२, ३४५–४७ ) ही गोष्ट शास्त्रीबावांच्या लक्ष्यांत आली नाहीं काय ? तसें च सबंध दासबोध म्हणजे च एक ग्रन्थसुमनमाळा असून ती श्रीसमर्थांनीं श्रीरामचरणीं अर्पण असल्यामुळें तींत सर्वत्र दरवळलेला

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थांचा हि समर्थ । देवां सोडविता ॥ २६ ॥
त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान ।
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २२ ॥
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ।
तेणें चि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥ २८ ॥
मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघें चि नासोन जातें ।
कृपा केलियां रघुनाथें । प्रचित येते ॥ ३० ॥
रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाटलें ।
म्हणौनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ॥ ३१ ॥
याकारणें रघुनाथभजन । त्यासी मानिती बहुत जन ।
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ॥ ३९ ॥

इत्यादि असंख्य सुगंधित पुष्पांचा आल्हादकारक परिमल शास्त्रीबावांच्या पर्यंत कधीं पोंचला च नाहीं काय ?

**आक्षेप पांचवा—**

" श्रीरामदास महाराजांचीं जीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत गिरिधरस्वामीकृत **समर्थप्रताप**, आत्मारामकृत **दासविश्रामधाम**, हणमंतस्वामी यांची **बखर** व **स्वानुभवदिनकर** अशीं चार प्रमुख आहेत. त्यांत क्रमानें पहिले तीन चरित्रकार रामदासांचे प्रत्यक्ष शिष्य नाहींत व समकालीन हि नाहींत.

"समर्थप्रतापकार गिरिधर हे शिष्यपरंपरेनें रामदासांपासून चवथे आहेत. त्यांचे ग्रन्थांत दासबोधाचा साधारण उल्लेख आहे, पण तो कर्णोपकर्णीं ऐकीव माहितीपेक्षां जास्त महत्त्वाचा नाहीं. कारण त्यांचे ( समर्थप्रतापांत तर नाहीं च ) इतर ग्रन्थांतून दासबोधांतर्गत दशकें किंवा समास यांचीं जीं नांवें दिलीं आहेत तीं हल्लीं कल्याणमहाराजांच्या हस्तलिखित प्रतीवरून छापलेल्या किंवा इतर प्रसिद्ध झालेल्या प्रतींतील नांवांशीं जुळत नाहींत. म्हणून तें चरित्र प्रमाण मानणें योग्य नाहीं.

" दासविश्रामधामकर्ते आत्मारामहाराज हे शिष्यपरंपरेनें समर्थांपासून सहावे आहेत. त्यांचें चरित्रलेखन म्हणजे साधूंचें अलौकिकचमत्कृतिरसप्रधान भाविक कथन होय. त्यांतून पुरावा घेण्यासारखें कांहीं च नाहीं.

" तिसरे हणमंतस्वामी, हे हि समर्थांपासून सातवे होत. अर्थात् त्यांनीं लोकांकडून माहिती घेऊन बखर लिहवून ठेविली असल्यानें ती ऐकीव च होय.

" सारांश, वरील तिघे हि चरित्रकार भाविक लोकांच्या तोंडीं ऐकिलेल्या माहितीच्या द्वारें आपल्या ग्रन्थांत लिहीत गेल्यामुळें त्यांनीं केलेला उल्लेख विचारार्ह नाहीं.

" चवथे चरित्रलेखक तिसगांवमठाधिपति स्वानुभवदिनकरकार दिनकर हे होत. त्यांचा लेख प्रमाण मानणें भाग आहे. कारण ते समर्थांचे प्रत्यक्ष शिष्य असून मोठ्या योग्यतेचे होते. x x x दिनकरांनीं आपला स्वानुभवदिनकर ग्रंथ शके १६१६ सालीं संपविला. त्या स्वानुभवदिनकरांत दिनकारांनीं आपले परमपूज्य गुरु रामदास यांचें चरित्र त्रोटक पण मुद्देसूद लिहिलें आहे. त्यांत रामदासांनीं दासबोध केल्याविषयीं उल्लेख नाहीं.

(१) स्वानुभवदिनकरास आधारभूत जे ग्रन्थ घेतल्याचें नमूद केलें आहे त्यांत हि दासबोधाचा उल्लेख नाहीं.

(२) दिनकरांनीं विवेचनार्थ दासबोधांतील एकादें हि वाक्य घेतल्याचें त्यांचे ग्रन्थांत दिसत नाहीं.

(३) रामदासांचीं इतर स्फुट प्रकरणें त्यांनीं लिहिलेलीं त्यांचे संग्रहांत आहेत. त्यांनीं दासबोध लिहून घेऊन संग्रह करण्याचा आळस करणें संभवनीय नाहीं.

(४) श्रेष्ठांचे भक्तिरहस्य व सुगमोपाय हे दोन्ही ग्रन्थ त्यांनीं स्वहस्तें लिहून संग्रहित केलेले त्यांचे संग्रहांत आहेत.

(५) शोधक दृष्टीनें स्वानुभवदिनकर वाचीत असतां त्यांत भक्तिरहस्य व सुगमोपाय या ग्रन्थांतील छाया स्पष्ट दृग्गोचर होते. तशी दासबोधांतील नाहीं.

(६) त्यांचे मठांत त्यांचे वेळचा दासबोध मात्र नाहीं.

" यावरून दासबोध रामदासांचे हयातींत लिहिला गेला च नसावा, असें अनुमान होतें "

स्वानुभवदिनकर हा चरित्रग्रन्थ आहे, असें शास्त्री म्हणतात, याचें आश्चर्य वाटतें व त्यांनीं तो ग्रन्थ वाचला तरी आहे काय, अशी शंका येते. स्वानुभवदिनकर हा केवळ अध्यात्मग्रन्थ असून त्याच्या सोळाव्या कलापांतील चवथ्या किरणांत आपणांस १५७६ त श्रीसमर्थांचा अनुग्रह कसा झाला याची हकिकत सांगून खुद्द श्रीसमर्थांना जांबेस च श्रीरामदर्शन कसें झालें होतें, याचें दिनकरांनीं प्रसंगोपात्त वर्णन केलें आहे. या शिवाय त्या ग्रन्थांत श्रीसमर्थचरित्राचा कोणता च भाग आलेला नाहीं. असें असतां, या किरणास हि जेथें श्रीसमर्थचरित्र म्हणतां येणार नाहीं, तेथें शास्त्रीबावांनीं सबंध ग्रन्थाची गणना श्रीसमर्थचरित्रांत करावी हें कशाचें लक्षण समजावें ? १५७६ त घडलेल्या प्रसंगाची ज्या कलापांत हकिकत आली आहे त्यांत १५८१ त लिहिलेल्या दासबोधाचा उल्लेख कसा यावा, हें त्यांचें त्यांना च माहीत ! स्वानुभवदिनकरांत दासबोधाचा उल्लेख नाहीं, असें शास्त्री म्हणतात, पण जेथें सबंध स्वानुभवदिनकरांत सबंध दासबोध उतरला आहे, तेथें नामनिर्देशाची मातब्बरी काय उरली ? स्वानुभवदिनकरावर सर्वत्र दासबोधाची छाया कशी पडली आहे, हें मी लवकर च दाखवितों. त्यांतून स्वानुभवदिनकरांतील पृष्ठें २२२–२४, २६२, २६८, ३४६, ३७०, ४१५, ४३० वाचीत असतां दिनकर दासबोधाचा च तर निर्देश करीत नाहींत ना असें माझ्या मनांत आलें, तें बरोबर आहे किंवा कसें, हें वाचकांनीं च ठरवावें.

जसा स्वानुभवदिनकरग्रंथ दिनकरांचा आहे, तशी त्यांची स्फुट कविता आहे, ती शास्त्रीबावांनीं पाहिली सुद्धां नाहीं. सदरहु स्फुट कविता रामदासी ग्रन्थमालेंतील भाग १६ वा म्हणून प्रसिद्ध आहे. तींत दिनकरांनीं दासबोधाचा उल्लेख केलेला असल्यास तो शास्त्रीबावांना चालेल ना ? श्रीरामर्थांना नमन करितांना दिनकर म्हणतात:—

प्रवृत्तीस संरक्षिते स्वाश्रमीचे ।
महानिश्चयीं छेदिते संशयाचे ।
समाधिस्थसाम्राज्य संवादखाणी ।
नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥ पृ. ९

यांत दासबोधाचा संबंध निर्विवाद आणलेला आहे. यांतील **महानिश्चयी, संशयाचे छेदिते** आणि **संवादखाणी,** हीं तीन विशेषणें तर दिनकरांना दासबोधावरून च सुचलेलीं दिसतात. दासबोधाचा प्रस्तावनारूप जो पहिला समास आहे, तेवढा तरी निदान श्रीसमर्थांचा न ठरो, अशी आमच्या शास्त्रीबावांना फार तरमळ लागली आहे, पण काय करावें, हीं तिन्हीं विशेषणें शास्त्रीबावांना तशीं च तळमळत ठेवणार, असें दिसतें, कारण तीं नेमकीं त्या च पहिल्या समासावरून दिनकरांनीं घेतलेलीं आहेत. दासबोधांत

**मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्ध ज्ञानाचा निश्चयो ।**
**आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ॥ १-१-५**
**शुद्ध उपदेशाचा निश्चयो । सायोज्यमुक्तीचा निश्चयो ।**
**मोक्षप्राप्तीचा निश्चयो । बोलिला असे ॥ ६ ॥**
**शुद्ध स्वरूपाचा निश्चयो । विदेहस्थितीचा निश्चयो ।**
**अलिप्तपणाचा निश्चयो । बोलिला असे ॥ ७ ॥**
**मुख्य देवाचा निश्चयो । मुख्य भक्ताचा निश्चयो ।**
**जीवशिवाचा निश्चयो । बोलिला असे ॥ ८ ॥**
**मुख्य ब्रह्माचा निश्चयो । नाना मतांचा निश्चयो ।**
**आपण कोण हा निश्चयो । बोलिला असे ॥ ९ ॥**

इत्यादि **निश्चय** केलेले आहेत आणि म्हणून दिनकर श्रीसमर्थांना **महानिश्चयी** म्हणत आहेत. तसें च दासबोधांत

**नाना संशयो छेदिले ॥**

आहेत आणि म्हणून दिनकर श्रीसमर्थांना **छेदिते संशयाचे** म्हणत आहेत. तसें च दासबोधांत

**गुरुशिष्यांचा संवाद ॥**

आहे, आणि म्हणून श्रीसमर्थांना **संवादखाणी** या विशेषणानें दिनकरांनीं संबोधिलें आहे. **महा निश्चयी, छेदिते संशयाचे, संवादखाणी,** हीं विशेषणें ज्या समासाच्या अनुरोधानें घेतलेलीं दिसतात, तो समास आणि तो ग्रन्थ यांचा उल्लेख दिनकर येथें करीत आहेत, हें शास्त्रीबावाखेरीज इतरांना मान्य होईल, असें वाटतें. पण इतकें कशाला, दासबोधाचा स्पष्ट उल्लेख च दुसऱ्या एका ठिकाणीं दिनकरांनीं केलेला आहे. दिनकरांच्या स्फुट कवितेच्या २१४ व्या पृष्ठावर दिनकरांचें जें १४५ वें पद आलें आहे, त्याचा शेवट असाः

श्री दिनकर रामीं राम ।
दासबोधें स्वस्ति क्षेम ।
असंभाव्य अनुपम्य ।
महावाक्यार्थें ॥ ३ ॥

तेव्हां दिनकरांनीं स्वानुभवदिनकरांत दासबोधाचा निर्देश केला नाहीं, असें जरी मानलें, तरी त्याचें कांहीं च महत्त्व उरत नाहीं.

दिनकरांच्या ग्रन्थाविषयीं व मठाविषयीं ज्या सहा गोष्टी शास्त्री-बुवांनीं नमूद केलेल्या आहेत, त्यांची आधीं वासलाद लावून मग आपण समर्थप्रताप, दासविश्रामधाम व बखर यांचे कडे वळूं.

( १ ) आधारभूत ग्रन्थांत कोणत्या च प्राकृत ग्रन्थांचा उल्लेख नस॰ त्यामुळें दासबोधाचा हि उल्लेख नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. कलाप ९, किरणें ४ व ५ यांत ज्ञानेश्वरींतील ओंव्यांच्या ओंव्या शब्दशः उतरून घेत-ल्या असून हि आधारभूत ग्रन्थांत ज्ञानेश्वरीचा उल्लेख नाहीं. तसा च तो दासबोधाचा हि नाहीं. बाकी स्वानुभवदिनकरास मुख्य आश्रय श्रीगुरूचा आहे, हें दिनकरांनीं आपल्या ग्रन्थांत आरंभीं च सांगितलें आहे, तिकडे शास्त्रीबोवांचें लक्ष जावें.

( २ ) व ( ५ ) हीं शास्त्रीबावांचीं विधानें त्याचें अज्ञान प्रगट करितात. त्यांवरून असें म्हणण्यास मुळीं च हरकत वाटत नाहीं कीं, श्रीसम-र्थांवर उठलेल्या या विद्यामयूराचें, दासबोध व स्वानुभवदिनकर या दोन्ही ग्रन्थांचें वाचन फार च उथळ आहे. ' शोधक दृष्टीनें स्वानुभवदिनकर वाचीत असतां त्यांत ' भक्तिरहस्य व सुगमोपाय या श्रेष्ठांच्या ग्रन्थांची छाया शास्त्रीबावांस स्पष्ट दिसते, पण तशी दासबोधाची दिसत नाहीं. शास्त्री-बावांची ही शोधक दृष्टि फार च अपूर्व म्हटली पाहिजे ! दासबोध व स्वानु-भवदिनकर या दोन्ही ग्रन्थांचा ज्याला परिचय आहे त्याच्या तेव्हां च लक्षांत येईल कीं, स्वा. दि. ग्रन्थाची एकंदर रचना च मुळीं दासबोधावरून केलेली आहे. दासबोधांतील बहुतेक कल्पना जशाच्या तशा स्वा. दिनकरांत घेतलेल्या आहेत, इतकें च नव्हे, तर कित्येक वाक्येंचीं वाक्यें शब्दशः उतरून घेतलेलीं आहेत. ' श्रेष्ठांच्या ग्रन्थांची छाया स्वानुभवदिनकरांत दृग्गोचर होते, तशी दासबोधांतील नाहीं ' असें म्हणण्यांत शास्त्रीबावांचा मतलब काय आहे तो उघड आहे. त्यांचें सरळ म्हणणें असें कीं, दासबोध ग्रन्थ जर समर्थांचा असता, तर त्याची छाया स्वा. दि. वर हटकून पडली

असती. तशी ती पडलेली शास्त्रीबावांना दिसत नाहीं आणि म्हणून त्यांचें म्हणणें कीं, दासबोध हा रामदासांचा ग्रन्थ नव्हे. आपण जर आतां त्यांना दाखवूं शकूं कीं, दासबोधाची छाया स्वा. दि. वर सर्वभर पसरलेली आहे, तर दासबोधग्रन्थ श्रीसमर्थांचा होय, असें म्हणण्यास शास्त्री कबूल होतील. उभय ग्रन्थांतील समानार्थक कांहीं विचार व समवाक्यें शास्त्रीबावांच्या परिशीलनार्थ येथें सादर करितों.

| | स्वानुभवदिनकर | दासबोध |
|---|---|---|
| १ | ग्रन्थ संपूर्ण पाहिलियांवीण। ग्रंथासी उगें चि नेदिजे दूषण ॥ १ १/१० | पूर्ण ग्रन्थ पाहिल्याविण। उगा च ठेवी जो दूषण ॥ १ १/२२ |
| २ | अहो जो संसारासी प्राणी आला। तो सर्वं चि स्वार जाला ॥ २ १/३१ | संसार म्हणिजे सर्वं चि स्वार ॥ ३ १/६ |
| ३ | कलाप २, किरणें १ व २ यांतील संसारदुःख व स्त्रीसुख यांचें वर्णन | दशक ३, समास १ ते ५ |
| ४ | कलाप २, किरण ५ यांतील त्रिविधताप | दशक ३, समास ६ ते ८ |
| ५ | मी जी संसारसंगें बहुत श्रमलों। त्रिविधतापें पोळलों ॥ ३ १/२ | तैसा संसारें दुःखवला। त्रिविधतापें पोळला ॥ ३ ६ |
| ६ | थोंटा पांगुळ अंध बहिरा।<br>पिसा वेडा समंधी फेंफरा।<br>मुका रोगी अत्यंत तोतिरा।<br>तरी तो नरदेह व्यर्थ ॥ २ १/३१<br>हतुकिया अवलक्षणांवेगळा।<br>नरदेह वर्णविशेषें आगळा ॥ | नरदेह पांगुळ असता।<br>तरी तो कार्यास न येता।<br>अथवा थोटा जरी असता।<br>तरी परोपकारास नये ॥ १ १/२८<br>नरदेह अंध असिला।<br>तरी तो निपट चि वायां गेला।<br>अथवा बधिर जरी असिला।<br>तरी निरूपण नाहीं ॥ २९ ॥<br>नरदेह असिला मुका। |

| | | |
|---|---|---|
| | | तरी घेतां नये आशंका ।<br>अशक्त रोगी नासका ।<br>तरी तो निःकारण ॥ ३०<br>नरदेह असिला मूर्ख ।<br>अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख ।<br>तरी तो जाणावा निरार्थक ।<br>निश्चयेंसीं ॥ ३१<br>इतुकें हें नस्तां वेंग ।<br>नरदेह आणी सकळ सांग ॥ |
| ७ | अहो बहुतां जन्मांचे सेवटीं । नरदेह प्राप्त होय अवचटीं ॥ ४$\frac{२}{९३}$ | बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ॥ ११$\frac{३}{९}$ |
| ८ | कलाप ४, किरण २ यांतील नरदेहवर्णन | १×१०, ३×१०, ८×७, २०×६ |
| ९ | जरी गुरु केला वर्णहीन । तरी कैसें करावें तीर्थप्रसादप्राशन ॥ ४$\frac{१}{५६}$ | ब्रह्मसभे देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां । अथवा प्रसाद सेवितां । प्राश्चित पडे ॥ ५$\frac{२}{५८}$ |
| १० | क. ४ कि. ४ यांतील शिष्यलक्षणें | ५×२ |
| ११ | असो सावध साक्षपी कां जे दक्ष । सारासारविचारी जे प्रत्यक्ष । ते तत्काळ चि पावती निजमोक्ष । सद्गुरुकृपावसरें ॥ ४$\frac{४}{७८}$ | सावध साक्षपी आणी दक्ष । तयास तत्काळ चि मोक्ष ॥ ८$\frac{१}{४४}$ |
| १२ | जो सावध साक्षपी आणि दक्ष । तयासी तत्काळ चि प्राप्त मोक्ष ॥ ११$\frac{३}{५४}$ | (११ प्रमाणेच) |
| १३ | तरी आतां गुरुत्वाचें अधिष्ठान । विचारितां सर्वांचा गुरु ब्राह्मण । वर्णानां ब्राह्मणो गुरु हें वचन । शास्त्रांतरीं प्रसिद्ध ॥ ४$\frac{५}{१६}$ | ब्रम्हज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राम्हणासी च अधिकारु । वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥ १४$\frac{०}{३०}$ |

| | | |
|---|---|---|
| १४ | म्हणौनि सकळांसी गुरु ब्राह्मण ।<br>ऐसें वेदवचन प्रमाण ॥ ४ ५/१७ | सकळांसी पूज्य ब्राह्मण ।<br>हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण ॥ ५ १/१० |
| १५ | क. ५ कि. १ ओवी ३ ते ७ | ५×१ व २ |
| १६ | मनाचा न चले तर्क विचार<br>॥ ६ ३/१ | न चले तर्काचा विचार ॥ ५ ६/४ |
| १७ | पिंडें प्रचितशब्दें विश्वास<br>॥ ६ ३/१४ | पिंडें प्रचितशब्दें जाण ।<br>विश्वासासी ॥१०-४-८ |
| १८ | हे गोष्टी प्रगट बोलतां नये ।<br>बोलतां घडती नाना अपाय<br>॥ ६ ३/१५ | हें उघड बोलतां नये ।<br>मोडों पाहातो उपाये ॥ ८ ३/१५ |
| १९ | ब्रह्माआदिकरूनि हरिहर ।<br>हे ज्या देवाचे नित्य किंकर ।<br>त्यासी ज्याचा ध्यास तो सर्वेश्वर ।<br>वोळखोनि भजावा ॥ ६ ५/३ | ब्रह्मा विष्णु आणि हर ।<br>त्यांसी निर्मिता तो चि थोर ।<br>तो वोळखावा परमेश्वर ।<br>नाना येत्नें ॥ ६-१-१२ |
| २० | जऱ्ही ब्राह्मण असला हीन दीन ।<br>अनाचारी अत्यन्त मळिण ।<br>तऱ्ही शूद्रासी सहसा पूज्य पावन ।<br>गुणदोषदर्शनीं नर्कप्राप्ति ॥ ६ ६/२ | गुरु तों सकळांसी ब्राह्मण ।<br>जऱ्हीं तो जाला क्रियाहीन ।<br>तरी तयासी च शरण ।<br>अनन्यभावें असावें ॥ ५ १/६ |
| २१ | कां तो बहुरूपीचा रामदेराव ।<br>असत्य परि सत्यत्वें दाखवितां<br>टेव ॥ ११ १/८ | बहुरूपांतील रामदेराव ।<br>ग्रामस्तांपुढें दाखवी हावभाव ॥ १४ १/११ |
| २२ | ऐसया सर्वज्ञ श्रीगुरूसी ।<br>शरण रिघोनि निजभावेंसीं ।<br>विचारूनियां मुख्य देवासी ।<br>मी कोण हें पुसावें ॥ ११ ७/३ | सद्गुरुसी काये पुसावें ।<br>हें हि कळेना स्वभावें ।<br>अनन्यभावें येकभावें ।<br>दोनी गोष्टी पुसाव्या ॥ १२ ३/३<br>दोनी गोष्टी त्या कोण ।<br>देव कोण आपण कोण ॥ |
| २३ | सीरानाडीनें गुंडाळिलें<br>॥ ११ ८/८ | सीरानाडीं गुंडाळिला ॥ ३ १/१६ |
| २४ | जेथें देखिजे विशेष सामर्थ्य । | जेथें दिसती विशेष गुण । |

| | | |
|---|---|---|
| | तो नारायणाचा अवतार सत्य ॥ १२$\frac{३}{९२}$ | तें सद्गुरूचें अधिष्ठान ॥ ४$\frac{६}{९}$ |
| २५ | नाना ग्रंथांचिया संमतीं ॥ १२$\frac{३}{९८}$ | नाना ग्रंथांच्या संमतीं ॥ १$\frac{१}{९५}$ |
| २६ | ब्रह्माहमस्मि महावाक्य । येथींचा अर्थ अति अतर्क्य ॥ १२$\frac{४}{४}$, १३$\frac{३}{६८}$ | अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्यें ॥ ५$\frac{१}{४४}$ |
| २७ | कलाप १२, किरण ५ तील<br>माया विटे ब्रह्म अविट ।<br>माया कठीण ब्रह्म कोमळ ।<br>माया विरळ ब्रह्म पुष्कळ ।<br>ब्रह्म घनदाट ।<br>ब्रह्म निघोट । | दशक ६, समास ५ तील<br>माया विटे ब्रह्म विटेना ।<br>माया कठीण ब्रह्म कोमळ ।<br>माया अल्प ब्रह्म विशाळ ।<br>ब्रह्म घनदाट ।<br>ब्रह्म निघोट । |
| २८ | जीवभूत सनातन १२$\frac{५}{७४}$ | जीवभूतः सनातन ॥ ६$\frac{६}{४}$ |
| २९ | ब्रह्मीं माया जाली कोण्या प्रकारें ॥ १२$\frac{५}{८९}$ | माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैसी जाली ॥ ८$\frac{२}{५३}$ |
| | **याचें उत्तर** | **याचें उत्तर** |
| | अरे जें मुळीं जालें चि नाहीं । त्याची वार्ता सत्यत्वें पुससी काई ॥ ९० | अरे जें जालें चि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई ॥ ८$\frac{३}{९}$ |

काय, शास्त्री, स्वानुभवदिनकरावर दासबोधाची प्रभा सर्वत्र पडलेली आहे, असा कांहीं प्रकाश आपल्या मनावर पडत चालला आहे काय?

| | | |
|---|---|---|
| ३० | कोण्ही ह्मणती दृष्टांत येकदेशी । देणें लागतो समजावयासी ॥ १३ $\frac{१}{५८}$ | दृष्टांत तितुका येकदेसी । देणें घडे कळायासी ॥ ८$\frac{२}{४८}$ |
| ३१ | तेथ गगनीं जैसा निर्माण पवन । तैसी ब्रह्मीं मूळमाया निर्माण ॥ १३$\frac{२}{३०}$ | आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण ॥ १०$\frac{०}{९}$ |
| ३२ | १३×४ कैलासादि वर्णन | ४×१० तील कैलासादि वर्णन |

| | | |
|---|---|---|
| ३३ | लोकीं राहणें त्या नांव सलोकता। समीप असणें त्या नांव समीपता। स्वरूपप्राप्ति जालियां स्वरूपता। या त्रिविध मुक्ति बोलिजे ॥ १३ ४/११९ | लोकीं राहावें ते स्वलोकता। समीप असावें ते समीपता। स्वरूप चि व्हावें ते स्वरूपता। तिसरी मुक्ति ॥ ४ १०/२४ |
| ३४ | १३×५ पंच प्रळय | १३×४, १०×५ |
| ३५ | ११×५, १४×२ विज्ञानस्थितिलक्षणें | ८×९ , |
| ३६ | १४×३ पंचभूतपरस्परानुक्रम-धर्मकर्म | ८×४ |
| ३७ | १४×४ त्रिगुण | २×५ ते ७ |
| ३८ | १५-४-९६ ते १०० कूट-विवक्षा | १५×५; १३×५ |

आणखी छाया कशी पडावयाला पाहिजे होती, तें कृपा करून सांगाल कां, शास्त्री ?

> **स्वानुभवदिनकरीं रामदास।**
> **अंतर्बाह्य व्यापले सावकाश ॥ ११ ५/१०८**

असें स्वतः दिनकर जरी सांगत असले, तरी आमच्या शास्त्रीबावांच्या हट्टा-पुढें दिनकर काय करणार ?

( ३ ) व ( ४ ) हीं शास्त्रीबावांनीं सपशेल खोटीं विधानें केलीं आहेत. शास्त्रीबावांनीं तिसगांवचा मठ पाहिला नाहीं व तेथील संग्रह तर नाहीं च नाहीं पाहिला. तिसगांवमठाविषयीं त्यांना जें ज्ञान झालेलें आहे तें सारें स्वा. दि. च्या प्रस्तावनेवरून झालेलें आहे. असें असतां, मनांत आलीं तीं खोटीं विधानें त्यांनीं निःशंकपणें केलेलीं पाहून शास्त्रीबावांच्या धाष्ट्र्याबद्दल त्यांना पदक अर्पण केलें पाहिजे, यांत शंका नाहीं. श्रीसमर्थां-चीं कांहीं प्रकरणें मठांत आहेत, पण तीं दिनकरांच्या हातचीं आहेत, हें शास्त्र्यांचें म्हणणें निवळ खोटें आहे. मठांत भक्तिरहस्य नसतां हि तो त्यांना दिसला आणि दिसून वरती पुन्हां दिनकरांच्या हातचा दिसला ! मठांत सुगमोपाय आहे, पण तो दिनकरांच्या हातचा आहे, असें जें शास्त्रीबावा म्हणतात, ती त्यांची थाप आहे. हीं असलीं धादांत खोटीं विधानें करून वाचकांस फसवूं पहाणाऱ्या शास्त्रीबोवांना मी असें आव्हान करितों कीं, दिन-

करांच्या हातचीं श्रीसमर्थांचीं प्रकरणें, दिनकरांच्या हातचा भक्तिरहस्य व दिनकरांच्या हातचा सुगमोपाय, हे ग्रन्थ दाखवा, ते ग्रन्थ तुम्ही कोठें पाहिलेत तें सांगा, तुम्हांला कोणी दाखविले तें सांगा, निदान असली खोटी माहिती देऊन तुम्हांला कोणी फसविलें तें तरी सांगा ! महात्मा गांधींनीं ' न्यायसस्पृहतेचे ' कांहीं धडे या शास्त्रीबावांच्या चरणांपाशीं बसून घ्यावे, अशी या शास्त्र्यांची योग्यता दिसते !

( ६ ) दिनकरांच्या मठांत त्यांच्या वेळच्या इतर वस्तु आहेत, पण ' त्यांत त्यांचे वेळचा दासबोध मात्र नाहीं, ' असें शास्त्री म्हणणात. मठांत खुद्द दिनकरांचा च स्वानुभवदिनकरग्रन्थ नाहीं, म्हणून काय, शास्त्रीबुवा, तो दिनकरांनीं लिहिला च नव्हता असें म्हणाल काय ? आणि शास्त्रीबावा, स्वानुभवदिनकराची प्रत— ती त्यांच्या हातची नाहीं च म्हणा— जशी मला दुसऱ्या ठिकाणीं मिळाली, म्हणून मी प्रस्तावनेंत सविस्तर सांगितले आहे, तसें च दिनकरांच्या हयातींत त्यांच्या आज्ञेवरून लिहिली गेलेली मठांतील दासबोधाची हि प्रत कडे गांवच्या दुधाट घराण्यांत मिळाल्याचें सांप्रदायिक विविध विषयांक ४९ यांत चार वर्षांमागें च मी जाहीर केलेलें आहे. पण तिकडे पहाण्याचें आमच्या शास्त्रीबावांना कारण काय ? शास्त्रीबावा आतां तरी ४९ वा सांप्रदायिक विविध विषय पहाल ना ? त्या प्रतीचे पहिले नऊ दशक, न जाणों, दिनकरांनीं लिहिले असतील, असें माझें असलेलें मत त्या लेखांकांत तुम्हांस वाचावयास सांपडेल.

आतां **श्रीसमर्थप्रताप** व त्याचे कर्ते **गिरिधर** यांच्या संबंधानें शास्त्रीबावांनीं जीं विधानें केलीं आहेत, तिकडे मी मोठ्या कष्टानें वळतों. कष्ट अशासाठीं कीं, या बाबतींत शास्त्रीबावावर अप्रामाणिकपणाचा आरोप करण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे. संशोधनकार्यांत ज्या समर्थप्रतापाचें मला अनेकदां अपूर्व सहाय्य झालें, श्रीसमर्थांचे ग्रन्थ वगळून रामदासी ग्रन्थमालेंत ज्याचा इतका प्रिय ग्रन्थ मला दुसरा वाटला नाहीं, ज्याचें महत्त्व वर्णितां मी कधीं च कंटाळलों नाहीं, त्या श्रीसर्थप्रतापाला पुराव्याचे बाबतींत शास्त्रीबावा अप्रामाणिकपणानें कवडीमोल ठरवूं पहात आहेत ! शास्त्रीबावा म्हणतात कीं, " गिरिधरांचे इतर ग्रन्थांतून दासबोधांतर्गत दशकें किंवा समास यांचीं जीं नांवें दिलीं आहेत तीं हल्लीं कल्याणमहाराजांच्या हस्तलिखित प्रतीवरून छापलेल्या किंवा इतर प्रसिद्ध झालेल्या प्रतींतील नांवांशीं जुळत नाहींत, म्हणून तें चरित्र

( समर्थप्रताप ) प्रमाण मानणें योग्य नाहीं. " शास्त्रीबावा, आपण लाविलेला हा कार्यकारणसंबंध तुमचा तुम्हांला तरी समजला कां ? २२० पैकीं १८ ठिकाणीं गिरिधरांनीं आपल्या ग्रन्थान्वय ग्रन्थांत समासांचीं किंवा दशकांचीं नांवें भिन्न दिलेलीं आहेत तीं मी च समर्थप्रतापाच्या प्रस्तावनेंत दाखविलीं आहेत. २०० समासांचीं नांवें + २० दशकांचीं नांवें मिळून २२० नांवांपैकीं १८ नांवें गिरिधरांनीं आपल्या आवडीनें निराळीं सुचविलीं आहेत, पण त्याचा परिणाम काय, तर त्यांनीं लिहिलेलें श्रीसमर्थचरित्र प्रमाण मानणें योग्य नाहीं ! काय हा कार्यकारणसंबंध ! पण, या हि पेक्षां, शास्त्रीबावांनीं जें अप्रामाणिकपणाचें वर्तन केलें आहे, तें निराळें च आहे. शास्त्री म्हणतात, " समर्थप्रतापकार गिरिधर हे शिष्यपरंपरेनें रामदासांपासून चवथे आहेत, त्यांचे ग्रन्थांत दासबोधाचा साधारण उल्लेख आहे, पण तो कर्णोपकर्णीं ऐकीव माहितीपेक्षां जास्त महत्त्वाचा नाहीं. " गिरिधर हे शिष्यपरंपरेनें रामदासांपासून चवथे होत, एवढें च नुसतें मोघम सांगण्यांत शास्त्रीबावांचा काय मतलब असावा, असें आपणांस वाटतें, असें मी वाचकांना विचारतों. रामदासांपासून शिष्यपरंपरेनें गिरिधर हे चवथे होते, म्हणजे इतके लांबचे होते, असें च भासविण्याचा शास्त्रीबावांचा हेतु असला पाहिजे, नाहीं ? पण हें जर खोटें असेल आणि गिरिधर हे जर श्रीसमर्थकालीन असतील, तर असें खोटें भासविणें प्रामाणिकपणाचें होईल काय ? गिरिधर हे रामदासांपासून शिष्यपरंपरेनें चवथे असतील, पण हे चवघे हि—समर्थ, वेणाबाई, बाइयाबाई, गिरिधर—एका च कालीं विद्यमान होते, ही गोष्ट वाचकांपासून लपवून ठेवणें अप्रामाणिकपणा नव्हे काय ? गिरिधर हे रामदासांचे समकालीन नव्हत, असें जाणूनबुजून खोटें विधान करून ते रामदासांपासून चवथे होते म्हणजे फार लांबचे, शें पन्नास वर्षांनंतर मागचे होते, असें भासविणें ही वाचकांची फसवणूक नव्हे काय ? श्रीसमर्थप्रताप व त्याची प्रस्तावना हीं पुढें असतां शास्त्रीबावांनीं वाचकांच्या डोळ्यांत धूळ टाकून त्यांना फसविण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो निंद्य होय, असें म्हटल्यास शास्त्रीबावांना राग येण्याचें कारण काय बरें ?

( १ ) **श्रीस्वामीदर्शन** म्हणून गिरिधरांचें एक प्रकरण आहे. त्याचा उल्लेख **प्रतापाच्या** प्रस्तावनेच्या पृ. १४ ते १६ वर केलेला आहे.

त्या प्रकरणांत गिरिधरांनीं श्रीसमर्थांचा आपणांस कांहीं दिवस कसा सहवास घडला, त्या काळांत श्रीसमर्थांची दिनचर्या कशी होती, श्रीसमर्थांनीं एकदां आपणांस कीर्तनास उभे राहण्याची कशी आज्ञा केली, श्रीसमर्थ त्या दिवशीं केव्हां निजले, केव्हां उठले, आपण जेव्हां गांवीं परत जावयास निघालों तेव्हां आपणांस कसें वाईट वाटलें व श्रीसमर्थांनीं आपलें कसें समाधान केलें, इत्यादि अत्यन्त हृदयंगम वर्णन केलेलें आहे.

( २ ) तसें च सदर प्रस्तावनेच्या पृ. १६-१७ वर जें **श्रीदेवदर्शन** म्हणून प्रकरण दिलेलें आहे, त्यांत आपण श्रीसमर्थांचा निरोप घेतला तेव्हां त्यांनीं आपणांस काय बोध केला व **दासबोधाची पोथी** देऊन आपणांस काय सांगितलें, याचें गिरिधरांनीं वर्णन केलें आहे.

या दोन प्रकरणांतून अग्निशीं सुटण्यास शास्त्रीबावांना कांहीं मार्ग आहे काय ?

( ३ ) श्रीसमर्थांच्या चरित्रांतील कांहीं प्रसंग आपण खुद्द पाहिले आहेत, असें गिरिधर प्रतापांत आरंभीं च म्हणतात, त्याची वाट शास्त्री-बावा कशी लावणार ?

**समर्थ स्वामीचीं चरित्रें ।**
**कांहीं देखिलीं ऐकिलीं पुण्य श्रोत्रें** ॥ ५ ॥

( ४ ) प्रतापाच्या चवथ्या समासांत श्रीसमर्थांचें ध्यान वर्णन करून गिरिधर म्हणतात

**ऐसें सद्गुरुसमर्थध्यान ।**
**सगुण ध्यान निर्गुण ध्यान ।**
**सर्वत्रांचें समाधान ।**
**कृष्णातीरीं देखिलें** ॥ २९ ॥

यांतून शास्त्रीबावा आपला बचाव कसा करणार ?

गिरिधर हे श्रीसमर्थकालीन होत, त्यांना श्रीसमर्थांचा कांहीं काळ सहवास घडला होता व त्यांनीं प्रतापांत दासबोधाचा भरपूर उल्लेख केलेला आहे. असें असतां शास्त्री म्हणतात, गिरिधरांनीं प्रतापांत ' दासबोधाचा **साधारण उल्लेख** केला आहे पण तो **कर्णोपकर्णीं ऐकीव** माहितीपेक्षां जास्त महत्त्वाचा नाहीं. " शास्त्रीबावा, साधारण उल्लेख केला आहे म्हणजे काय ? आणि तो कर्णोपकर्णीं ऐकीव आहे म्हणता ? ' लोक म्हण-

तात कीं, समर्थांनीं दासबोध ग्रन्थ केला आहे ' असा कां प्रतापांत कोठें साधारण कर्णोपकर्णी ऐकीव उल्लेख आहे ? दासबोधग्रन्थाच्या समर्थ्याविषयीं वेणाबाईंच्या परंपरेंत असलेली समजूत ऐकीव असेल, पण शास्त्री, आपणांपुढें प्रश्न आहे तो दासबोधाच्या सामर्थ्याविषयीं नसून दासबोधाचे कर्ते कोण, असा आहे. मी आपणांस विचारतों कीं, दासबोधाच्या कर्त्यां विषयीं असा **कर्णोपकर्णी ऐकीव साधारण** उल्लेख आपणांस प्रतापांत कोठें आढळला काय ? नसेल तर, आपल्या वाचकांस फसविण्याचें आपण जें हें पातक केलें आहे त्याचें परिमार्जन करण्याच्या उपायाचें चिंतन करण्यास आपण त्वरित लागावें हें बरें !

' समर्थप्रतापांत तर दशकांचीं वगैरे नांवें नाहींत च ' असें शास्त्री कंसांत म्हणतात. शास्त्रीबावांचें हें म्हणणें चुकीचें आहे. पण त्यांचीं असलीं किरकोळ असत्य विधानें मी तशीं च सोडून दिलीं आहेत. पण शास्त्री, उद्यां जर कोणी समर्थचरित्र लिहूं म्हणेल तर त्यानें काय त्या चरित्रांत सर्व दशकांचीं आणि दोनशें समासांचीं नांवें दिलीं पाहिजेत, अशी कां आपली अपेक्षा असणार ? तथापि शास्त्री, प्रतापांत दशकांचीं नांवें गिरिधरांनीं मोठ्या कौशल्यानें आणलीं आहेत. आपण समर्थप्रतापग्रन्थ न वाचतां च त्यावर हल्ला चढविलेला दिसतो, पण आपण जर कृपा करून एकवार तो अप्रतिम ग्रन्थ भक्तिभावानें वाचाल तर आपणांस हि तीं नांवें आढळतील.

आत्मारामहाराजांच्या **दासविश्रामधामांतून** ' पुरावा घेण्यासारखें कांहीं च नाहीं, ' असें शास्त्रीबावा म्हणतात. आत्मारामहाराजांनीं केलेले सारे श्रम वाया गेले ! एवढा अठरा हजारांचा प्रचंड चरित्रग्रन्थ पुराव्याचे दृष्टीनें आमच्या शास्त्रीबावांना मातीमोल वाटतो ! श्रीसमर्थांचे कल्याण, कल्याणांचे शिवराम, शिवरामांचे रामचंद्र व रामचंद्रांचे आत्माराम. आत्माराम पांचवे आले ना, कां शास्त्री म्हणतात त्याप्रमाणें सहावे ? कल्याणाचा प्रघात असा असे कीं, शिष्यमंडळी भोंवताली गोळा झाली म्हणजे त्यांना प्रेमभरानें श्रीसमर्थलीला सांगाव्या. त्या लीला आपचंदमठपति शिवरामांनीं ऐकल्या, तडवळेमठपति जगन्नाथमहाराजांनीं ऐकल्या. त्या उभयतांच्या सहवासांत असलेल्या रामचंद्रांनीं त्यांच्यापासून त्या ऐकल्या आणि आत्मारामहाराजांना सांगितल्या. अशा रीतीनें अव्याहत चालत आलेल्या परंपरेंतील **दासविश्रामधाम**

ग्रन्थ होय. श्रीसमर्थभक्तांना त्या ग्रन्थानें आज किती वेड लावलें आहे, तें मी डोळ्यांनीं पाहिलें आहे व कानांनीं ऐकलें आहे. पण हे सारे अंध भक्त होत, असा त्यांच्या कपाळीं शिक्का मारून आमचे शास्त्रीबावा **दासविश्राम-धामास** फुटक्या कवडीची हि किंमत देण्यास तयार नाहींत !

हनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांची बखर हि शास्त्रीबावा त्या च किंमतीची ठरवितात. समर्थांपासून हनुमंतस्वामी सातवे होत, असें शास्त्री म्हणतात. कसें तें त्याचें त्यांना ठाऊक ! पण ते सातवे असोत, नाहीं तर पंधरावे असोत, पण ' पूर्वीचे ग्रन्थ व शिष्यमंडळींनीं लिहून ठेविलेलीं चरित्रें ' यांच्या आश्रयेंकरून १७१५ त हनुमंतस्वामींनीं जी बखर सांगि-तली, ती शास्त्रीबावांना आज ' विचाराई ' वाटत नाहीं, याला तुम्ही काय करणार ?

पण शास्त्रीबावा, तुम्हांला माझा एक सवाल आहे. दासबोध ग्रन्थ कोणाचा, या-बद्दल खुद्द **श्रीसमर्थ** दासबोधांत व इतरत्र काय म्हणतात, तें आपण कधीं पाहिलें च नाहीं व आंधळ्यासी जग सारें चि आंधळें या न्यायानें ज्या गोष्टीकडे तुम्ही डोळेझांक केलीत, ती जगाला हि दिसणार नाहीं, या आनंदांत तुम्ही राहि-लात व प्रतापकार **गिरिधर**, बखरकार **हनुमंतस्वामी**, दासविश्रामधामकर्ते **आत्माराम** व स्वानुभवदिनकरकार **दिनकर** या अवघ्या चार च साक्षी-दारांच्या साक्षी घेऊन तुम्ही आपल्या मताप्रमाणें पहिल्या तिघांना अप्रमाण ठरवून व चवथ्याबद्दल स्वतःचा गैरसमज करून घेऊन मोकळे होऊं पहातां, पण आपले वाचक हि आपणांस एवढ्यावर च सोडतील, अशी अपेक्षा तरी कशी केलीत ? प्रत्यक्ष श्रीसमर्थ, गिरिधर, दिनकर, हनुमंत आणि आत्माराम यांच्या जोडीला मी आपणांपुढें आज आणखी

## दहा साक्षीदार

हजर करणार आहे. या दहा हि साक्षीदारांच्या साक्षी पूर्वी च प्रसिद्ध झाल्या आहेत. असें असतां त्यांच्या कडे नुसतें ढुंकून हि न पाहण्यांत तुम्ही मोठें पाप केलें आहे. माझा हा तुमच्यावर स्पष्ट आरोप च आहे व पुनरु-क्तीचा दोष पतकरून मी तो पुन्हां येथें करीत आहे. ' कांहीं तरी करणें जगीं या प्रसिद्धीला येणें ' एवढा च जर तुमचा हेतु असेल, तर तुम्हांस माझें कांहीं म्हणणें नाहीं. पण तसें नसतां, सर्वजनसंमत अशा आजपर्यंत चालत आलेल्या लोकमताविरुद्ध एकादी अजब कल्पना तुम्हांस सुचवाव-

याची होती, तर एतद्विषयक प्रकाशित वाङ्मय सारें वाचून त्यांत तुमच्या कल्पनेला प्रतिकूल असा जो भाग आढळेल त्याचा समाचार घेणें हें स्वतःस प्रमाणशरण, न्यायसस्पृह व सारासारतत्त्वविवेचनपटु म्हणविणाऱ्या तुमचें आद्यकर्तव्य होतें. तें करण्यांत तुम्ही चुकलात हें मोठें पाप केलेत; असो. वास्तविक प्रत्यक्ष श्रीसमर्थांच्या पुढें आणखी कोणी साक्षीदार नको. पण महाराष्ट्राच्या ग्रन्थसाहेबावर हल्ला चढविणाऱ्या तुम्हांला जनतेच्या न्याय-सभेंत पुरें नेस्तनाबूद करावें व जनतेकडून तुम्हांला जाब विचारला जावा या हेतूनें मी आणखी दहा साक्षीदार हजर करीत आहे. त्यांत पहिले पांच साक्षीदार श्रीसमर्थांचे खुद्द शिष्य आहेत व दुसरे पांच नातशिष्य आहेत.

## पहिले साक्षीदार–भीमस्वामी

श्रीसमर्थशिष्य तंजावरमठपति भीमस्वामी यांनीं श्रीसमर्थांच्या अंत-कालचें वर्णन लिहून ठेवलेलें आहे. तें फार बहारीचें व अत्यन्त विश्वसनीय आहे. त्याची शास्त्रीबोवांनीं भक्तिप्रेमानें दररोज पारायणें करावीं ह्मणजे त्यांची बुद्धि पालटेल, अशी मी हमी घेतों. पारायणें राहूं द्या, पण शास्त्री-बोवा, तें प्रकरण एकवार तरी वाचण्याची कृपा करा. ( विविध विषय प्रथम खंड पृ. १४४ पहा ) त्यांत निवळ इतिहास असून भक्तिप्रेम आहे. शेवटच्या सात ओव्या ऐका:—

कोणही विचार पुसिला कांहीं । पूर्वीं च सांगितले पाही ।
सांगावया आतां कांहीं । उरेचना ॥ ४४ ॥

माझी काया आणि वाणी । गेली ह्मणाल अंतःकर्णीं ।
परि मी आहे जगजीवनीं । निरंतर ॥ ४५ ॥

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतसिद्ध ।
असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ॥ ४६ ॥

तीन वेळा स्मरण केलें । अंबर अवघें गर्जिन्नलें ।
रामनामें कोंदाटिलें । जिकडे तिकडे ॥ ४७ ॥

मुहूर्त येक हो गर्जना । गगनीं कोंदाटिलें हो जाणा ।
विस्मय पावलों निजजना । प्रेम आलें ॥ ४८ ॥

ध्वनि जाली संपूर्ण । जाहला अवतार हो पूर्ण ।
देशोदेशीं भक्त जन । जाते जाले ॥ ४९ ॥

**स्थलमहिमा अपार। उदंड जाले साक्षात्कार।**
**भीम ध्यातो निरंतर। चरणरज ॥ ५० ॥**

यांत आत्माराम आणि दासबोध हे दोन ग्रन्थ आपले असून यापुढें आतां त्यांना च आपलें रूप मानून भक्तांनीं चालावें, असें श्रीसमर्थांनीं अंतकालीं सांगितलें, अशी भीमस्वामी साक्ष देतात.

## दुसरे साक्षीदार–अनंतकवि

शास्त्रीबुवांना अनंतकवि ऐकून ठाऊक असतील. प्रतापांत म्हटलें आहे

**अनंत कवि सैह्याद्रिशिखरीं।**
**समर्थप्रताप वाणी वैखरी ॥**

ते अनंत कवि श्रीसमर्थांचे प्रत्यक्ष शिष्य होत. त्यांनीं श्रीसमर्थांवर जें अष्टक केलें आहे त्यांत ते म्हणतात

**वस्त्रें हुर्मुज भर्जरी पटकुळें माथां चिरा ही वसे।**
**काया सुंदर गौरवर्ण लघुसें भाळीं अवाळें असे।**
**जेणें पैं निज दासबोध वरदी हें काव्य केलें असे।**
**ऐसा सद्गुरु तो अनंतकविचा बद्धासि तारीतसे ॥ ३**

याची वाट, शास्त्रीबुवा, आपण कशी लावणार ? ( दोन जुनीं चरित्रें पृ. १८५ पहा )

## तिसरे साक्षीदार--बाळकराम

कारंजे येथील दोन मठांपैकीं एका मठाचे अधिपति बाळकराम यांची हकिकत विविध विषयांक ११ यांत आली आहे. तींत त्यांनीं समर्थांवर आरती केलेली दिली आहे, तींत

दासांप्रति बोधाया सगुण दिसतोसी

असा दासबोधाचा उल्लेख केला असून दासबोधावर हि त्यांची स्वतंत्र आरती आहे. तींत दासबोधाला त्यांनीं सद्गुरुवरद म्हटलेलें आहे ती आरती अशी:—

**जय देव जय देव जय दासबोधा।**
**आरति आरत माझें जय सद्गुरुवरदा ॥ धृ० ॥**
**सद्गुरुवरदा आपदा नाशी भवबाधा।**
**कर्म उपासन ज्ञान प्रबोध आनंदा।**

वैराग्या निजभाग्या निति सुखमर्यादा ।
अभेद भक्तीसाधन बुडउनि दुखवादा ॥ १ ॥
भावें पठती जे नर ते वर धर्माचे ।
ज्ञान विरक्त चि होती भजनीं मन त्यांचे ।
क्रीया धरिती ऐसी भवभय त्यां कैचें ।
बाळकरामीं रूप हे दासबोधाचें ॥ २ ॥

( विविध विषय खंड १ ला पृ. ६१।६२ )

## चवथे साक्षीदार–कल्याण

कल्याणांची जी उपलब्ध पण अप्रकाशित कविता आहे ती पुराव्यांत देतां येत नाहीं. तथापि त्यांचीं जीं कांहीं पदें प्रकाशित आहेत त्यांतील दोन पदांत ते दासबोधाचा च उल्लेख करीत आहेत.

दिनकरांच्या स्फुट कवितेच्या प्रस्तावनेनंतर कल्याणकृत श्रीसद्गुरुस्तवन-पर जें पद दिलें आहे, त्यांत कल्याण म्हणतात

षड्रिपुचा संव्हार करूनी ।
दासासि केला बोधु रे ॥

तसें च खुद्द दासबोधारंभीं त्यांचें जें पद दिलें आहे, त्यांत

अध्यात्मखाणी ग्रन्थ वाणी वदोन गेली ॥

असा दासबोधाचा च उल्लेख केलेला आहे.

शिवाय, हें हि लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, दासबोधग्रन्थ जर समर्थांचा नसता आणि एकाद्या समर्थशिष्याचा असता तर त्यावर कल्याणांनीं आरती केली च नसती.

## पांचवे साक्षीदार–रघुनाथ पंडित

यांचें अकरा श्लोकांचें श्रीसमर्थस्तवनपर स्तोत्र फार बहारीचें आहे. त्यांची कविता दहा बारा वर्षांमागें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली असून तींत तें स्तोत्र आहे. तें वाचकांना पाठ असावें, म्हणून शास्त्रीबावांचे निमित्तानें सबंध च स्तोत्र येथें सादर करितों.

आह्मांतुह्मांस भववारिधिमाजि तारूं ।
जें वाचितां परिसितां मग होय तारूं ।
जे दासबोधरचना घडली जयाला ।
वंदूं निरंतर तया गुरुराजयाला ॥ १ ॥

वैराग्यभाग्य भरलें असतां अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्तिकन्या ।
चौथी तयांत वरिली, उरल्या न पाहे ।
तो आमुचा गुरु समर्थ समर्थ आहे ॥ २ ॥

श्री रामदासगुरु शांतिवधूस अंगीं ।
अंगीकरूनि मिरवे स्वसुखांतरंगीं ।
रंगीं उभा कर उभारुनि वंदनाचे ।
नाचे मुखीं गुण वदे रघुनंदनाचे ॥ ३ ॥

खेळावयास हनुमंत गडी जयाचा ।
जो या महीवरि वसंत जितेंद्रियांचा ।
ज्याचीं पदें प्रणमिताति कवींद्र राजे ।
श्रीरामदास गुरु तो आमुचा विराजे ॥ ४ ॥

जो डोंगरीं गिरिदरीं फिरतां न भागे ।
ज्याची पवित्र घन कीर्ति जनीं विभागे ।
जो तत्त्वबोध कविता करितां न मोजी ।
तो रामदास गुरुवर्य नमो नमो जी ॥ ५ ॥

शोभे शतद्वय समास समासभारी ।
जो दासबोध निजबोधसुखा उभारी ।
त्या शेवटीं दशक जोडित जो विसावा ।
श्रीरामदास गुरु तो अमुचा विसावा ॥ ६ ॥

चिद्बोधसेज अरुवार नव्या फुलांची ।
सायुज्यमुक्ति ललना असतां जयाची ।
तो रामदास अकलत्र असें गणावें
अज्ञान होत जन काय तयां ह्मणावें ॥ ७ ॥

जो लेखणीसहित कागद दौति वाहे ।
तो दंड सद्गुण उदंड जयांत आहे ।
हस्तीं तयासि मिरवी फिरवी विनोदें ।
श्रीरामदास गुरु तो नमिला प्रमोदें ॥ ८ ॥

जो भर्जरी सरस पाटलवर्ण चेलें ।
शोभे जयास लघुसें निटळीं अवाळें ।
बोले समर्थ रघुवीर समर्थ ऐसें ।
तो मी स्तवीन निजसद्गुरु वाग्विलासें ॥ ९ ॥

जेणें प्रशिष्य निजशिष्य अनेक केले ।
देतां प्रसाद कफनी कफ नीट जाले ।
लोकाभिराम गुण बोलत राम कर्ता ।
साष्टांग वंदन करीन तया समर्था ॥ १० ॥
श्रीरामदासगुरुवर्णनरूप पद्यें ।
वृत्तें वसंततिलका सुजनैकहृद्यें ।
संख्या करूनि दशकावरि एकतेनें ।
केली अपूर्व रघुनायकपंडितानें ॥ ११ ॥

## साहवे साक्षीदार--रोकडाराम

बालकरामांचे शिष्य रोकडाराम. बालकरामांच्या पेक्षां हि रोकडारामांचा व्याप दांडगा होता. त्यांनीं श्रीसमर्थपर श्लोक व पद हीं केलीं आहेत. त्यांतील एक श्लोक

खरें ज्ञान वैराग्य सामर्थ्य ज्याचें ।
रघूनायकावीण वक्तृत्व कैचें ।
असे ग्रन्थ हा दासबोधु बरासा ।
नमस्कार माझा तया रामदासा ॥ ३ ॥

पदांतील शेवटचें कडवें असें आहे.

सज्जनगडिं स्वामीनें केला रामीं रहिवास ।
सदैव आत्मनिवेदन केलें दासबोधास ।
समर्थ वैराग्याचें भूषण तापस उदास ।
सकळा लोका म्हणती रे भजा रोकडे रामास ॥ ४ ॥

( पहा वि. वि. खंड १ ला पृ. ७५।६६ )

## सातवे साक्षीदार--शिवराम

शास्त्रीबुवांनीं आपल्या लेखांत तसें स्पष्ट कोठें म्हटलें नाहीं, नुसतें ध्वनित केलें आहे, कीं दासबोध ग्रन्थ कल्याणमहाराजांनीं केला असावा. शास्त्रीबुवा तसें स्पष्ट जाहीरपणें म्हणे पर्यंत या विचित्र विधानाचा विचार करण्याचें कारण नाहीं. पण दरम्यान शास्त्रीबोवांना एक गोष्ट कळवून ठेवावयाची आहे. कल्याणांचे शिवरामस्वामी म्हणून शिष्य होते. त्यांचा मठ आपचंद गांवीं आहे. त्यांनीं श्रीसमर्थचरित्रपर एक लहानसें प्रकरण लिहिलेलें आहे. त्यांत समर्थांविषयीं शिवरामस्वामी म्हणतात:

काव्यरचना विचित्र केली ।
वेदशास्त्रसंमत बोली ।
स्थावर चंचळ निश्चळ खोली ।
ग्रन्थीं अर्थ प्रकटिला ॥ ८ ॥

हा ग्रन्थ कोणता हें आलें कां, शास्त्री बोवा, आपल्या लक्ष्यांत ? **वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला**, असें ज्या ग्रन्थाविषयीं कल्याणांनीं आरतींत ह्मटलें आहे, तो च हा ग्रन्थ. ( पहा वि.वि. खंड १ ला पृ. ३२८ )

## आठवे साक्षीदार--हरिहर

भालगांवचा मठ शास्त्रीबोवांना माहित आहे. श्रीसमर्थशिष्य त्रिंबक यांचा तो मठ. त्रिंबकांचे हरिहर हे शिष्य. हे हरिहर फार वृद्ध होऊन १६८८ त समाधीस्थ जाले. त्या हरिहरांची दासबोधावर आरती आहे.

नवविध भक्ती भजनें प्रगटे निजज्ञान ।
जें जें वेदांतीं हि धरिलें प्रमाण ।
तें तें संमति ग्रन्थीं स्थापुनिया जाण ।
बोधीं बोधुनि भक्ता दिधलें पद पूर्ण ॥ २ ॥

तें कोणी हें आपल्या वाचण्यांत आलेलें आहे कां, शास्त्री ? त्या च हरिहरांनीं श्रीसमर्थचरित्र वर्णिलेलें आहे. त्यांत हरिहर म्हणतात, श्रीसमर्थांनीं

दासबोध ग्रंथ केला पैं सुगम ।
वारिला तो भ्रम अज्ञानांचा ॥ ७१ ॥
निस्पृहांची चिंता समर्थें वारिली ।
कामधेनु दिल्ही सीधि हातीं ॥ ७२ ॥
ठाईं ठाईं ठाणीं देवें बैसविलीं ।
भाविकें लाविलीं भक्तिमार्गी ॥ ७३ ॥
पूर्ण अवतार कृष्णातीरीं वास ।
सज्जनगडास वसवीलें ॥ ७४ ॥

इत्यादि. ( वि. वि. खंड १ ला पृ. ९६, ९९ )

## नववे साक्षीदार–प्रल्हादानुचर

कारंजास जो दुसरा मठ आहे तो श्रीसमर्थशिष्य प्रल्हादांचा. प्रल्हादांचे शिष्य रामचंद्र. ते आपणांस **प्रल्हादानुचर** म्हणवीत. त्यांचें श्रीसमर्थस्तवनपर एक पद आहे, त्यांत ते म्हणतात:

दास्यत्व करुनि प्रसन्न केलें रामास ।
दासबोध ग्रन्थ केला जेथें उपनिंषदार्थ ।
दारा धन त्यागुनि प्रपंचीं जाले उदास ।
दमन करुनि रागद्वेषी स्वरूपीं अखंड निवास ॥ ३

( वि. वि. खंड २ रा पृ. १६८ )

## दहावे साक्षीदार–मेरुस्वामी

अनंतमौनी म्हणून तंजावराकडे श्रीसमर्थांचे शिष्य होते. त्यांचे शिष्य मेरुस्वामी. अनंतमौनी १६१५ त समाधिस्थ होऊन मेरुस्वामी मठपति झाले. मेरुस्वामींनीं श्रीसमर्थांना पाहिलें होतें, इतकें च नव्हे, तर मेरुस्वामींनीं श्रीसमर्थांच्या तीन तसबिरी काढल्या होत्या व गडावर शेजघरांत जी तसबीर आहे ती त्यांपैकीं च एक होय. मेरुस्वामी रामसोहळ्यांत एके ठिकाणीं राम आणि समर्थ यांची सहज तुलना करतांना म्हणतात

रामासी येक शर तर्‍ही असे ।
दासापाशीं शस्त्र चि नसे ।
आंगें चि विभांडिले कैसे ।
रजनीचर ॥ रामसोहळा १-१०-७६

याचें उत्तर

दासबोध वज्रचपेट ।
थापेसरिसें करिती सपाट ।
ज्ञानसत्ता उत्कट ।
या समर्थाची ॥ ७७

आणखी पुढें मेरुस्वामी म्हणतात

कृपासिंधु उचंबळला । परमार्थरूप ग्रंथ केला ।
जो कल्पकोटी जाला । उपेगासी ॥ ९३
श्रवण करितां दासबोध । तात्काळ उपतिष्ठे प्रबोध ।
तुटे संसारसंबंध । मननमात्रें ॥ ९४

वगैरे

या शिवाय आणखी सांप्रदायिक आणि संप्रदायाच्या बाहेरचे किती तरी साक्षीदार देतां येतील ! या दहा पंधरा साक्षीदारांच्या जबान्या वाचून शास्त्रीबावा न उमगले तर साक्षीदारांचा दुसरा संघ पुढें आणतां येईल. पण सर्व साक्षीदार एकत्र करून त्यांच्या जबान्यांचा विचार करणें हें शास्त्री-

बावांचें काम नाहीं काय ? त्यांना केवळ सत्याची च अपेक्षा आहे ना ? मग दुसरा कोणी तरी साक्षीदार पुढें आणील अशी त्यांनीं वाट कां पहावी ? शास्त्रीबावांना माझा सवाल असा आहे कीं, गिरिधर, दिनकर, हनुमंत, आत्माराम, भीमस्वामी, अनंत कवि, बाळकराम, कल्याण, रघुनाथपंडित, रोकडाराम, शिवराम, हरिहर, प्रल्हादानुचर व मेरुस्वामी हे झालेले चवदा साक्षीदार व महिपति, उद्धवसुत, शिवदिनकेसरी इत्यादि जे आणखी दहा वीस साक्षीदार सादर करण्यास मी तयार आहे ते, अशा या सर्व लोकांनीं दासबोधग्रन्थ श्रीसमर्थांचा नसून तो त्यांचा च म्हणण्याचा कांहीं

**कट**

कां केला होता ? आणि फुकटंफाकट आपल्या नांवावर ग्रन्थ विकला जाणार आहे म्हणून श्रीसमर्थ हि त्या कटांत सामील झाले होते काय? काय, शास्त्री, तुम्ही म्हणता तरी काय ? हा एवढा मोठा २५० वर्षें गुप्त राहिलेला कट उघडकीस आणल्यामुळें स्वराज्यांत **गुप्त हेरांचे नायक** म्हणून स्वतःची नेमणूक करून घेण्याची तुमची महत्त्वाकांक्षा दिसते ! महत्त्वाकांक्षा वाईट नाहीं, पण विचार करा, एक ती महत्वाकांक्षा तरी सफळ होईल, नाहीं पेक्षां ठाण्याला तरी तुमची रवानगी करावी लागेल !

येथपर्यंत जें प्रतिपादन झालें तें वाचून **दासबोधाचे कर्ते कोण** याविषयीं शास्त्रीबावाखेरीज कोणाला शंका राहणार नाहीं, अशी खात्री वाटून शास्त्रीबावांच्या इतर शुष्क आक्षेपांचा विचार करण्यांत वृथा कालक्षेप करूं नये, असा पुन्हां मोह होतो. पण तो आवरला पाहिजे. शास्त्रीबावांना तसें सोडून उपयोगी नाहीं. तथापि राहिलेल्या आक्षेपांचें खंडण आतां अगदीं थोडक्यांत करूं.

**आक्षेप सहावा—**

> ' समर्थकालीन म्हणजे समर्थ हयात असतां लिहिलेली दासबोधाची प्रत कोठें च आढळल्याचें दिसत नाहीं.
>
> ' निर्घृण कालाच्या निरंकुशगतिवैचित्र्यामुळें पुष्कळ ठिकाणच्या प्रतींची नासधूस होणें संभवनीय मानलें, तरी सर्वत्र असें होणें संभवनीय नाहीं. त्यांत हि चाफळ किंवा परळी येथील प्रतीसंबंधांत तर असें म्हणतां च येत नाहीं.
>
> ' डोमगांवीं जर दासबोधाच्या १०।१५ प्रती आढ-

ळतात, तर चाफळ येथें शेंपन्नास प्रती तरी आढळल्या पाहिजे होत्या.

' चाफळास एखाद्या शिष्यानें समर्थशिकवणीप्रमाणें लिहिलेली एक सुद्धां प्रत नसावी, हें आश्चर्य आहे.

' लेखनसमासांत सांगितल्यापेक्षां हि जास्त चांगली प्रत लिहवून शिवाजी राजे यांनीं समर्थांस अर्पण केली असती, किंबहुना पूर्वीच्या राजसंप्रदायानुरूप आपल्या गुरूचा अमोलिक उपदेश ग्रंथ ताम्रपत्रावर सोनेरी अक्षरें ढाळून तयार करवून मठांत निरंतर राहण्याकरितां गुरुचरणीं समर्पण केला असता.

' शिवाजी महाराजांप्रमाणें च पंतप्रतिनिधि व इतर बरे च सरदार समर्थांचे शिष्य होते. त्यांचीं राज्यें किंवा जहागिरी व तत्संबंधीं कागदपत्रें त्यांच्या वंशजांजवळ अद्यापपावेतों कायम आहेत. मग त्यांतून कोणाचे हि संग्रहीं तत्कालीन लिहिलेला दासबोध कां सांपडूं नये ?

. ' अर्थात् समर्थांचे हयातींत दासबोध " ग्रन्थ म्हणून " लिहिला गेला नसावा, हें च अनुमान ठरतें. '

दासबोधग्रन्थाचा ' दासबोध ' म्हणून व ' ग्रन्थ ' म्हणून श्रीसमर्थांनीं स्फुट कवितेंत अनेक ठिकाणीं स्वतः उल्लेख केलेला असल्यामुळें त्यांच्या हयातींत दासबोध ग्रन्थरूपानें नव्हता, असें म्हणण्यास कोणाला तोंड आहे, असें वाटत नाहीं, मग त्यांच्या वेळची दासबोधाची प्रत सांपडो वा न सांपडो. श्रीसमर्थ दासबोधाचा वादांत उल्लेख करीत असल्यामुळें चाफळास दासबोधाची प्रत कां नाहीं आणि डोमगांवीं कां आहे, शिवराजांनीं ताम्रपत्रावर सोनेरी अक्षरें ढाळून दासबोधाची प्रत कां करविली नाहीं, पंतप्रतिनिधि व इतर सरदार यांच्या संग्रहीं दासबोधाच्या प्रती कां नाहींत, असले प्रश्न शिलक उरत नाहींत. चाफळास आणि गडावर समर्थकालीन दासबोधाची प्रत कां नाहीं, असें शास्त्री विचारतात. गडावर समर्थकालीन च काय पण नंतरच्या हि शंभर वर्षांतलें लिहिलेल्या कागदाचें एक चिटोरें सुद्धां नाहीं, त्यांत दासबोध हि नाहीं, याचें नवल काय ? तसें च चाफळास जसा समर्थकालीन दासबोध नाहीं, तशीं त्यांचीं इतर हि कोणतीं च प्रकरणें

नाहींत, यावरून काय श्रीसमर्थांनीं कोणती च कविता केली नाहीं, असें कां शास्त्री म्हणणार ? राज्यक्रांति किंवा दैविक आपत्ति यांतून एकीचा हि संपर्क चाफळमठास झाला नाहीं, असें आपणांस १८९७।९८ सालीं श्रीमंत बापुसाहेब महाराज यांनीं सांगितलें होतें, असें शास्त्रीबावा म्हणतात. महाराजांनीं तसें सांगितलें होतें कीं काय, हें मला माहीत नाहीं व सुमारे पंचवीस वर्षांमागचे महाराजांच्या मुखींचे अगदीं जसेच्या तसे शब्द देण्याचा जो शास्त्रीबावांनीं आव घातला आहे, त्यावर हि माझा विश्वास बसत नाहीं. कारण निर्घृण काळाचा तडाखा चाफळमठाला हि पूर्ण बसलेला आहे, हें मला माहीत आहे, तेव्हां त्याच्या उलट शास्त्रीबावा जें ह्मणतात तें मी खरें कसें मानूं ? शिवाजी राजे राज्य आक्रमूं लागण्यापूर्वीं च आदिलशाही-कडून दियानतराव यांचे मार्फत दोन गांवीं, बाजी घोरपडे यांच्या मार्फत दोन गांवीं व शहाजी राजे यांचे मार्फत सहा गांवीं चाफळमठाला जीं इनामें मिळालीं होतीं त्या इनामांच्या सनदा कोठें गेल्या ? राज्यक्रांति, दैविक आपत्ति किंवा काळाचा तडाका यांतून जर कसला च संपर्क चाफळमठाला झाला नाहीं, तर त्या आदिलशाही सनदा आज कोठें आहेत ? जेथें त्या सनदा गेल्या, तेथें च त्या वेळचा दासबोध व शिवाजी राजे यांनीं ताम्रपत्रावर सोनेरी अक्षरें ढाळून तयार करविलेली दास-बोधाची प्रत आणि श्रीसमर्थांचीं इतर सर्व प्रकरणें गेलीं ! त्या सनदा व तीं स्फुट प्रकरणें कोठें गेलीं हें शास्त्रीबावांनीं आधीं सांगावें आणि मग दासबोध कोठें गेला हें दुसऱ्यास विचारावें. ' शिवाजी महारा-जांप्रमाणें च पंतप्रतिनिधि व इतर बरे च सरदार समर्थांचे शिष्य होते. + + + + त्यांचीं राज्यें किंवा जहागिरी व तत्संबंधीं **कागदपत्रें त्यांच्या वंशजांजवळ अद्यापपावेतों कायम आहेत**, ' असें शास्त्री सांगतात. शास्त्री-बावा, असानें कोण फसणार आहे ? कांहीं एक ठाऊक नसतां शास्त्रीबावांनीं हें विधान केलेलें आहे ! **श्रीसमर्थशिष्यांपैकीं कोणकोणत्या सरदारांच्या जहागिरी व तत्संबंधीं समर्थकालीन कागदपत्रें अद्यापपावेतों कायम आहेत, पण त्यांत दासबोधाच्या प्रती मात्र नाहींत, त्यांचीं नांवें** शास्त्रीबावांनीं कृपा करून प्रसिद्ध करावीं, म्हणजे इतिहाससंशोधनकार्यावर त्यांचे अगणित उपकार होतील ! शास्त्री, एवढे उपकार आपण महाराष्ट्रावर केले च पाहिजेत, अशी आपल्या चरणीं माझी विनंति आहे. समर्थशिष्यां-

पैकीं सरदारांच्या कडे समर्थकालीन कागदपत्रांचा शास्त्रीबावांनीं शोध लावला--शोध काय लावावयाचा, कागदपत्रें आहेत च, असें शास्त्रीबावा स्वतःच्या माहितीवरून सांगत आहेत--म्हणजे त्या च कागदपत्रांत समर्थकालीन दासबोधाच्या प्रती शास्त्रीबावांना दाखविण्याचें मजकडे लागलें !

डोमगांवीं १०।१५ प्रती दासबोधाच्या आढळतात, असें शास्त्री म्हणतात. डोमगांव कांहीं शास्त्र्यांनीं पाहिलें नाहीं. डोमगांवीं १०।१५ प्रती मला आढल्या नाहींत, किंवा दुसऱ्या कोणास आढळल्याचें मला ऐकून किंवा वाचून ठाऊक नाहीं. मग डोमगांवीं १०।१५ प्रती कोणाला आढळल्या, हें शास्त्रीबावा कृपा करून सांगतील काय ? डोमगांवीं कल्याणांच्या हातची मूळ प्रत आहे, पण ती प्रत मान्य करणें शास्त्रीबावांच्या सोयीचें नसल्यामुळें ते ती प्रत मान्य करीत नाहींत. त्या प्रतीसंबंधीं त्यांचा आक्षेप आहे तो असा:

## आक्षेप सातवा--

> ' समर्थांनीं स्वतः शोध घातल्याविषयीं देव आपल्या प्रस्तावनेंत जे लिहितात, त्यांच्या त्या विधानास **ऐकीव माहितीवांचून दुसरा पुरावा नाहीं**. शिवाय, हें विधान खरें मानावयाचें तर शोध घातल्यानंतर दुसरी दुरुस्त झालेली प्रत लिहिली गेली असली च पाहिजे. ती कोठें आहे ?
>
> ' तशी प्रत ज्या अर्थी कोठें च आढळत नाहीं, त्या अर्थी समर्थांनीं शोध घातल्याचें विधान करणें पूर्वग्रहदूषित अंधभक्तीचें अपरिहार्य फल च मानलें पाहिजे. '

कल्याणांच्या हातच्या दासबोधाच्या प्रतींत श्रीसमर्थांनीं स्वतः शोध घातल्याविषयीं मी जें प्रस्तावनेंत म्हटलें आहे, तें नुसत्या ऐकीव माहितीवरून म्हटलेलें नाहीं. त्याला ( १ ) हनुमंतस्वामींनीं लिहिलेल्या बखरीचा ( २ ) परंपरेच्या दंतकथेचा व (३) प्रत्यक्ष त्या प्रतीचा, असा तिहेरी पुरावा आहे. समर्थांचे पुतणे रामचंद्र बावा, त्यांचे चिरंजीव गंगाधरस्वामी यांनीं शके १६४० त समर्थांचें चरित्र सांगितलें होतें, त्याच्या आधारें हनुमंतस्वामी यांनीं १७१५ त बखर लिहिली, ती शके १७९३ त महादेव विनायक चौवळ यांनीं छापली होती. ती बखर शास्त्रीबावांनीं पहावी, म्हणजे तींत त्यांना आढळेल कीं, कल्याणांनीं लिहिलेल्या प्रतींत श्रीसमर्थांनीं स्वहस्ताक्षरें शोध घातले व ती

प्रत डोमगांवच्या मठांत होती आणि आहे. परंपरा हि अशी च आहे व ती मूळ प्रत व तींतील शोध आज हि डोमगांवमठांत पहावयास सांपडतात. या सर्व गोष्टी न मानण्याला शास्त्री स्वतंत्र आहेत. ती प्रत कल्याणांच्या हातची आहे, हें तरी शास्त्रीबावांना मान्य आहे ना ? कां नाहीं ? त्या प्रतींतील एका पाठपोट पृष्ठाचा फोटो दासबोधाचे तिसरे आवृत्तींत दिलेला आहे, कल्याणांच्या हातच्या बाडांतील कांहीं ओळींचा फोटो रामदासी मालेंतील तिसऱ्या भागांत दिलेला आहे व कागदपत्रांच्या भागांतील लेखांक ४९ चें कल्याणांच्या हातचें अस्सल पत्र सभेच्या संग्रहांत आहे. हीं तिन्हीं ताडून पहातां डोमगांवमठांतील दासबोधाची मूळ प्रत कल्याणांचे हातची आहे, याविषयीं तिळमात्र शंका रहात नाहीं. त्या प्रतीवरून समर्थांसमक्ष दुसरी प्रत झाली असली पाहिजे, ती कोठें आहे," असें शास्त्री विचारतात. तशी एक प्रत नीलंगे मठांत आहे. ती समर्थशिष्य आण्णाप्पा यांचे हातची आहे. दुसऱ्या हि ज्या कित्येक प्रती डोमगांवीं व इतरत्र आहेत, त्यांत हि श्रीसमर्थांनीं घातलेले बहुतेक शोध घेतलेले आहेत. दुसऱ्याला अंध म्हणणारानें स्वतःच्या डोळ्यांचा उपयोग मात्र केला पाहिजे.

## आक्षेप आठवा—

' पूर्वकालापासून ग्रन्थकर्त्यांचा संप्रदाय म्हटला म्हणजे ग्रन्थनिर्विघ्नतासिद्ध्यर्थ मंगल इष्टदेवतावंदनानंतर विषयप्रस्तावना करण्याचा आहे.

' या शिष्टसंमत भाविक हृद्य मार्गाचें उल्लंघन दासबोधांत प्रस्तावनासमास पहिल्यानें घातल्यानें झालें आहे.

' स्वतः परमभाविक, सन्मार्गलोलुप, लौकिकनिस्पृह अशा रामदासांकडून भाविकहृदयोद्वेगकर भक्तिमार्गोच्छेदि शिष्टसंप्रदायोल्लंघन होणें शक्य नाहीं.

' अर्थात् हा पहिला समास तरी त्यांचा नसावा, असें म्हणणें भाग आहे. '

इष्टदेवतावंदनापूर्वी विषयप्रस्तावना करणें ही गोष्ट भाविकहृदयोद्वेगकर, भक्तिमार्गोच्छेदि व शिष्टसंप्रदायाचें उल्लंघन करणारी आहे, व तशी गोष्ट परमभाविक, सन्मार्गलोलुप व लौकिकनिस्पृह अशा श्रीसमर्थांच्या हातून घडणार नाहीं, असें शास्त्री म्हणतात. पण दासबोधांत तर तशी गोष्ट घडली

आहे, दासबोधांत पहिला समास प्रस्तावनेचा असून नंतर दुसऱ्या समासापासून नमनाला सुरवात झाली आणि म्हणून शास्त्रीबावा म्हणतात, हा प्रस्तावनेचा पहिला समास तरी रामदासांचा नसावा ! शास्त्रीबावांना काय आशा लागली आहे, पहा. सबंध दासबोध नाहीं तर नाहीं, निदान पहिला समास तरी समर्थांचा नाहीं, एवढें जरी महाराष्ट्राला कबूल होईल, तरी शास्त्रीबावांचा आत्मा संतुष्ट होणार आहे. पण एवढें हि समाधान त्यांच्या नशिबीं लिहिलेलें नाहीं, त्याला आमचा नाइलाज आहे. निदान पहिला समास तरी रामदासांचा नाहीं, असें अनुमान काढण्याला शास्त्रीबावा जें कारण देतात, तें च मुळीं अशास्त्र आहे. शास्त्रीबावा म्हणतात, नमनापूर्वी विषयाची प्रस्तावना करणें, हें शिष्टसंमत भाविक हृद्य मार्गाच्या विरुद्ध आहे. भय्यासाहेब हे स्वतःस विद्यामयूर भैय्याशास्त्री म्हणवितात. कां त्यांच्या नांवामागें 'विद्यामयूर' व पुढें 'शास्त्री' लिहून विविधज्ञानविस्तारानें त्यांची चेष्टा केली आहे ? आमचे एक सहाध्यायी होते, त्यांना संस्कृत मुळीं च येत नसे, म्हणून वर्गातील सर्व मुलें त्यांना शास्त्रीबुवा म्हणत. तें त्यांचें नांव, ते पुढें पोलीस इन्स्पेक्टर झाले तरी, कायम च राहिलें. तशी तर कांहीं विद्यामयूर भैय्याशास्त्री यांच्या नांवाची उपपत्ति नाहीं ना ? नसेल तर, शास्त्रीबावांनीं या शास्त्राच्या गोष्टी तरी सरळ प्रामाणिकपणानें लिहावयाच्या होत्या. कां या बाबतींत हि त्यांचें ज्ञान इतर विषयांइतकें च गाढें आहे ! एका बाजूला अप्रामाणिकपणा व दुसऱ्या बाजूला अज्ञान, यांपैकीं वाटेल तो आरोप पतकरण्यास शास्त्री मुखत्यार आहेत. आम्ही मात्र आमचें हें दुर्दैव समजतों कीं, या शास्त्राच्या गोष्टी शास्त्रीबावांनीं आम्हांस शिकवाव्या, तों उलट त्या गोष्टी त्यांना सांगण्याचा आमच्यावर प्रसंग आला आहे. शास्त्रीबावा, तुम्हांला ठाऊक आहे ना, ग्रन्थाच्या आरंभीं जें मंगल करावयाचें असतें तें तीन प्रकारचें आहे ?

आशीर्वादनमस्कारवस्तुनिर्देशभेदतः ।
मङ्गलं त्रिविधं प्रोक्तं ग्रन्थादीनां मुखादिषु ॥

दण्डीनें आपल्या काव्यादर्शांत हे च ना तीन प्रकार सांगितले आहेत ? (१) थोरांचा आशीर्वाद, (२) श्रेष्ठांना नमन व (३) वस्तुनिर्देश, या तीन प्रकारांपैकीं कोणत्या हि एका प्रकारानें ग्रन्थाचा आरंभ करणें, हें शास्त्रोक्त होईल ना ? कां, शास्त्रिणः, आपलें शास्त्र कांहीं और आहे ? दासबोधांत

ग्रन्थारंभीं वस्तुनिर्देशानें मंगल केलें आहे, त्यांत शिष्टांना असंमत असें काय आहे, तें शास्त्राधारें आम्हांला थोडें शिकवाल कां, शास्त्रीबावा ? कां, आपला शब्द हें च आपलें शास्त्र ? शिष्टसंप्रदायाच्या उल्लंघनाचा आरोप तुम्ही श्रीसमर्थांवर करीत आहां, म्हणून तुम्हांस विचारावें लागत आहे कीं, शास्त्रानें सांगितलेला वस्तुनिर्देश म्हणजे काय, तो तुम्हांस समजतो ना ? वर्ण्यकथाभागाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जो निर्देश तो वस्तुनिर्देश व तसा वस्तुनिर्देश करणें हा मंगलाचा च एक शिष्टानुशिष्ट प्रकार आहे. त्याचा च अवलंब श्रीमत् दासबोधांत केलेला आहे.

श्रोते पुसती कोण ग्रन्थ ।<br>
काय बोलिलें जी येथ ।<br>
श्रवण केलियानें प्राप्त ।<br>
काय आहे ॥ १×१×१<br>
ग्रंथा नाम दासबोध ।<br>
गुरुशिष्यांचा संवाद ।<br>
येथ बोलिला विशद ।<br>
भक्तिमार्ग ॥ २<br>
नवविधा भक्ति आणि ज्ञान ।<br>
बोलिलें वैराग्याचें लक्षण ।<br>
बहुधा अध्यात्मनिरोपण ।<br>
निरोपिलें ॥ ३<br>
भक्तिचेन योगें देव ।<br>
निश्चयें पावती मानव ।<br>
ऐसा आहे अभिप्राव ।<br>
ईये ग्रन्थीं ॥ ४

इत्यादि. अशा रीतीनें वर्ण्यकथाभागाचा निर्देश करून श्रीसमर्थांनीं ग्रन्थारंभ केला असतां, तुम्ही श्रीसमर्थांना दोष देण्याला प्रवृत्त होता, त्या तुम्हांस आम्ही काय म्हणावें ? शास्त्रीबावा, तुम्ही जर खरोखरीचे शास्त्री असाल, तर तुम्हांला हें ठाऊक पाहिजे कीं, कविकुलगुरु कालिदास यांच्या कुमारसंभवादि कांहीं काव्यांचा आरंभ एकदम वस्तुनिर्देशानें च झाला आहे. ग्रन्थारंभ नमनानें च केला पाहिजे, हें तुम्हांस कोणी सांगितलें ? मनुस्मृतीचा आरंभ पहा. शास्त्रीबावा, वाल्मीकिरामायण पहा.

तपःस्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदां वरम् ।<br>
नारदं परिपप्रच्छ वाल्मीकिर्मुनिपुंगवम् ॥ १

कोन्वस्मिन्सांप्रतं लोके गुणवान्कश्च वीर्यवान् ।
धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवाक्यो दृढव्रतः ॥ २

× × × × × ×

इक्ष्वाकुवंशप्रभवो रामो नाम जनैः श्रुतः ।
नियतात्मा महावीर्यो द्युतिमान् धृतिमान् वशी ॥ ८

× × × × × ×

इत्यादि रीतीनें वस्तुनिर्देश करून च आद्यकवीनें रामायणाला आरंभ केला आहे. तो च संप्रदाय आमच्या समर्थांनीं पाळला असतां, त्यांना तुम्ही 'शिष्टसंमत भाविक हृद्य मार्गाचें उल्लंघन' करणारे म्हणतां, तें कशाच्या बळावर ? श्रीसमर्थांचीं इतर जीं कांहीं प्रकरणें तुम्हांला मान्य असलीं पाहिजेत, अशा कित्येक प्रकरणांचा आरंभ वस्तुनिर्देशानें च झालेला आहे.

शिवाय, हा पहिला समास श्रीसमर्थांचा नाहीं असें ठरविण्याच्या तुमच्या इच्छेच्या आड स्वानुभवदिनकरकार दिनकर कसे येतात, हें मी मागें च दाखविलें आहे. बिचाऱ्या शास्त्रीबावांची इच्छा किती थोडी होती कीं, निदान दासबोधाचा पहिला समास तरी श्रीसमर्थांचा न ठरो ! पण एवढी हि इच्छा तृप्त न झाल्यामुळें शास्त्रीबावांचा जीव कासावीस होत राहणार, याचें वाईट वाटतें.

### आक्षेप नववा--

(१) सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ॥ ५$\frac{3}{४०}$ इत्यादि उद्गार "शास्त्रपरिचय नसलेला मानवी गुरूचा एकादा शिष्य अंधभक्तीनें काढूं शकेल. पण शास्त्र-परिचय असलेला किंवा प्रत्यक्ष देवाचा शिष्य हें देवनिंदाप्रचुर गुरुमाहात्म्य कसें लिहील? रामदासांचा गुरु श्रीराम हरीचा च अवतार ना ? अर्थात् त्यांचे मुखांतून हरिहरांच्या सामर्थ्यास गौणत्व देणारे उद्गार कसे निघतील ? या वरच्या गुरुमहा-त्म्यांत न्याय्य युक्तीचा लेश सुद्धां नाहीं."

(२) "दासबोधांत संपूर्ण एक दशक इतरांच्या स्तवना-करितां खर्ची घातला असतां, श्रेष्ठतम श्रीरामचंद्रांकरितां एक ओवी सुद्धां खर्चीं घातली नाहीं हें पाहिलें व रामदासांविषयीं लौकिक माहिती किंवा त्यांची इतर कविता यांकडे पाहिलें,

म्हणजे साहजिक असें वाटतें कीं, दासबोधाचा कर्ता कोणी तरी दुसरा च असला पाहिजे. "

(३) रामदासांचे गुरु श्रीराम. पण

**वंदून सद्गुरुचरण।**
**करून रघुनाथस्मरण॥ २-१-३**

या ओवींत ग्रन्थकर्त्यानें सद्गुरु वेगळा व राम वेगळा कल्पिल्याचें स्पष्टतर दिसतें.

" अर्थात् रामचंद्राहून ज्याचा गुरु वेगळा आहे अशा च मनुष्यानें हा ग्रन्थ लिहिला असावा हें स्पष्टतम आहे "

(४) " दासबोधांत ज्या ज्या दशकारंभीं मंगलदेवतावंदन आलें आहे त्याचें कोष्टक मांडल्यास + + + स्पष्ट दिसतें कीं, दासबोधकर्ता निस्सीम गुरुभक्त होता, मात्र त्याचा गुरु राम नव्हता. "

या एका आक्षेपांत चार पोट आक्षेपांचा मी समावेश करीत आहे, कारण त्या चार हि पोट आक्षेपांचा परस्परांशीं संबंध आहे, चार हि आक्षेपांच्या मुळाशीं शास्त्रीबावांच्या समजुतीचा घोटाळा एक च आहे. हा घोटाळा एकाद्या आंग्लविद्याविभूषिताचा झाला असतां तर मला नवल वाटलें नसतें, पण शास्त्रीबावांसारख्या, नांवावरून तरी पूर्वपरंपरेंतील दिसणाऱ्या माणसाचा असा घोटाळा व्हावा, हें आश्चर्य आहे. पूर्वपरंपरेंतील माणसांची सद्गुरुविषयीं काय कल्पना असते, तिची शास्त्रीबावांना वार्ता हि नाहीं, असें दिसतें. ते शास्त्री आहेत, तेव्हां त्यांनीं थोडा जास्त विचार केला असतां तर आपला झालेला घोटाळा त्यांच्या लक्ष्यांत आला असता. शास्त्रीबावांचा हा काय घोटाळा झाला आहे, तो आतां आपण पाहूं.

( १ ) पांचव्या दशकाच्या तिसऱ्या समासांत श्रीसमर्थांनीं सद्गुरुमहात्म्य वर्णिलें आहे. तें असेः—

**सद्गुरुहून देव मोठा। जयास वाटे तो करंटा।**
**सुटला वैभवाचा फाटा। सामर्थ्यपिसें॥ ४०॥**
**सद्गुरुस्वरूप तें संत। आणी देवांस मांडेल कल्पांत।**
**तेथें कैंचें उरेल सामर्थ्य। हरिहरांचें॥ ४१॥**

म्हणौन गुरुसामर्थ्य आधीक । जेथें आटती ब्रह्मादिक ।
अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ॥ ४२ ॥

गुरुदेवास बराबरी । करी तो शिष्य दुराचारी ।
भ्रांति बैसली अभ्यांतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥

देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासि आला ।
सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनी ॥ ४४ ॥

म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें ।
जयासि वर्णितां भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ॥ ४५ ॥

असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहीं च न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥

या ओव्या वाचून व ब्रह्मादिकां हि पेक्षां सद्गुरूला उच्च स्थान दिलेलें पाहून शास्त्रीबावा अगदीं च कावरे बावरे झाले आहेत. त्यांतून

अल्पबुद्धि मानवी रंक । तयांसि हें कळेना ।

हें आपल्याला च म्हटलें आहे, असें वाटून शास्त्रीबावांचें पित्त फार च भडकलें ! ही त्यांची बावरलेली व भडकलेली वृत्ति इतक्या थराला गेली कीं, त्या भरांत ते बिनधोक बरळून गेले आहेत कीं, अंधभक्तावांचून असले उद्गार कोण काढील ? हें आपण काय म्हणत आहोंत, कोणाला म्हणत आहोंत, याचें त्यांना कांहीं भान राहिलें नाहीं ! जर कां या ओव्या श्रीसमर्थांच्या असतील—आणि त्या आहेत याविषयीं आतां कोणास शंका आहे—तर श्रीसमर्थांविषयीं आपणांस 'पूर्ण आदर व पूज्यभाव आहे' असें तोंडानें म्हणणारे हे दुसरे रामशास्त्री श्रीसमर्थांना 'शास्त्रपरिचय नसलेले, न्याय्य युक्तीचा लेश सुद्धां नसणारे, अंध भक्त' म्हणण्यास मुळीं च कचरणार नाहींत ! इतकी भैय्याशास्त्र्यांची 'न्यायसस्पृहता' प्रखर आहे ! चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, यांचें आलोडन करून भैय्याशास्त्र्यांनीं सार काढलें आहे कीं, वर वर्णिलेल्या गुरुमहात्म्यांत 'न्याय्य युक्तीचा लेश सुद्धां नाहीं.' गरीब बिचारे भैय्याशास्त्री! कोठून या शास्त्राच्या, न्यायाच्या, युक्तीच्या फंदांत पडले, कोण जाणे !

सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ॥
म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें ॥

इत्यादि वचनें वाचून शास्त्रीबावा फार च संतापले ! त्या संतापांत ते विचार-

तात, ' मानवदेहधारी गुरु हि नाश पावतात व पावले हि आहेत, वसिष्ठापासून रामदासापर्यंत जेवढे सद्गुरु झाले तेवढे आज कोठें आहेत ? ' शास्त्रीबावा रागावूं नका ! या तुमच्या प्रश्नांना समर्थांचें उत्तर असें आहे कीं,

अल्पबुद्धि मानवी रंक । तयांसि हें कळेना ।

शास्त्रीबावा, समर्थ कोठें आहेत म्हणून विचारता ? या तुमच्या प्रश्नाचें उत्तर म्हणून मी तुम्हांला उलट विचारतों, समर्थ कोठें नाहींत तें सांगा ?

शास्त्रीबावांच्या या सर्व संतापाचें कारण एक. सद्गुरु कोणाला म्हणतात, हें च आमच्या शास्त्रीबावांना समजलें नाहीं ! श्रीसमर्थांनीं वर जें सद्गुरुसामर्थ्य वर्णिलें आहे, त्यांतील सद्गुरूचें स्वरूप कसें आहे, तें शास्त्रीबावांना ठाऊक नाहीं, शास्त्रीबावांनीं गुरुगीता वाचली नाहीं, वाचली असली तरी ती त्यांना समजली नाहीं, समजली असली तरी ती त्यांना पटली नाहीं ! शास्त्रीबावांनीं गुरुगीता वाचली असती, ती त्यांना समजली आणि पटली असती, आणि तशांत शास्त्रीबावांना ' विश्रांतीचें वर्म ' कळलें असतें, तर या च ओव्या वाचून शास्त्रीबावा आनंदानें डोलूं लागते ! शास्त्रीबावा, तुम्हांस माझी एक नम्र विनंति आहे, तुमच्या या आक्षेपाचें खंडण माझ्याकडून होणार नाहीं, तें तुमचें तुम्ही च करूं शकाल, कृपा करून गुरुगीता वाचा, ती गुरुमुखानें श्रवण करा, म्हणजे तुमचा संताप शांत होईल ! तोंवर तुम्ही थोडेसें शांतपणें माझें ऐकाल तर मी तुम्हांस सांगतों कीं, देवादिकांहून हि सद्गुरु श्रेष्ठ होत, असें जे म्हणतात कीं नाहीं, त्या सद्गुरूचें स्वरूप कसें आहे, याचा थोडा विचार करा.

सद्गुरुस्वरूप तें संत ॥

तें सद्गुरुस्वरूप पहा, म्हणजे तुम्ही शुद्धीवर याल आणि आपण श्रीसमर्थांना नाहीं नाहीं तें काय बोललों, याचा तुम्हांस पश्चात्ताप होऊन गुरुकृपेस पुन्हां पात्र व्हाल ! शास्त्रीबावा, तें सद्गुरुस्वरूप असें आहे:

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

सांगा, शास्त्री, या सद्गुरुपदापुढें देवसामर्थ्य थोकडें आहे कां नाहीं !

ग्रंथ संग्रहालय ... ८८९९

स्वानुभवदिनकरावर तुमची मर्जी बहाल दिसते, त्या तुम्हांस स्वा. दि. चा दाखला दिला म्हणजे कांहीं पटेल, असें वाटतें. स्वानुभवदिनकरांत हुबेहुब ही च श्रीसमर्थांची विचारसरणी अवलंबिली आहे. स्वानुभवदिनकराचा कलाप ४ किरण ३ काढून पहा. दिनकर म्हणतात

> **म्हणौनि ब्रह्मापरिस अनंत गुण ।**
> **श्रीसद्गुरु स्वामी हें यथार्थ वचन ।**
> **यदर्थीं न द्यावें सहसा दूषण ।**
> **संतीं महंतीं सज्जनीं ॥** ४-३-६६

हा कांहीं विचार न पाहतां, श्रीसमर्थांना दूषण द्यावयास तुम्ही सरसावलात त्या तुम्हांस काय म्हणावें ? शास्त्रीबावा, श्रीसमर्थांच्या वडील बंधूंना तरी मानाल कां ? कां साऱ्यांना च शास्त्रपरिचय नसलेले अंध भक्त म्हणणार ? अलबत म्हणणार ! श्रेष्ठ असोत, समर्थ असोत, कोणी असोत, न्यायसस्पृह, सारासारतत्त्वविवेचनपटु, प्रमाणशरण, विद्यामयूर भय्याशास्त्री कोणाचा मुलाजा करणार नाहींत ! मग कशाला उगी च श्रेष्ठांना आणखी भैय्याशास्त्र्यांच्या तोंडीं द्या ? पण, नाहीं, शास्त्री, तुम्हीं श्रेष्ठांना कांहीं सहसा झिडकारूं शकणार नाहीं ! दासबोधाचें नांव रामदासबोध असें न ठेवितां दासबोध असें कां ठेविलें, या आक्षेपाचें समर्थन करीत असतां शास्त्रीबुवांनीं श्रेष्ठांची थोरवी गायली आहे. **" श्रेष्ठांनीं धर्मशास्त्राचें बरें च अध्ययन केलें होतें व संस्कृत भाषेचा परिचय हि त्यांस चांगला होता "** असें श्रेष्ठांना सरटिफिकेट देऊन शास्त्रीबावा चुकले आहेत. तेव्हां आतां श्रेष्ठांना " शास्त्रपरिचय " नव्हता, असें म्हणण्याला शास्त्रीबावांना तोंड उरलें नाहीं. श्रेष्ठांना शास्त्रीबावा ' अंध भक्त ' किंवा ' न्याय्य युक्तीचा लेश नसणारे ' म्हणणार नाहींत, अशी हि खात्री वाटते. कारण शास्त्रीबावांनीं श्रेष्ठांना " भविष्यज्ञ " म्हणून त्यांच्या ' रामभक्तीची, ' साधुत्वाची ' व ' भक्तिरसपरिप्लुत भाषेंत फार च सयुक्तिक रीतीनें लिहून समाधान ' करण्याच्या केलेची तरफदारी केली आहे. अशा रीतीनें शास्त्रीबावांपासून श्रेष्ठांना कांहीं भीति उरली नाहीं, तेव्हां श्रेष्ठांचें मत सादर करण्याला कांहीं हरकत नाहीं. शास्त्रीबावा, श्रेष्ठ आपल्या सुगमोपाय ग्रन्थांत म्हणतातः

> **गुरु म्हणिजे प्रत्यक्ष मानव ।**
> **परि तो सकळा देवाचा हि देव ।**

ऐसा होय शिष्यसद्भाव ।
तरी च तो कृतार्थ ॥ २×६४

" कांहीं माहात्म्यग्रन्थ सोडून संस्कृत किंवा प्राकृत कोणत्या च ग्रन्थांत सद्गुरूला इतकें महत्त्व दिलेलें नाहीं, " असें शास्त्री बेधडक म्हणतात. तेव्हां शास्त्रीबावांचें वाचन अकटोविकट दिसतें असें म्हणायाला कांहीं हरकत आहे ? कां, दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, स्वानुभवदिनकर, सुगमोपाय इत्यादि सारे ग्रन्थ माहात्म्यग्रन्थ च होत ?

सद्गुरूचें सगुण ध्यान आणि निर्गुण ध्यान हीं भिन्न असतात ही एक गोष्ट ठाऊक नसल्यामुळें, या चार हि पोट आक्षेपांत शास्त्रीबावांची मोठी तारांबळ उडालेली आहे. या एका पोट आक्षेपाची वाट लागल्यानंतर आतां बाकीचे तिन्ही पोट आक्षेप थोडक्यांत उडवितां येतील.

( २ ) दासबोधांत संपूर्ण एक दशक इतरांच्या स्तवनाकरितां खर्ची घातला असतां श्रेष्ठतम श्रीरामचंद्रांकरितां एक ओवी सुद्धां खर्ची घातली नाहीं, हा शास्त्रीबावांचा समज च मुळीं चुकीचा आहे. सद्गुरुनमनाची श्रीसमर्थांची पद्धति सर्वत्र एक आहे. गणेश, शारदा, सद्गुरु, संत, सज्जन, कुलेश्वरु, हा त्यांच्या नमनाचा क्रम बहुधा आढळतो. गणेशशारदास्तवनानंतर निर्गुणरूप सद्गुरूला नमन करावयाचें व पुढें सगुणरूप श्रीरामचंद्राला नमन करावयाचें, असा क्रम त्यांनीं पुष्कळदां अवलंबिला आहे. त्यामुळें दशक १ समास ४ यांत जें त्यांनीं सद्गुरूला नमन केलें आहे तें निर्गुणरूप श्रीरामाला च होय, यांत काय शंका आहे ?

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १॥
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती ।
तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ॥ २ ॥
मज न कळे हा विचारु । दुरूनि माझा नमस्कारु ।
गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज ॥ ३ ॥
होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी ॥ ४ ॥
मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्यायमान । काय करूं ॥ ५ ॥

नातुडे मुख्य परमात्मा । ह्मणौनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा ॥ ६ ॥
आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ ७ ॥
जय जया जि सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ ८ ॥

इत्यादि हें श्रीरामाचें स्तवन नाहीं, तर कोणाचें आहे ? अशा रीतीनें पहिल्या दशकाच्या चवथ्या समासांत निर्गुणरूप सद्गुरूला नमन करून पुढें संत-सज्जन, श्रोते जन, कवीश्वर, सकळ सभा, परमार्थ आणि नरदेह यांचें स्तवन करण्यांत पहिला दशक संपला, म्हणून पुन्हां दुसऱ्या दशकाच्या आरंभीं

ॐनमो जि गजानना । येकदंता त्रिनयना ।
कृपादृष्टीं भक्तजना । अवलोकावें ॥ २-१-१
तुज नमूं वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते ।
अंतरीं वसे कृपावंते । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥
वंदून सद्गुरुचरण । करून रघुनाथस्मरण ।
त्यागार्थ मूर्ख लक्षण । बोलिजेल ॥ ३ ॥

गणेश, शारदा, निर्गुणरूप सद्गुरु व सगुणरूप सद्गुरु यांना नमन करून विषयाला आरंभ केला आहे. पण या च तिसऱ्या ओवीचा अर्थ न समजल्यामुळें शास्त्रीबावांनीं थोडें अकांडतांडव केलें आहे, त्याचा आतां आपण विचार करूं.

( ३ ) तिसऱ्या पोट आक्षेपांत शास्त्री म्हणतात

वंदून सद्गुरुचरण । करून रघुनाथस्मरण ॥ २-१-३

या ओवींत सद्गुरु वेगळा व राम वेगळा असें कल्पिलें असल्यामुळें दासबोध ग्रन्थ श्रीसमर्थांचा नाहीं, हें स्पष्ट होतें, कारण राम हे च श्रीसमर्थांचे गुरु होते. या हि ठिकाणीं शास्त्रीबावांनीं तो च घोटाळा केला आहे. सगुणरूप आणि निर्गुणरूप अशीं सद्गुरूचीं ध्यानें असतात, ही गोष्ट विसरल्यामुळें शास्त्रीबावांचा हा सारा घोटाळा झाला आहे. शास्त्रीबावांना माझें म्हणणें पटून त्यांचा घोटाळा नाहींसा व्हावा म्हणून श्रीसमर्थांच्या इतर प्रकरणांतील दोन तीन उदाहरणें देतों.

(श्री) युद्धकांड हें श्रीसमर्थांचें नाहीं, असें म्हणण्याचा कोणी वेडेपणा करील, असें वाटत नाहीं. त्या युद्धकांडाला श्रीसमर्थांनीं आरंभ केला आहे, तो असा:

नमूं विघ्नहर्ता शुळी सैन्यभर्ता।
मुढा धर्तकर्ता विभांडी विवर्ता।
चतुर्भूज मत्तानन् शोभताहे।
तया चिंतितां भ्रांति कोठें न राहे॥ १

सदा भेदहंती महंतीं महंता।
सदा ज्ञानवंती नियंतीं नियंता।
सुविद्या कळा स्फूर्तिरूपा अमूपा।
नमस्कारिली शारदा मोक्षरूपा॥ २

नये बोलतां चालतां रूप कांहीं।
नये भावितां दावितां सर्वथा ही।
सदा संत आनंतरूपीं भरावें।
पदीं लागतां सद्गुरूचे तरावे॥ ३

अशा रीतीनें गणेश, शारदा, सद्गुरु यांना नमन करून श्रीसमर्थ पुढें रामाला नमस्कार करितात:

नमस्कारिला राम कोदंडपाणी।
पुढें गावया रामरामेति वाणी।
भविष्योत्तरें बोलिलीं जें पुराणीं।
उमाकांत ध्यातो सदा शूळपाणी॥ ४

(रा) श्रीसमर्थांचीं चवदा ओव्या शतकें आहेत. तीं त्यांचीं नाहींत, असें म्हणण्याची शास्त्रीबावांची प्राज्ञा नाहीं. त्यांपैकीं तेराव्या शतकाच्या पहिल्या तीन ओव्या अशा:

नमूं येकदंता माता ब्रह्मसुता।
सद्गुरु समर्था दंडवत॥ १

दंडवत माझें संतसज्जनासी।
भाविक जनासीं आळिंगन॥ २

आळंगीला राम सबाहे अंतरीं।
संसारसागरीं तरावया॥ ३

येथें आतां काय करणार, शास्त्रीबावा? म्हणा कीं, हें हि प्रकरण श्रीसमर्थांचें नाहीं, म्हणून! ‘सद्गुरु समर्था दंडवत’ आहे तें श्रीरामदासांना आहे व पुढें ‘राम’ आळंगिला आहे, तेव्हां हें प्रकरण रामदासांचें नसून कोणा

शिष्याचें असावें, असें म्हणता कां ? शास्त्रीबावा, तुम्ही काय वाटेल तें म्हणूं शकाल याविषयीं मला शंका उरली नाहीं; पण कांहीं हि म्हणण्यापूर्वी निदान तें तेरावें शतक संपूर्ण वाचा, अशी विनंति आहे. आपण रामदासांना समर्थ म्हणतो आणि रामदास रामाला समर्थ म्हणत, ही सर्वमान्य गोष्ट हि विसरल्यामुळें तुम्ही पुढें एक पोरकट आक्षेप घेतला आहे, तो च येथें हि घेण्याला प्रवृत्त होता कीं काय, हें पाहणें आहे; असो. येथें हि सद्गुरूला व रामाला निरनिराळें नमन आहे, तें सद्गुरूच्या निर्गुणरूपाला व सगुणरूपाला होय.

(म) शास्त्रीबावा, पुन्हां एकदा **आत्मारामा** कडे वळा. तो ग्रन्थ हातीं घ्या आणि पहा. त्यांत गणेश आणि शारदा यांना नमन करून मग

**वंदीन सद्गुरु स्वामी ॥ ७ ॥**

म्हणून **सद्गुरूला** नमस्कार केला आहे, आणि मग

**आतां नमस्कारीन राम ॥ ११ ॥**

म्हणून **रामाला** नमस्कार केला आहे.

तात्पर्य, सद्गुरु राम व जानकीजीवन राम हीं रूपें भिन्न आहेत, ही गोष्ट लक्ष्यांत न आल्यामुळें शास्त्रीबावा वृथा फजित पावले आहेत.

( ४ ) चवथ्या पोट आक्षेपांत आतां कांहीं च राम उरला नाहीं. दासबोधाचे कर्ते निस्सीम गुरुभक्त होते. मात्र त्यांचे गुरु राम नव्हत, असा जो शास्त्रीबावांना भ्रम झालेला आहे, त्याचा निरास मागील पोट आक्षेपांचें खंडण करितांना झालेला च असल्यामुळें जास्त विवेचन करणें नको.

## आक्षेप दहावा–

सरली शब्दाची खटपट । आला ग्रन्थाचा सेवट ॥ असें सातव्या दशकाच्या दहाव्या समासांत म्हटलें आहे व दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं प्रांजळ केलें ॥ असें नवव्या दशकाच्या सहाव्या समासांत आहे. त्यावरून ' हल्लीं प्रसिद्ध असलेला दासबोध मूळचे स्वरूपांत नसून त्यांत कांहीं भाग प्रक्षिप्त आहे असें म्हणणें भाग आहे. मात्र त्याचा कर्ता कोण व मूळचा दासबोध कोणता, हें गुढ राहतें तें राहतें च.'

दासबोधांत कांहीं प्रक्षिप्त भाग आहे, असें फक्त विक्षिप्तानें म्हणावें. कल्याणांच्या, आण्णाप्पांच्या, इत्यादिकांच्या हातच्या प्रती बाजूस ठेवल्या तरी ज्यावर प्रत्यक्ष शक दिलेला आहे, अशा ज्या दासबोधाच्या प्रती उपलब्ध आहेत, त्यांत सर्वांत जुनी प्रत शक १६०६ तील आहे. १६०३ त श्रीसमर्थ निजधामास गेले. त्या तीन वर्षांच्या अवधींत श्रीसमर्थांच्या दासबोधांत कोणी कांहीं प्रक्षिप्त भाग घुसडून दिला असेल व तो महाराष्ट्रानें मान्य केला असेल, अशी कल्पना करणाराचे डोकें तपासल्यावांचून त्या कल्पनेवर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. यासंबंधानें माझी समजूत काय आहे ती मी श्रीमत् दासबोधाच्या प्रस्तावनेंत दिलेली आहे. ती प्रस्तावना वाचण्याची कृपा शास्त्रीबावांनीं केली असती, म्हणजे त्यांनीं असलें विक्षिप्त विधान केलें नसतें. श्रीमत् ग्रन्थराजाचे दशक १ ते ८ श्रीसमर्थांनीं एका वेळीं लिहून ग्रन्थ संपूर्ण केला. पण पुढें प्रसंगोपात जे अनेक स्फुट समास लिहिले गेले, त्या सर्वांची अखेरीस विल्हे लावून एकंदर ग्रन्थ ' दशक फोडून विशद केला. ' हें अनुमान प्रथम शके १८२७ त दासबोधाच्या प्रस्तावनेंत सुचविलें गेलें व मला मोठा आनंद वाटतो कीं, आत्मारामहाराजांच्या दासविश्रामधामांत माझ्या अनुमानाला बळकटी आणणारा पुरावा मिळाला आहे. श्रीसमर्थशिष्य तंजावरमठपति भीमस्वामी हि या च अनुमानाचें समर्थन करीत आहेत; असो. शास्त्रीबावांच्या पहिल्या, तिसऱ्या व पांचव्या आक्षेपांचें जें वर खंडण करण्यांत आलें आहे तें वाचून हि, मूळचा दासबोध कोणता व त्याचे कर्ते कोण याचें ज्याला गूढ राहील त्याचें डोकें बरें च गढूळ झालें असलें पाहिजे !

## आक्षेप अकरावा-

> ३-१०-७४ व ८-८-१२ या ओव्यांत सर्वज्ञपण व सद्गुरुत्व म्हणजे सिद्धपण ग्रन्थकर्त्यानें स्वतःकडे घेतलें आहे. ××× रामदासांना स्वतःला सर्वज्ञता व सिद्धता इष्ट नव्हती. ××× रामदास कांहीं पूर्वीच्या शास्त्र्याप्रमाणें किंवा अर्वाचीन वकिलाप्रमाणें प्रासंगिक वावदूक व्यवहारोपजीवी नव्हते. ××× म्हणून ह्या ओव्या अथवा त्या ओव्या ज्या ग्रन्थांत आहेत तो ग्रन्थ, रामदासांनीं केला च नसावा, असें कोणी हि समंजस म्हणूं शकेल.

या आक्षेपाचें खंडण करितांना थोडी पुनरुक्ति होणार आहे. ८-८-१२ ही ओवी अशी आहे:

ऐसें ऐकोन बोलणें ।
वक्ता वदे सर्वज्ञपणें ।
श्रोतां सावधान होणें ।
येकाग्र चित्तें ॥

आतां या समासाची शेवटची ओवी अशी:

ऐसें जयास जालें ज्ञान ।
तया पुरुषाचें लक्षण ।
पुढिले समासीं निरूपण ।
बोलिलें असे ॥

त्या पुढच्या समासाची म्हणजे ८×९ समासाची शेवटची ओवी अशी:

कोणे स्थितीनें राहाती ।
कैसा अनुभव पाहाती ।
रामदास म्हणे श्रोतीं ।
अवधान देणें ॥

अर्थात् आठव्या दशकाचा नववा समास समर्थांचा, तर आठवा हि समास समर्थांचा च यांत शंका रहात नाहीं. त्या आठव्या समासांतील कांहीं ओव्यांच्या अर्थावरून तो समास समर्थांचा नाहीं, असें म्हणणें युक्त होणार नाहीं, तर तुम्ही त्या ओव्यांच्या अर्थावरून जें दूषण देऊं पहातां, ती तुमची च चुकी आहे, असें म्हटलें पाहिजे.

ती च गति ३-१०-७४ या ओवीची. ती ओवी अशी:

देखोन शिष्याची अनन्यता ।
भावें बोळला सद्गुरु दाता ।
स्वानंद तुंबळेल आतां ।
पुढिले समासीं ॥

पुढचा समास म्हणजे चवथ्या दशकाचा पहिला समास. सबंध चवथा दशक नवविधाभक्तीचा आहे. त्यांत आठव्या दशकाचा उल्लेख आलेला असल्यामुळें तो समर्थांचा च होय, हें मागें च आपण पाहिलें आहे, आणि म्हणून

तिसऱ्या दशकाचा दहावा समास हि समर्थांचा च ठरतो. त्यांतल्या एकाद्या ओवीवरून तो समास समर्थांचा नाहीं, असें तुम्ही ठरवूं पहाल, तर तुमची ती विचारसरणी च सदोष म्हटली पाहिजे.

शिवाय ३-१०-७४ व ८-८-१२ या दोन ओव्यांवरून, शास्त्रीबावा जें दूषण देऊं पहात आहेत, तें दूषण श्रीसमर्थांकडे येत नाहीं. संवादरूप ग्रन्थांचा हा स्वभाव आहे. संवादरूप ग्रन्थामध्यें एक वक्ता आणि दुसरा श्रोता असावयाचा च व वक्ता स्वतःकडे सर्वज्ञपण न घेईल तर त्या उभयतांमध्यें संवाद च संभवत नाहीं.

आक्षेपाचें खंडण झालें. या ओव्या दुसऱ्या कोणाच्या नसून त्या समर्थांच्या च आहेत व त्यांत दूषण देण्यासारखें कांहीं नाहीं. पण शास्त्री म्हणतात, असल्या ओव्या लिहिण्याला 'रामदास कांहीं पूर्वींच्या शास्त्र्याप्रमाणें किंवा अर्वाचीन वकिलाप्रमाणें प्रासंगिक वावदूक व्यवहारोपजीवी नव्हते.' शास्त्रीबावा, समर्थांनीं त्या ओव्या लिहिल्या खऱ्या, मग तुम्ही त्यांना कांहीं हि म्हणा ! शास्त्री फक्त पूर्वींचे व वकील हल्लींचे प्रासंगिक वावदूक व्यवहारोपजीवी होत, असा शास्त्रीबावांचा शोध आहे. हल्लींचे शास्त्री मात्र न्यायसस्पृह होत ! शास्त्रीबावा, तुम्ही वकिलांना दूषण दिलेत तें ठीक, पण पूर्वींच्या शास्त्र्यांनीं तुमचें काय घोडें मारलें होतें ? त्या पूर्वींच्या शास्त्र्यांचे च तुम्ही वंशज ना ?

## आक्षेप बारावा—

"दशक ११ समास १०

ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न संपडावें । येकायेकीं ॥ ४ ॥
कीर्तिरूपें उदंड ख्यात ।
जाणती लाहानथोर समस्त ।
वेश पाहातां शाश्वत ।
येक हि नाहीं ॥ ५ ॥
वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणेविण येक क्षण । जाऊं च नेदी ॥ ७ ॥

पुतें कोणाकडे पाहेना । पुतें कोणासीं बोलेना ।
पुतें येके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपुली स्थिती अनुमाना । येवों च नेदी ॥ १० ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें ।
साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ २३ ॥
हें प्रचितीनें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ।
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी येकें ॥२४॥

" दशक १५ समास २

प्रत्येयें बोलोन उठोन गेला ।
चटक लागली लोकांला ।
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥१९॥
परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सांपडेना ।
वेष पाहातां हीन दीना । सारिखा दिसे ॥ २० ॥
उदंड करी गुप्तरूपें ।
भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें येशकीर्तिप्रतापें ।
सीमा सांडिली ॥ २१ ॥
ठाइं ठाइं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मछरमतांची गोवी । लागों च नेदी ॥ २२ ॥
खनाळामधें जाऊन राहे ।
तेथें कोणी च न पाहे ।
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ २३ ॥
अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहाणें नेमक ।
सृष्टीमधें सकळ लोक । धुंडीत येती ॥ २४ ॥
तेथें कोणाचें चालेना ।
अनुमात्र अनुमानेना ।
कट्ट घालून राजकारणा ।
लोक लावी ॥ २५ ॥

लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ २६ ॥

ठाइं ठाइं उदंड तांबे । मनुष्यमात्र तितुके झोंबे ।
चहुंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धी ॥ २७ ॥

" पूर्वकालीन शुकवामदेवादिक असोत, परंतु अर्वाचीन ज्ञानदेवतुकारामापर्यंतचे साधु निस्पृह च होते ना ? यांतून कितीकांनीं × × × या प्रकारचें आचरण केलें आहे ?

" वास्तविक पाहतां निस्पृह शब्दाच्या अर्थाप्रमाणें, गुप्तरूपानें आपला अधिकार स्थापणें, मुत्सद्दीपणानें आपलें अंतरंग कळूं न देतां कामाच्या अनुरोधाप्रमाणें जरूरी पुरता विश्वास दाखविणें व आपल्या लोकांकडून कट करवून दुसऱ्यांस राजकारणांत गुंतविणें, इत्यादि वागणूक शोभत नाहीं.

" रामदासांचे हयातीपासून आजपर्यंत झालेल्या त्यांच्या शिष्यांतून आपल्या गुरूंच्या या उपदेशाप्रमाणें कोणी वागला नाहीं व वागत हि नाहीं.

" अर्थात् या समासांतील वर्णन म्हणजे पुढें वागणाऱ्याकरितां लिहिलें नसून, या वर्णनाप्रमाणें पूर्वी वागलेल्या निस्पृहाची वर्तणूक पाहून लिहिलेलें वर्णन होय.

" या वर्णनाप्रमाणें रामदासांची वर्तणूक होती. पण त्यांनीं ती स्वतःची वर्तणूक स्वकृत ग्रन्थांत स्वमहतीदर्शक शब्दांनीं लिहिणें संभवनीय नाहीं.

> " अर्थात् रामदासांना पूज्य मानणाऱ्या व त्यांच्या प्रत्येक आचरणाकडे गौरवानें पाहणाऱ्या त्यांच्या प्रत्यक्ष शिष्यानें किंवा सांप्रदायिकानें च ती लिहिली असली पाहिजे हें उघड आहे. "

विद्यामयूरांचा हा आक्षेप वाचून पहिली गोष्ट निदर्शनास येते ती अशी कीं, आतांपर्यंत श्रीसमर्थांना उघड दोष देण्यास विद्यामयूर सरसावले नव्हते, पण, हा आक्षेप घेतांना तो बुरखा त्यांनीं साफ झुगारून दिला आहे. शास्त्रीबावांना या ओव्यांचा अर्थ हि धड लावतां आला नाहीं, पण त्याच्याशीं आपणांस आज कांहीं कर्तव्य नाहीं. शास्त्री म्हणतात, इत्यादि इत्यादि वागणूक निस्पृहाला शोभत नाहीं, श्रीसमर्थांची वर्तणूक त्याप्रमाणें होती, तेव्हां शास्त्र्यांच्या मतें श्रीसमर्थ निस्पृह तरी नव्हते, किंवा त्यांची वर्तणूक त्यांना न शोभण्यासारखी होती ! श्रीसमर्थ निस्पृह होते कां नव्हते व त्यांची वर्तणूक त्यांना शोभण्यासारखी होती कां नव्हती, हें जग ठरवील, हें महाराष्ट्र ठरवील, हें श्रीसमर्थसांप्रदायिक ठरवितील. तेथें शास्त्रीबावांनीं लुडबुडावयास नको. पण दासबोधांत सांगितलेल्या निस्पृहलक्षणांप्रमाणें रामदासांची वर्तणूक होती, या कबुलीनें शास्त्रीबावांनीं स्वतःच्या मताला स्वतःच मूठमाती देण्यासाठीं खड्डा मात्र खणला आहे, हें या शास्त्रज्ञाच्या डोक्यांत हि आलें नाहीं. कसें तें पहा. दशक ११ समास १० व दशक १५ समास २ यांतील उपदेशाला उद्देशून शास्त्री म्हणतात " रामदासांचे हयातीपासून आजपर्यंत झालेल्या त्यांच्या शिष्यांतून आपल्या गुरूंच्या या उपदेशाप्रमाणें कोणी वागला नाहीं व कोणी वागत हि नाहीं. " आणि शास्त्री कबुली देतात कीं, " या वर्णनाप्रमाणें रामदासांची वर्तणूक होती. " तेव्हां आतां या पंडिताला माझा सवाल असा आहे कीं, ११×१० त

**हें प्रचितीनें बोलिलें ।**

असें आहे, ती कोणाची प्रचिती ? कोणी शिष्य तर तसें वागला च नाहीं, असें तुम्ही म्हणता आणि समर्थांची वर्तणूक तशी होती, हें हि कबूल करिता, मग हें श्रीसमर्थांवांचून दुसरा कोण प्रचितीनें बोलत आहे ?

आधीं केलें मग सांगितलें ।

तें श्रीसमर्थांवांचून कोणी केलें आणि सांगितलें ? तेव्हां, शास्त्रीबावा, तुमच्या च तोंडानें असें ठरतें कीं, हे समास दुसऱ्या कोणाचें नसून ते श्रीसमर्थांचे च आहेत. जो दासबोधग्रन्थ वाचील आणि समर्थांकडे पाहील, जो त्या वेळच्या देशस्थितीचा विचार करील आणि श्रीसमर्थचरित्र आठवील, त्याला हें सहज पटेल कीं, दासबोध ग्रन्थ श्रीसमर्थांनीं च लिहावा, दुसऱ्या कोणाची तो लिहिण्याची योग्यता नव्हती !

१५×२ हा समास श्रीसमर्थांचा च आहे, त्याला आणखी एक प्रमाण आहे. १५ व्या दशकांतील २ ऱ्या समासाच्या ओव्या उतरतांना २७ वी ओवी उतरतां च शास्त्रीबावांच्या न्यायसस्पृहतेनें हात आखडता घेण्यास शास्त्रीबावांना हळूं च सुचविलें. अशी वेळेवर उपयोगीं पडणारी न्यायसस्पृहता असावी लागते ! शास्त्रीबावा, तुमच्या न्यायसस्पृहतेला २७ व्या ओवीच्या पुढल्या तीन ओव्या वाचावयास मी आतां भाग पाडतों.

उपासनेचा गजर ।
स्थळोस्थळीं थोर थोर ।
प्रत्ययानें प्राणीमात्र ।
सोडविले ॥ २८ ॥

ऐसे कैवाड उदंड जाणे ।
तेणें लोक होती शाहाणे ।
जेथें तेथें प्रत्यये बाणे ।
प्राणिमात्रासी ॥ २९ ॥
ऐसी कीर्ति करून जावें ।
तरी च संसारास यावें ।
दास ह्मणे हें स्वभावें ।
संकेतें बोलिलें ॥ ३० ॥

हे शास्त्रीबावांच्या न्यायसस्पृहते, बाई, हे दास कोण आणि हा समास कोणाचा हें आतां तरी शास्त्रीबावांच्या कानांत सांगशील काय ? आणि शास्त्रीबावा, तुह्मी त्या १९ ते २७ ओव्या उतरून घेतल्या तेव्हां तुमच्या डोळ्यावर कसली झांपड पडली होती कीं, ३० व्या ओवींतील दास तुह्मांस दिसले नाहींत ! आणि फिरून ह्मणता पूर्वीचे शास्त्री ‘ प्रासंगिक वावदूक व्यवहारोपजीवी होते ’ ? आणि ह्मोंचे कसे आहेत ? सांगा तुमचें तुम्हांला !

शास्त्रीबावांचा हा आक्षेप म्हणजे हेत्वाभासाचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ११×१० व १५×२ यांतील निस्पृहाची शिकवण पाहून, श्रीज्ञानदेवतुकारामभक्त व श्रीसमर्थभक्त यांच्यांत भांडण लावण्याच्या हेतूनें शास्त्री विचारतात, " पूर्वकालीन शुकवामदेवादिक असोत, परंतु अर्वाचीन ज्ञानदेवतुकारामापर्यंतचे साधु निस्पृह च होते ना ? यांतून कितीकांनीं या प्रकारचें आचरण केलें आहे ? " शास्त्रीबावा, एक तर या दोन्ही समासांतील शिकवणीचा अर्थ तुम्हांला मुळीं च समजला नाहीं, असें मी उघड म्हणतो, क्षमा करा. मी तुम्हांला सांगतों कीं, या समासांतील निस्पृहलक्षणांप्रमाणें श्रीज्ञानेश्वरतुकारामादि निस्पृहांचें तंतोतंत वर्तन होतें. कसें तें मी येथें विस्तारानें सांगत बसत नाहीं. पण हें माझें नुसतें निश्चयात्मक म्हणणें तुम्हांस पटत नसेल आणि त्यांचें वर्तन त्याप्रमाणें नव्हतें, असें जरी तुमचें मत कायम राहिलें, तरी त्यांच्याकडे कोणता च कमीपणा येत नाहीं. या लक्षणांनीं युक्त तो च निस्पृह असें श्रीसमर्थ कोठें हि म्हणत नाहींत. निस्पृहांनीं याप्रमाणें वागावें, एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. हें मी काय म्हणतों, तें तुम्हांस न समजेल तर तर्कशास्त्राची आणखी एकवार उजळणी करा म्हणजे कदाचित् समजेल.

## आक्षेप तेरावा—

> " दासबोधाचा विषय परमार्थमार्ग दाखविण्याचा असतां त्यांत लेखनसमास कां यावा हें समजत नाहीं. × × × दशक १९ ह्यांत लेखनसमास पहिला व दुसरा अर्थभेदसमास आहे. × × × दुसऱ्या समासांत अर्थभेद सांगतो म्हणून पहिल्या ओवींत म्हटलें आहे, पण पुढें प्रत्यक्ष तसें कांहीं च सांगितलें नाहीं. हे दोन्ही समास ग्रन्थांतील मूळ विषयास अनुपयुक्त असून पूर्वापरसंबंधहीन आहेत.
>
> " कांहीं लोक असें म्हणतात कीं, रामदासांच्या शिष्यवर्गांत राजापासून कारकुनापर्यंत पुष्कळ लोक होते, तेव्हां अशा लोकांकरितां आपल्या ग्रन्थांत कांहीं शिकवणुक लिहिणें जरूर होतें. × × × पण रामदास भाडोत्री लेखक नसल्यानें त्यांना शिष्यच्छंदानुवर्तित्वाची जरूरी नव्हती.

" अर्थात् हा ग्रन्थ कोणी तरी रामदासेतरानें च लिहिला असावा, असें अनुमान होतें. "

शास्त्रीबावांच्या या आक्षेपाचा मथितार्थ असा कीं, १९ व्या दशकाचा १ ला लेखनसमास लिहिणारा भाडोत्री लेखक असला पाहिजे, रामदास कांहीं तसे नव्हते, सबब तो समास व तो समास ज्यांत आहे तो दासबोध ग्रन्थ रामदासांनीं लिहिलेला नसला पाहिजे. ती च कथा त्याच्या पुढच्या समासाची.

आतां हे दोन्ही समास जर श्रीसमर्थांनीं लिहिले आहेत, असें ठरलें, तर शास्त्रीबावा श्रीसमर्थांना निःशंकपणें भाडोत्री लेखकांत काढणार! विविधज्ञानविस्ताराकडून शास्त्रीबावांना त्यांच्या विद्वत्ताप्रचुर लेखांबद्दल कांहीं बिदागी मिळाली आहे कीं काय, आम्हांस ठाऊक नाहीं, पण मग ही भाडोत्री लेखकाची कल्पना शास्त्रीबावांना कशावरून सुचली, कोण जाणे ? असो. हा कांहीं महत्त्वाचा मुद्दा नाहीं. विविधज्ञानविस्ताराच्या मताप्रमाणें आपला 'सिद्धान्त सभ्यपणानें आणि समतोलपणानें वाचकांपुढें मांडणारे' शास्त्री १९ व्या दशकांतील समास १ व २ यांच्या लेखकास भाडोत्री म्हणोत कीं आणखी कांहीं म्हणोत, आपणांपुढें प्रश्न असा आहे, ते दोन समास कोणाचे ?

हे दोन्ही समास रामदासांचे नसावेत असें म्हणण्याला शास्त्री तीन कारणें देतातः ( १ ) 'दासबोधाचा विषय परमार्थमार्ग दाखविण्याचा असतां त्यांत लेखनसमास कां यावा हें समजत नाहीं.' तसें च ( २ ) 'हे दोन्ही समास मूळ विषयास अनुपयुक्त असून पूर्वापरसंबंधहीन आहेत.' शिवाय ( ३ ) 'दुसऱ्या समासांत अर्थभेद सांगतो म्हणून पहिल्या ओवींत म्हटलें आहे, पण पुढें प्रत्यक्ष तसें कांहीं च सांगितलें नाहीं.'

बरें झालें शास्त्रीबावांची दृष्टि या दोन च समासांवर पडली. दासबोधाचा विषय 'परमार्थमार्ग दाखविण्याचा' असतां दासबोधांत झोंपेचा समास कशाला, मूर्खलक्षणांचा समास कशाला, निदान पढतमूर्खलक्षणांचा तरी कशाला, राजकारणाचे समास कशाला, यत्नाची प्रतिष्ठा कशाला, नाना चातुर्याचीं लक्षणें कशाला, सूर्य, पृथ्वी, आप, इत्यादिकांचें स्तवन कशाला, भिक्षेची महती कशाला, असा शास्त्रीबावांनीं सारखा भडिमार

चालविला असतां तर त्यांचें तोंड धरण्याचें सामर्थ्य कोणांत होतें ? बिचाऱ्या शास्त्रीबावांचा आक्षेप अगदीं थोडा आहे, **परमार्थमार्गांत लेखन कशाला** ? परमार्थमार्गाला लेखनाचें इतकें काय वावडें आहे, हें शास्त्री-बावांना माहीत ! तथापि शास्त्रीबावांच्या आक्षेपाचें उत्तर देणें सोपें आहे. ' परमार्थमार्ग दाखविणें एवढा च दासबोधाचा विषय ' हें शास्त्रीबावांना कोणी सांगितलें ? एकंदर ग्रन्थावरून तसें दिसत नाहीं, पहिल्या समासांत हि तसें म्हटलें नाहीं. मग दासबोधाचें साम्राज्य शास्त्रीबावा इतकें संकुचित कां करूं पहातात ?

**मूर्ख येकदेशी होतो ।**
**चतुर सर्वत्र पाहातो ।**

**जैसा बहुधा होऊन भोगितो ।**
**नाना सुखें ॥ ११–१०–१**

**तो चि अंतरात्मा महंत ।**
**तो कां होईल संकोचित ॥**

असा दासबोधाचा प्रशस्त प्रांत असतां, त्याला शास्त्रीबावा संकुचित करूं पहा-तात, तेव्हां त्यांना काय ह्मणावें? शास्त्रीबावा, महाराष्ट्राचा **ग्रन्थसाहेब** महारा-ष्ट्राला सर्व प्रकारची शिकवण देणारा ग्रन्थ आहे. त्यांत लहानापासून थोरापर्यंत, सर्व तऱ्हेच्या आणि दर्जाच्या लोकांना सर्व तऱ्हेची स्वहिताची शिकवण आहे. त्याचा आश्रय मुलांनीं करावा थोरांनीं करावा, गृहस्थांनीं करावा निस्पृहांनीं करावा, विद्यार्थ्यांनीं करावा विद्यामयूरांनीं करावा, भाविकांनीं करावा ज्ञान्यांनीं करावा, स्वराज्यसंस्थापकांनीं करावा स्वराज्यचालकांनीं करावा, सर्वांनीं करावा. असें असतां शास्त्रीबावांची दृष्टि इतकी संकुचित कशानें झाली ? शास्त्रीबावा, दासबोधांत लेखनसमास कशाला, असें तुम्ही विचा-रावें, हें आश्चर्य नव्हे ? तुम्हांला श्रीसमर्थांचें चरित्र माहित आहे ना ? त्यांचे साऱ्या भरतखंडभर शेंकडो मठ होते आणि हजारों शिष्य पसरलेले होते, हें तुम्हांस माहीत आहे ना ? हे सारे मठ म्हणजे त्या वेळचीं इतकीं विद्यापीठें होतीं, इतकीं समर्थविद्यालयें होतीं, हे तुम्ही जाणता ना ? त्या मठांतून संस्कृतप्राकृत ग्रन्थांचा संग्रह केलेला असे, हें तुमच्या कानावरून गेलेलें आहे ना ? आणि शास्त्रीबावा, त्या वेळीं आतां सारखे छापखाने नव्हते, इतकें ठाऊक असण्यापुरतें तुम्हांला शिक्षण मिळालें आहे ना ? आणि इतकें

सगळें ठाऊक असून दासबोधांत लेखनसमास कशाला म्हणून वरती विचारता च ? आणि दासबोधांत लेखनसमास आहे, तेव्हां दासबोधाचा कर्ता कोणी भाडोत्री होता, असें सभ्यपणानें म्हणता ?

शास्त्रीबावा, दासबोध हा श्रीसमर्थसंप्रदायाचा आद्यग्रन्थ ना ! श्रीसमर्थसंप्रदायाचीं लक्षणें कोणतीं तीं तुमच्या वाचण्यांत आलेलीं आहेत ! नाहींत, तर शास्त्रीबावा, इतके उतावीळ कां झालात ? सर्व रामदासी ग्रन्थ वाचावयाचे होते आणि मग विविधज्ञानविस्तारांत प्रकाश पाडावयाचा होता. जगाचीं २५० वर्षें अंधारांत गेलीं, तशीं आणखी कांहीं वर्षें गेलीं असतीं ! जग कांहीं इतक्यांत च बुडणार नव्हतें आणि विविधज्ञानविस्तार हि कोठें पळून जात नव्हता ! मग इतकी घाई कां केलीत ? बरोबर आहे, असली अजब कल्पना प्रसवावयाची होती, तेव्हां तुम्हांला जास्त महिने दम धरवला नाहीं, तें ठीक च आहे ! शास्त्रीबावा, श्रीसमर्थांची स्फुट कविता हातीं घ्या, पृष्ठ २१३ वें काढा, वाचा १४ वा अभंग, त्यांत तुम्हांला श्रीसंप्रदायाचीं लक्षणें आढळतील.

प्रथम लिहिणें दुसरें वाचणें ।
तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १
आशंकानिवृत्ति पैसी चौथी स्थीती ।
पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २
साहावें तें गाणें सातवें नाचणें ।
ताळी वाजवणें आठवें तें ॥ ३
नवा अर्थभेद दाहावा प्रबंद ।
आक्रावां प्रबोध प्रचीतीसीं ॥ ४
बारावें वैराग्य तेरावा विवेक ।
चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५
पंध्रावें लक्षण तें राजकारण ।
सोळावें तें जाण अवेग्रता ॥ ६
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा ।
काळ समजावा सर्वां ठाईं ॥ ७
आठ्रावें लक्षण वृत्ती उदासीन ।
लोलंगता जाण तेथें नाहीं ॥ ८
येकोणीसावें चीन्ह सर्वांसी समान ।
राखे समाधान ज्याचें त्याचें ॥ ९

विसावें लक्षण रामउपासना ।
वेध लावी जना भक्तीरंगें ॥ १०

ज्या संप्रदायाचें पाहिलें लक्षण लेखन, त्या संप्रदायाच्या मुख्य ग्रन्थांत लेखनाचा समास कशाला, म्हणून शास्त्री विचारतात, तेव्हां शास्त्रीबावांच्या शास्त्रज्ञानाची तारीफ केली पाहिजे !

परमार्थाच्या ग्रन्थांत लेखनक्रिया सांगितली म्हणून १९–१ हा समास समर्थांचा नाहीं ! शास्त्रीबावा, अकराव्या दशकाचा सहावा समास काढा. त्यांत हि आरंभीं

शुद्ध नेटकें ल्याहावें ।
लेहोन शुद्ध शोधावें ।
शोधून शुद्ध वाचावें ।
चुकों नये ॥ १

विश्कळित मात्रुका नेमस्त कराव्या ।
धाट्या जाणोन सद्दढ धराव्या ।
रंग राखोन भराव्या ।
नाना कथा ॥ २

असें शुद्ध लिहावयास, शोधावयास व वाचावयास सांगितलें आहे म्हणून तो समास समर्थांचा नाहीं, असें म्हणण्याची, शास्त्रीबावा, कांहीं सोय आहे कां ? त्या समासाच्या शेवटच्या ओवींत श्रीसमर्थांनीं आपल्या नामाचा उल्लेख केलेला असल्यामुळें तो समास नाकारण्याची सोय नाहीं. तात्पर्य, लेखनक्रिया सांगितली म्हणून १९–१ समास समर्थांचा नाहीं, हें शास्त्रीबावांचें तर्कशास्त्र विचित्र होय. आठ दशकांनंतर, बरेच समास स्फुट असल्यामुळें त्यांच्यांत पूर्वापरसंबंधाची अपेक्षा करणें च चुकीचें होय.

१९×२ या समासासंबंधानें शास्त्रीबावांचा असा आक्षेप आहे कीं, त्याच्या पहिल्या ओवींत अर्थभेद सांगतों, असें म्हटलें असतां पुढें प्रत्यक्ष तसा कांहीं च अर्थभेद सांगितला नाहीं, सबब हा समास समर्थांचा नाहीं. हा समास शास्त्रीबावांना कांहीं च समजला नाहीं, असें दुःखानें म्हणावें लागतें. तो सर्व समास येथें उतरून घेत नाहीं, वाचकांनीं तो कृपाकरून मुळावरून पहावा. त्या समासांत जी नाना प्रकारची शिकवण आहे तिला च श्रीसमर्थांनीं प्रसंगानुरोधानें अर्थभेद म्हटलें आहे.

**मागां बोलिले लेखनभेद ।**
**आतां सांगतो अर्थभेद ।**

अर्थभेद म्हणजे काय ? तर

**नाना प्रकारीचे संवाद ।**
**समजोन घ्यावे ॥ १९-२-१**

आणि ते च नाना प्रकारीचे संवाद समासांत सांगितले आहेत. अर्थात् शास्त्रीबावांचा आक्षेप व्यर्थ होय.

## आक्षेप चवदावा

" दासबोध द. २० स. १० यांतील ३० वी ओवी पाहावी.

भक्तांचेनि साभिमानें ।
कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें ।
तो हा दासबोध ॥

यावरून स्पष्ट दिसतें कीं, ग्रन्थकर्ता रामदासशिष्य होता. "
हा शास्त्रीबावांचा शेवटचा आक्षेप होय व त्यांत त्यांनीं आपल्या शहाणपणाचा कळस केला आहे. ' समर्थकृपेचीं वचनें ' म्हणणे रामदासकृपेचीं वचनें, असें शास्त्री समजतात ! त्यांना हें ठाऊक नाहीं कीं, आपण रामदासांना समर्थ म्हणतों आणि रामदास रामाला समर्थ म्हणत. या ओवीचा सरळ अर्थ असा ' भक्तकैवारी श्रीरामानें जी कृपा केली त्या कृपेचीं वचनें म्हणजे हा दासबोध ग्रन्थ होय. ' शास्त्रीबावांचे चवदा आक्षेप म्हणजे शुद्ध चवदा रत्नें होत आणि त्यांतलें हें शेवटलें रत्न !

श्रीसमर्थवाङ्मयावर या शास्त्रीबावांची एक मोठी धाड च आली म्हणावयाची ! हें चवदावें रत्न पाहून तर आतां श्रीसमर्थकृत कोणत्या च प्रकरणाची धडगत दिसत नाहीं. दासबोधाची वाट लावल्यावर आतां शास्त्रीबावांची दृष्टि इतर प्रकरणांकडे वळणार ! मनाच्या श्लोकांत

**समर्थाचिया सेवकां वक्र पाहे ॥**

हा चरण आढळतां च शास्त्री आनंदानें डांगोरा पिटणार कीं, मनाचे श्लोक हि रामदासकृत नसून कोणा तरी रामदासशिष्याचे दिसतात- रामायणांत

**समर्था तुझीये कृपेवीण कांहीं ।**
**स्वतः अल्प ही कार्य होणार नाहीं ॥**

अशा श्लोक आढळतां च रामायणाला हि श्रीसमर्थ मुकणार ! ओव्या शतकांत श्रीसमर्थांनीं

सद्गुरु समर्था दंडवत ॥

घातलें खरें, पण तेवढ्यानें ओव्याशतकांना ते आंचवणार ! अंत्रर्भावांत आरंभीं च

जय जय सद्गुरु समर्था ।

अशा त्यांनीं सद्गुरूचा जयजयकार केला खरा, पण तेवढ्यानें अंतर्भाव त्यांना अंतरणार !

समर्था मी तूझा तुजविण मला कोण पाहातां ।
सदा सांभाळावें जवळि च जिवामाजि राहातां ।
सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं ।
विवेकाचे वाटे अघटित घडे मार्ग सदनीं ॥

अशा करुणाष्टकांत श्लोक आढळतां च शास्त्री साशंक होणार ! अशा रीतीनें एक एक प्रकरण उडवीत श्रीसमर्थांच्या वाङ्मयाला शास्त्रीबावा कांहीं च ठेवणार नाहींत आणि त्यांनीं आपल्या लेखाच्या मथळ्यावर उद्धृत केलेल्या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें

उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा ।
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

जो कोणी शास्त्रीबावांचा पुढचा अवतार जग बुडतां बुडतां आफ्रिकेंत होणार आहे, तो शास्त्रीबावांचें व्रत, तितक्या च प्रामाणिकपणानें, सभ्यपणानें व समतोलबुद्धीनें पुढें चालवून रामदास म्हणून कोणी ऐतिहासिक व्यक्ति होती काय, अशा अपूर्व प्रश्न विचारून विविधज्ञानविस्तारांत सिद्ध करील कीं, रामदास म्हणून कोणी ऐतिहासिक व्यक्ति झाली च नाहीं ! आणि मग जगाचा प्रलय होईल !

शास्त्रीबावांचे आक्षेप संपले. त्यांनीं आपल्या लेखांत आक्षेपांना क्रमांक वगैरे दिलेले नाहींत, पण त्यांचे दोन्ही लेख अत्यन्त काळजीपूर्वक दोन वेळां वाचून त्यांचे आक्षेप तरी किती आहेत, ते आम्हीं सारे लिहून काढले,

९८.८१

ते एकंदर चवदा भरले. त्यांवर आमचें म्हणणें काय आहे, तें हि येथवर सविस्तः सादर केलें आहे. शास्त्रीबावांच्या मताचा पुरस्कार करणारा कोणी वाचक त्यांना मिळाला आहे, असें वाटत नाहीं. शास्त्रीबावांना हि तशी आशा नव्हती नाहीं, त्यांची सारी भिस्त भावी काळावर व पृथ्वीच्या विस्तारावर आहे! पण येथवर जें विवेचन करण्यांत आलें आहे तें वाचून आपण चुकलों असें त्यांना वाटणार नाहीं काय? वाटेल, पण तसें कबूल करण्याला त्यांनीं स्वतःला जागा च ठेवली नाहीं. ‘ श्रीसमर्थरामदासस्वामींविषयीं आपला पूर्ण आदर व पूज्यभाव आहे ’ असें त्यांनीं आपल्या लेखाच्या आरंभीं च म्हटलें आहे व दासबोधाचा कर्ता **अंधभक्त** होता, त्याला **शास्त्रपरिचय मुळीं च नव्हता**, त्याच्यांत **न्याय्य युक्तीचा लेश हि नव्हता**, तो प्रासंगिक **वावदूक व्यवहारोपजीवी** होता, **भाडोत्री** होता, इत्यादि रीतीनें शास्त्री-बावांनीं दासबोधाच्या कर्त्याचा गौरव केलेला आहे! अर्थात् दासबोध हा ग्रन्थ दुसऱ्या कोणाचा नसून तो श्रीसमर्थांचा च होय, हें त्यांना आतां पूर्ण पटले, तरी तसें तोंडानें कबूल करण्याची त्यांना सोय नाहीं.

हे भय्याशास्त्री कोण आहेत, कोठें असतात, काय करितात, असला विक्षिप्तपणा करण्याला त्यांना काय कारण झालें, वगैरे आम्हांला कांहीं च माहिती नाहीं, अर्थात् आम्ही त्यांचा हेवादावा करण्याचा मुळीं च संभव नाहीं. परंतु आम्ही जरी त्यांना ओळखत नसलों, तरी ते मात्र आम्हांस ओळखत असावेत असें दिसतें, कारण आपल्या लेखाच्या शेवटीं त्यांनीं आम्हांवर हि शस्त्र उचललें आहे! “ साधनवैपुल्यानें शोधकबुद्धीचें प्रदर्शन करून लोकांस ग्रन्थांतरंगसार सांगूं इच्छिणारे अर्वाचीन चरित्रलेखक प्रमाणतः अनादरणीय व स्वभावतः **स्वकार्यसाधु अतएव सत्यवंचक** असल्यानें त्यांविषयीं कोणत्या हि प्रकारें आदर दाखविणें इष्ट नाहीं व योग्य नाहीं. ” कोणाला कोणाचा आदर वाटावा न वाटावा हा क्षुल्लक प्रश्न आहे व आम्ही कोणाच्या आदराची इच्छा कधीं च केली नाहीं! पण पदरचें खर्चून टिकटिकाणचे मठ पाहून व ग्रन्थसंग्रह मिळवून आतांपर्यंत पांच पंचवीस रामदासी ग्रन्थ व शें दीडशें रामदासी टांचणें प्रसिद्ध केल्याबद्दल आम्हांस **स्वकार्यसाधु अतएव सत्यवंचक**, असें कोणी म्हणेल, अशी मात्र आम्ही अपेक्षा केली नव्हती!

REFBK-0001891